# माणूस

शनिवार
२९ जुलै १९७२
पन्नास पैसे

## तडजोड




" सर, पोषाखावरचे तुमचे सर्व निर्बंध आम्हाला मान्य आहेत; पण एकाच अटीवर. ह्या तुमच्या वेळच्या प्रिन्सिपालप्रमाणे तुम्ही पोषाख करून आलं पाहिजे . . . "

माणूस
शनिवार
२९ जुलै १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : नववा

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार....

८ जुलै १९७२

१५ जुलै अंकातील 'मुंबई वार्ता' पत्रांत 'हा काय कॅम्पस् आहे?' या सदराखाली मुंबई विद्या पीठाने एम्. ए. ची डिपार्टमेंटस् कालिना येथे ज्या इमारतीत हलविली आहेत त्या 'जेलखान्यां'चे वर्णन केले आहे व अभ्यास चांगला होण्यासाठी लोकेशन, बिल्डिंग्ज, रस्ते, बसच्या सोयी या गोष्टी किती महत्वाच्या आहेत ते कळवळून सांगितले आहे. हे सर्व वाचताना मला कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापिठाच्या कुलगुरुंवर मध्यंतरी झालेल्या टीकेची वारंवार आठवण झाली. त्यांनी स्वतःच्या देखरेखीखाली इमारती बांधून घेतल्या व 'कॅम्पस्' आदर्श व्हावा असे पाहिले, त्यांचेवर 'दगडाविटांचे विद्यापीठ' म्हणून टीकेची झोड उठविली गेली होती.

मुंबई विद्यापीठाच्या कालिना कॅम्पस्च्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पवार यांच्या वरील काही आरोपांचे परस्पर खंडन झाले ही माझ्यासारख्या 'कोल्हापुऱ्या'ला बरे वाटण्यासारखी गोष्ट झाली.

राम कर्णिक, कोल्हापूर

# मुंबई वार्ता

## तंग तुमानी, मिनीस्कर्टस् मुर्दाबाद !

**प्रतिनिधी**

मुंबईत विद्याविहार नावाचे स्टेशन आहे. स्टेशन जवळच के. जे. सोमय्या नावाचे एक महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाच्या व्यवस्थापकांना आपण खूप मानतो. बहकलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांना वठणीवर आणण्याचे जे महत्कार्य त्यांनी हाती घेतले आहे ते अत्यंत स्तुत्य आहे. स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त व्यवस्थापकांना या कामगिरीबद्दल एखादा किताब बहाल करण्यास हरकत नाही. केंद्र नाहीतर राज्यसरकार आमच्या या नम्र सूचनेचा विचार करील काय ? तसे केल्यास लोकमान्यांप्रमाणे गर्जावे लागेल,' या सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?'

म्हणजे सांगत होतो काय की बहकलेल्या मंडळींना वठणीवर आणण्याची गंभीर समस्या सोमय्याच्या व्यवस्थापकांपुढे आहे. अर्थातच हा प्रश्न युद्धपातळीवरून हाताळायला त्यांनी सुरुवातही केली आहे. व्यवस्थापकांच्या घोषणा आहेत 'तंग तुमानी, मिनीस्कर्टस् मुर्दाबाद ', 'बंद करो, बंद करो, बिडी या सिगरेट पीना बंद करो.'

यापुढे सोमय्या कॉलेजात एखादा राजेश खन्ना वा हेमा मालिनी दिसणार नाही तर साधा सोज्वळ, गावठी असा एखादा विठोबा, चिमणलाल किंवा कमी, ठकू, शांताबेन वगैरे लोक दिसतील. विठोबा किंवा चिमणलालच्या पॅन्टचे बॉटम १८ ते २० इंच असेल किंवा तो खादीचा लेंहगा त्यावर खादीचा शर्ट, गांधी टोपी आणि करकर वाजणाऱ्या जाडजूड अशा वहाणा वापरेल. ठकू किंवा शांताबेन आता मिनीस्कर्टऐवजी परकर वा साडी परिधान केलेल्या दिसतील. त्यावर खोपा पद्धतीचा अंबाडा असेल. साडी असेल तर डोक्यावरून पदर वा घुंगट घेतलेला असेल. सोमय्याच्या कॅन्टीनमध्ये सिगरेट्स् ऐवजी जिरागोळ्या व लिमलेटच्या गोळ्या, तसेच कोकाकोला ऐवजी शेळीचे दूध मिळण्याची व्यवस्था लवकरच होईल असे दिसते. प्राध्यापक महाशयांचे काय ? त्यांनाही आता प्रा. चिमणराव

वा हंबीरराव व्हावे लागेल. धोतर, कोट आणि बहुधा टोपी नाहीतर पगडी असा पेहराव त्यांना करावा लागेल. मला वाटतं कॉलेजने विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि प्राध्यापक-प्राध्यापिकांसाठी एक गणवेषच नेमून द्यावा. अगदी लई बेस आयडिया होईल.

कॉलेजच्या व्यवस्थापकांना बहुधा भीती वाटत असावी, की पोरींना मिनीस्कर्टस् वापरू दिले तर थोड्याच दिवसात त्या हॉट पॅन्टस् किंवा हॉट पॅन्टस् विथ विंडोज वापरतील. पोरेही टाइट पॅन्टस्बरोबर स्किन टाईट पॅन्टस् किंवा ड्रेनपाईप पॅन्टस् वापरतील. मुलींनी परकरवजा मॅक्सीज वापराव्यात की नाहीत याबद्दल स्पष्ट दिग्दर्शन झाले असते तर बरे झाले असते. शिवाय पॅन्टच्या बॉटमचा घेर अधिक असावा असा हुकूम देणाऱ्या व्यवस्थापकांनी तो बेल बॉटम किंवा एलिफन्ट बॉटम इतका ऐसपैस असावा की नाही याचाही खुलासा केलेला नाही.

सोमय्या कॉलेजच्या प्राचार्यांनी मुलांनी टाईट पॅन्टस् व मुलींनी मिनिस्कर्टस् वापरू नये असा हुकूम आपल्या विद्यार्थिगणांवर बजावला आहे.

या कॉलेजात सुमारे तीन हजार विद्यार्थी आर्टस्, सायन्स व कॉमर्सचा अभ्यास करीत आहेत. त्यांची या हुकुमामुळे दाणादाण झाली. हे कॉलेज १९६० साली स्थापन झाले आणि कपड्यासंबंधीचा वरील नियम १९६३ साली अंमलात आला. ६३ सालापासून अस्तित्वात असलेल्या या नियमावर या वर्षीप्रमाणे दरवर्षी तमाशा होतो. मग मात्र सारं काही शांत होते.

या वर्षी हे प्रकरण जरा अधिक चिघळलं एवढेच. यंदा मुलांनी संघटितपणे वर्गावर बहिष्कार टाकला. घोषणा दिल्या. फुलझाडांच्या कुंड्याही फोडल्या असे म्हणतात. तंग तुमानी घालून आल्याबद्दल सुमारे १२ विद्यार्थ्यांना कॉलेजबाहेर हाकलण्यात आले.

तंग विजारी घातल्यामुळे व नियमाची काटेकोर अंमलबजावणी कॉलेज करणार या बातमीमुळे सोमवारी मुले वर्गातून छू होऊ लागली.

प्राचार्यसाहेब म्हणतात की विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रवेश घेतात तेव्हाच त्यांना याबाबत बजावण्यात येते शिवाय पालकांनाही यासंबंधी निर्वाळा द्यावा लागतो. कॉलेजच्या हॅन्डबुकांतही हे नियम दिलेले आहेत. तेव्हा विद्यार्थ्यांनी ते न पाळून कसे चालेल. कॉलेजच्या आवाराबाहेर त्यांनी काहीही करावे पण कॉलेज आवारात यायचे असेल तर हे नियम पाळलेच पाहिजेत. ज्यांना हे जमणार नसेल त्यांची फी परत द्यायचीही कॉलेजची तयारी आहे.

मागे एकदा केव्हातरी एक प्राध्यापक महाशय गुरूशर्ट घालून आले आणि मग ते विद्यार्थ्यांच्या टीकेचे लक्ष झाले. करतात काय बिचारे ?

विद्यार्थ्यांचे म्हणणे असे की, स्टाफचे काही सदस्य आणि सुरक्षा विभागाचे लोक मुलांच्या पॅन्टच्या बॉटमचा आणि मुलींच्या स्कर्टचा घेर मोजतात, यामुळे ओशा-

ळल्यागत वाटते. मुली, मुलांपेक्षा अधिक चांगल्या आहेत, असे प्राचार्य म्हणतात. त्या अधिक प्रामाणिकपणे नियमांचे पालन करतात. मुले मात्र समस्या निर्माण करतात. नियम म्हणून कायदेशीरपणे याचे समर्थन करता येईल खरे पण सामाजिक दृष्टचा याचे समर्थन करता येईल का ? यावर प्राचार्यांना ठामपणे उत्तर देता आले नाही.

प्राध्यापकांचीही या कॉलेजात कुचंबणा होते आहे. त्यांना त्यांच्या कॉमनरूम-मध्येही धूम्रपान करता येत नाही. कॉमनरूममधील आपल्या धूम्रपानाच्या हक्कावर कॉलेज गदा आणते आहे, असे बऱ्याच प्राध्यापकांना वाटते. प्राध्यापकच काय पण कॉलेजला भेट देणाऱ्या पाहुण्यांनाही धूम्रपान करण्याची मनाई आहे.

याबद्दल बोलायचे तर असे म्हणता येईल, की नैतिकतेच्या कल्पनेचा हा एक विलक्षण विक्षिप्त नमुना आहे. देशातील एका विख्यात उद्योगपतीची राजस्थानात काही कॉलेजीस आहेत. त्या कॉलेजांत मुलामुलींना बोलण्याचीही बंदी आहे. तेव्हा यावरून असे अनुमान काढायला जागा आहे.

अनेकदा टीका होऊनही कॉलेजचे हे कर्मठ लोक मख्ख आहेत.

विद्यार्थ्यांना माहिती आहे की, हे सारे थोतांड आहे. शिप्यांकडून शिवून घेतलेले कपडेच तंग शिवून घेतले जातात, असे नाही तर प्रचलित फॅशन म्हणून तयार कपडेही तसेच मिळतात. कॉलेजांत वापरायचे कपडे व बाहेर वापरायचे कपडे असे वेगवेगळे जोड ठेवणे बहुसंख्यांना शक्यच नाही.

एक प्राध्यापक म्हणालेही, की त्यांचा स्वतःचा मुलगाच अशा पॅन्टस् वापरतो, मग त्यांना इतरांना तसे करू नका असे सांगण्याचा काय अधिकार आहे ?

विद्यापीठाचे अधिकारी म्हणतात, कॉलेजचे नियम ठरविण्याचा प्रत्येक कॉलेजला हक्क आहे. त्यात युनिव्हर्सिटी ढवळाढवळ करू शकत नाही.

कोणत्याही गोष्टीत परकीयांची आंधळी नक्कल केली जाऊ नये हे जरूर मान्य, पण अशा प्रकारे एका टोकाला जाणे कितपत योग्य आहे? फॅशन जितक्या झटकन येतात तितक्याच पटकन जातातही. त्यावर बंधने आणली तर विरोधासाठी विरोध म्हणून त्या अधिक काळ टिकण्याचीच बरीच शक्यता. शिवाय महत्त्वाचा मुद्दा असा की, शिक्षण आणि कपडे यांची गल्लत करावीच का ?

अशा या मूर्खपणाच्या गोष्टींमागे लागून कॉलेज यात काही बदल घडवू शकणार नाही, प्रतिष्ठेचा प्रश्न करूनही तो सुटणार नाही. मात्र तो अधिक चिघळेल.

□ □ □

# मुक्काम पुणे

## सेकंड एल्. एल्. बी.–
## जेव्हा पेपर्स हरवतात !

एमेम

पुण्यातील विद्यार्थ्यांवर 'शांतताप्रिय' हे लेबल फिट्ट बसले आहे. मागे कृषि-विद्यापीठ आंदोलनाच्या वेळी हे विद्यार्थी जरा तापून उठले होते. पण मग परत शांत. आता तब्बल वर्षानंतर ते एका नव्या आंदोलनात उडी घेत आहेत.

पुणे विद्यापीठाच्या सेकंड एल्. एल्. बी. परीक्षेचा निकाल १२ जून रोजी जाहीर होणार होता. निकालाची तारीख जवळ येऊ लागली, की बहुसंख्य विद्यार्थ्यांना वाटते, निकाल पुढे ढकलला तर बरे होईल. मात्र त्यांची ही इच्छा कधीच पूर्ण होत नाही. पण यंदा सेकंड एल्. एल्. बी. चा निकाल मात्र पुढे ढकलला गेला आणि त्याचे मजेशीर कारण सांगण्यात आले ते म्हणजे 'पब्लिक इंटर नॅशनल लॉ'च्या उत्तर पत्रिका चुकून दुसऱ्या गावाला गेल्या. (आमच्या केमिस्ट्री पेपराच्या बाबतीत असे झाले असते तर आम्हीही पहिल्या झटक्यात बी. एस्सी. झालो असतो.) वास्तविक या उत्तर पत्रिका नाशिकमधील 'सटाणा' येथे जावयाच्या होत्या. पण आपल्या रेल्वेखात्याचे इंग्रजी अचूक असल्यामुळे उत्तर पत्रिका मध्य प्रदेशातील 'सतना' येथे पाठविल्या गेल्या ! (तरी नशीब, व्हिएत-नाममध्ये 'सॅतॅना' नावाचे एक गाव आहे हे त्यांना माहीत नव्हते ! आता तरी लॉचे विद्यार्थी इंग्रजी हटावला पाठिंबा देतील का ?) नंतर उशीराने ही चूक दुरुस्त करण्यात आली. मग घाईघाईने हे पेपर्स तपासले. (किंवा तपासलेच नाहीत !) बरे या एकाच पेपरचा असा घोटाळा झाला असता तर विशेष काही झाले नसते. पण सर्व पेपर्समध्येच काही गडबड झाली असावी, असे विद्यार्थ्यांचे मत आहे. अनेक विद्यार्थी अनेक विषयात नापास झाले ! पुणे केंद्राचा निकाल २४

टक्के तर नाशिकचा निकाल अवघा १८ टक्के लागला. नाशिकचा सुधीर वाजे हा विद्यार्थी मागील वर्षी फर्स्ट एल्. एल. बी. मध्ये पहिला आला होता. तो यंदा पाच विषयात नापास झाला. अरेरे, काय ही अधोगती ! गव्हर्मेंट ओपन मेरीट स्कॉलर्सशिप मिळविणारेही अनेकजण नापास झाले. यांच्या शिष्यवृत्त्या आता रद्द होणार. चला, तेवढीच सरकारी तिजोरीत बचत !

या पार्श्वभूमीवर नगर केंद्राचा निकाल एकदम नजरेत भरतो. नगरचा निकाल तब्बल ७५ टक्के लागला. नगरपेक्षा पुण्यात जास्त सुखसोयी असताना निकालात ही तफावत का ? विद्यार्थ्यांच्या मते याचे एकमेव कारण म्हणजे विद्यापीठाच्या लॉ फॅकल्टीचे डीन हंसराज पाटील हे नगरचेच आहेत. त्यांच्याकडून म्हणे नगरला पेपर्स फुटले ! (हा मात्र नगरकरांवर उघड उघड अन्याय आहे. नेहमी नेहमी पुण्यातच पेपर्स फुटले पाहिजेत असा काही नियम आहे का ?) यासंबंधी आणखीही बऱ्याच मौलिक बातम्या समजल्या, त्यापैकी एक–निकाल कडक लागल्यानंतर उत्तीर्णांचे प्रमाण वाढविण्याचा डीनचा विचार होता. पण इतर सदस्यांनी याला विरोध केला. कारण जेणेकरून विद्यार्थी संतप्त होतील हे त्यांना हवे होते. त्यामुळे पाटलांना डीनपदाची खुर्ची सोडावी लागेल. त्याप्रमाणेच झाले. विद्यार्थ्यांच्या मागण्यात पाटलांच्या राजीनाम्याची मागणी आहेच !

या सर्व गोंधळामुळे विद्यार्थी संतप्त झाले व त्यांनी पुण्याचे लॉ कॉलेज बमुदत बंद ठेवण्याचे ठरविले. इतक्यात कुलगुरू महाजनींनी चौकशी करण्यासाठी त्रिसदस्य समिती नेमण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन काही काळ स्थगित ठेवले आहे. (संबंधितांकडून नुसती एखादी घोषणा झाली, की आंदोलन बंद करणे हा महाराष्ट्रातील तमाम विद्यार्थ्यांचा लौकिक चिंतनीय आहे !) कुलगुरूंनी धावपळ करून कसेबसे दोन सदस्य मिळविले. तिसरा काही त्यांना मिळाला नाही. आता या द्विसदस्य समितीचे काम चालू आहे. विद्यार्थी २७ जुलैपर्यंत थांबणार आहेत. तोपर्यंत समितीचा निकाल बाहेर आला, म्हणजे अनुकूल निकाल मिळाला तर ठीक, नाहीतर उग्र आंदोलन करण्याचा लॉच्या विद्यार्थ्यांचा विचार आहे. सर्व विद्यार्थी संघटनांचा याला पाठिंबा असल्यामुळे आंदोलनाचे लोण पुण्यातील सर्व विद्यार्थीवर्गात पसरण्याची शक्यता आहे. (जाता जाता विद्यार्थ्यांच्या संपाबाबत काढलेल्या पत्रकात अनेक विद्यार्थी संघटनांची नावे आहेत. पण 'युक्रांद'चे नाव मात्र नाही, म्हणून अनेकांना आश्चर्य वाटले. पण आम्हांला मात्र मुळीच आश्चर्य वाटले नाही. कारण युक्रांद म्हणजे कुमार सप्तर्षी हे समीकरण आम्हांला माहीत आहे आणि कुमारसाहेब तर सध्या तुरुंगात आहेत !)

बघू या काय होते ते! तूर्त तरी आम्ही २७ जुलैकडे डोळे लावून बसलो आहोत! ◻

## बाबा आढाव– ' मी जिंकलो, मी हरलो !

आपले महाराष्ट्र सरकार स्वभावाने अगदी गरीब आहे. कुणीही उठतो आणि सरकारला दोन उपदेशाच्या गोष्टी सुनावतो. यावर मागे सहकारमंत्र्यांनी एका पुरोगामी कॉंग्रेसजनाला उद्देशून इशारा दिला होता, की सरकारला उठसूठ उपदेश करण्याचे उपद्व्याप कुणी करू नयेत. पण लोक कसचे ऐकतात. ते आपले उपदेश करीतच राहातात ! मध्यंतरी बाबा आढावांनी एक फतवा काढला. ' आपले सरकार हे निधर्मी आहे. म्हणून दर आषाढी एकादशीला शासनातर्फे पंढरपूरला विठ्ठलाची जी महापूजा होते ती यंदापासून बंद करावी. अन्यथा आम्ही तेथे सत्याग्रह करू !' आम्हांला वाटले, शासन याप्रसंगी खंबीरपणा दाखवील. कारण आमच्यासमोर पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचे ताजे उदाहरण होते. परवा पालख्यांच्या आगमनप्रसंगी विद्यापीठ कोर्टाची सभा चालू होती. दरवर्षीची प्रथा असते, की कुलगुरू पालखीला विद्यापीठातर्फे पुष्पहार अर्पण करून स्वागत करतात. पण यंदा काही पुरोगामी मंडळींनी कुलगुरूंना सुचविले, की त्यांनी पालखीचे स्वागत करायला जाऊ नये आणि गेल्यास वैयक्तिरीत्या जावे, विद्यापीठातर्फे म्हणून जाऊ नये. पण कुलगुरूंनी ठणकावले, ' मी पालख्या आल्या की जाणारच. मग तुम्ही वैयक्तिक म्हणून समजा किंवा विद्यापीठातर्फे म्हणून समजा !' असे काही आपले सरकार करील असे आम्हांला वाटले. पण छे ! यंदापासून महापूजा न करण्याचा त्यांनी हुकूमच काढला. बाबा आढावांना आपला हा असा विजय सर्वस्वी नवीन होता. आपण एक पत्रक काढून सरकारला विनंती करतो काय आणि लगेच सरकार ती मान्य करते काय ! छे, छे, हा अगदी कहर होता ! बाबा आढाव मग दोन इंच जास्त छाती फुगवून हिंडू लागले. पण कसचे काय नि कसचे काय ! सरकारने आढावांचे श्रेयच की हिरावून घेतले.

विधानसभेत काही सदस्यांनी विचारले की, काही संस्था व व्यक्ती निदर्शने करणार हे जाहीर झाल्यामुळेच सरकारला यंदा उपरती झाली ? त्यावर मंत्री-महोदय उत्तरले, ' मुळीच नाही. त्यांच्या आधीच म्हणजे जूनमध्येच आम्हाला वाईहून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पत्र पाठविले. तेव्हाच हा निर्णय आम्ही घेतला होता. (फक्त जाहीर आता केला !)' काय हे ? करूनसवरून बाबा आढाव बाजूला राहिले, आणि साय मात्र मिळाली तर्कतीर्थांना ! खरे तर निधर्मी–निधर्मी हा मौलीक सिद्धांत आम्ही आढावांकडूनच शिकलो अशी कबूली सरकारने द्यायला पाहिजे होती. अजूनही वेळ गेली नाही. सरकारने आता तरी अशी कबूली द्यावी अशी त्यांना आम्ही जाहीर विनंती करतो. (विनंती करतो असे मुद्दामच म्हटले, कारण त्यामुळे सहकारमंत्री पुन्हा एकदा चिडतील ! )

असो. सध्या बाबासाहेब आढाव मात्र ' मी जिंकलो, मी हरलो !' असे म्हणताना दिसतात.

□ □ □

# जो स्वप्न पहात नाही आणि इतरांना पहाण्यास

‘मिस्टर मुजुमदार, उठा आता. खेळ संपला आहे.’ असे शब्द पोलीस ऑफिसरने डिटेक्टिव्ह पद्धतीने उच्चारून गाढ झोपी गेलेल्या श्री. मुजुमदारांना जागं केलं. ते इतके विस्मय चकित झाले. की पाच मिनिटं त्यांना बोलणंच सुचेना. पोलीस ऑफिसरने त्यांच्यासमोर सिगरेट धरली तेव्हा ते भानावर आले. सिगरेटचा स्वीकार करून ते म्हणाले—‘पण तुम्हांला माझा पत्ता लागलाच कसा?’ या प्रश्नाचं उत्तर अर्थातच त्यांना मिळालं नाही. त्यांच्या दोन अन्य सहकाऱ्यांसह त्यांना ‘लाल बझार’च्या दिशेने नेण्यात आलं.

‘ श्री मुजुमदार व इतर नक्षलवादी मंडळी यांच्यात मध्यस्थीचे काम करणाऱ्या माणसानेच श्री. चारू मुजुमदार यांचा सध्याचा पत्ता पोलिसांना दिला व त्यामुळे त्यांना अटक करणे सोयीचे झाले. CPI (M-L) पक्षाचा सेक्रेटरी जनरल आणि नक्षलवादी चळवळीचे तात्त्विक मुद्दे रेखाटणारा नेता आयताच हाती आल्याने पश्चिम आधुनिक इतिहासातील एक धाडसी प्रकरण—धैर्य, त्याग, मृत्यू आणि पिढी-जात वैरभावना ह्यांनी परिपूर्ण असे—आता शेवटाला आल्यासारखेच झाले आहे. १९६७ पासून श्री. मुजुमदार भूमीगत होते. नक्षलवाडी हे त्यांचे कार्यक्षेत्र. त्या-पाठोपाठ १९६९ मध्ये देब्रो—गोपीवल्लभपूर आणि १९७१ मध्ये बिरभूम येथे त्यांनी आपले कार्यक्षेत्र हलविले. त्या सर्वांचाच निकाल लागला. पश्चिम बंगाल-मध्ये सर्वत्र ठिणग्या जरूर उडाल्या पण त्यांनी पेट घेऊन ज्वाळा भडकू शकल्या नाहीत. इतर प्रांतानाही त्याची झळ लागली नाही. आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम-देखील भारतातील येनान बनू शकले नाही. १९६७ मध्ये पेकिंग रेडिओद्वारा व्यक्त झालेल्या आशेने दार्जिलिंग येथील किसानांच्या सशस्त्र लढ्याच्या मार्गाचा अवलंब करूनही भारत पेटून उठू शकला नाही. संपूर्ण भारतातील लोकांच्या महान् चळ-वळीचे जोरदार वादळ निर्माणच झाले नाही आणि आज तर तो स्वातंत्र्याच्या चळवळीचा तत्त्ववेत्ता स्वतःच तुरुंगात येऊन पडला आहे.

नक्षलवाडी म्हणजे खरोखरच एखादी ठिणगी असेल तर ती प्रज्वलित करण्याचे श्रेय चारू मुजुमदारांना आहे. वयाच्या २२ व्या वर्षीच ते कम्युनिझमकडे आकर्षित झाले होते. १९३८ मध्ये कम्युनिस्ट पार्टीच्या किसान विभागात जलपायगुरी येथे त्यांनी काम केले. १९४८ मध्ये कम्युनिस्ट पार्टीचे नेतृत्व बदलले, मार्गही बदलला म्हणून श्री. मुजुमदार सिलीगुरी येथे परत आले व दार्जिलिंगच्या मळ्यात काम करणाऱ्या मजुरांच्या युनियनचे नेतृत्व त्यांनी पत्करले, परंतु त्यांना पकडण्यात

# भाग पाडत नाही तो क्रांतीकारीच नव्हे....

## चारू मुजुमदार

आले व डमडमच्या जेलमध्ये त्यांची रवानगी झाली. १९५० नंतर सुटका झाल्यावर पुन्हा त्यांनी आपले ट्रेड युनियनचे काम सुरू केले. त्यानतर १९६२ मध्ये पुन्हा एकदा जेलची हवा खाल्ल्यानंतर १९६३ मध्ये ते मुक्त झाले. त्या वेळी लोकसभेच्या निवडणुकांसाठी ते उभे राहिले होते. परंतु त्यांना यश मिळाले नाही.

१९६४ मध्ये CPI (M) पक्षाची स्थापना झाल्यानंतर पक्षातील ज्या लोकांचा कल 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायना'च्या दिशेकडे झुकला होता त्यांनाच श्री. मुजुमदारांची सहानुभूती होती. १९६५ मध्ये त्यांनी CPM च्या नावानेच एक पत्रक प्रसिद्ध केले पण नेत्यांच्या दृष्टीने त्यातील विचार पार्टीच्या तत्त्वरेखेपासून फारच दूर जाणारे असे होते. अर्थातच पक्षाच्या सभासदांमध्ये मतभेद निर्माण झाले.

असं म्हणतात की १९६३ साली सुटून आल्यानंतर मुजुमदारांनी प्रथम काय केलं असेल तर श्री. डांगे यांचा फोटो पायाखाली तुडविला. पक्षातील लोकांची त्यामुळे खूप निंदा झाली. पण ते म्हणाले की संपूर्ण भारताच्या कम्युनिस्ट लोकांचा दोष नाकबूल करण्याची ही एक खूण आहे असेच समजा. त्यांचे आपल्या लोकांना सांगणे होते की–'शत्रूचा द्वेष करा, भूतकाळाचाही द्वेष करा. ह्या दोहोंचा तीव्र द्वेष केल्याखेरीज खरे क्रांतिकारी निर्माण होणेच शक्य नाही.'

त्यानंतर लवकरच त्यांनी क्रांतिकारकांची कर्तव्ये समजावून सांगणारी आठ पत्रके काढली. सशस्त्र लढा तावडतोब उभारावा कारण हीच योग्य वेळ आहे असे त्यांचे सांगणे होते. पण प्रतिसाद जोरदार नाही हे पाहून त्यांनी आपल्या विश्वासू अनुयायासह नक्षलवादी चळवळ जोमाने सुरू करण्यास प्रारंभ केला. पेकिंगकडून तिचे वर्णन–भारतातील 'क्रांतीच्या सशस्त्र लढ्याचे पहिले पाऊल' म्हणून करण्यात आले.

'कम्युनिस्ट पार्टीशिवाय क्रांती कशी होणार ?' वेडे अनुयायी त्यांना विचारीत. मुजुमदार त्यांना म्हणत 'मी स्वतःच भारताची एक वैकल्पिक (alternative) पार्टी आहे.'

१९६७ मध्ये श्री. मुजुमदार CPI (M) पक्षातून फुटून निघाले. कारण सार्वत्रिक निवडणुकांमध्ये पक्षाने भाग घ्यावा किंवा नाही यावर मतभेद निर्माण झाले होते. पहिले वहिले युनायटेड फ्रंटचे राज्य अस्तित्वात आले आणि दुसऱ्याच दिवशी नक्षलवादी चळवळ जोमाने सुरू झाली. तिचा अर्थातच टिकाव लागला नाही. पण तिच्यातील चैतन्य मात्र नष्ट झाले नाही. नक्षलबाडी एका विशिष्ट ठिकाणाचे नाव म्हणूनच केवळ उरले नाही; त्या शब्दाचा अर्थ अधिक विस्तृत झाला. नक्षलबाडी म्हणजे सत्ता प्राप्त करून घेण्यासाठी उभारलेली किसानांची सशस्त्र चळवळ असा अर्थ होऊ लागला. कानू सन्यालच्या म्हणण्याप्रमाणे ही चळवळ किसानांना उचलून धरणाऱ्या अगोदरच्या अनेक चळवळीपेक्षा फार फार निराळी अशी आहे.

नक्षलवादी चळवळीच्या संदर्भात श्री. मुजुमदारांना अटक झाली. पण ते जेलमध्ये अतिशय आजारी झाल्याने त्यांना मुक्त करण्यात आले. तोवर CPI (M) पक्ष अगदी स्वतंत्र मतप्रणालीने चालू लागला होता. रशिया किंवा चायना ह्या दोहोंच्याही मतांचा पगडा त्यांना नको होता. १९६९ मध्ये लेनिनच्या १०० व्या वाढदिवशी CPI–(M–L) पक्षाची स्थापना झाली.

पक्षाचा नेता व तत्त्वरेखांकन करणारी जबाबदार व्यक्ती म्हणून श्री. मुजुमदारांना भारतातील प्रचलित परिस्थितीच्या दृष्टीने माओच्या तत्त्वांचा अवलंब करावाच लागला. साहजिकच पक्षामध्ये फूट पडली. क्रांती उभारताना कामकरी वर्गाची भूमिकाच ते विसरतात. असा त्यांचेवर आरोप ठेवण्यात आला. गनिमी पद्धतीने वर्ग–शत्रूवर हल्ला करून त्यांचा विनाश करण्याचा प्रस्ताव मांडल्यावर तर ही मतभेदांची दरी अधिक रुंद झाली. कुणी म्हणाले, यामुळे व्यक्तीगत भय निर्माण होईल तर कुणी म्हणाले खरे जनतेचे राज्य प्राप्त करून घेण्याचा हाच इष्ट मार्ग होय. पार्टीमध्ये पुन्हा नव्याने फूट पडली ती शहरी कृत्यांना प्रोत्साहन दिल्यामुळे व पुन्हा एकदा मतभेद झाले ते बांगला देशाच्या स्वातंत्र्य युद्धाच्या वेळी त्यांनी घेतलेल्या पावित्र्यामुळे.

एवढी मतमतांतरे झाली तरी श्री. मुजुमदार मात्र आपल्या तत्त्वावर स्थिर राहिले. शहरातील अघोर कृत्ये, शाळा कॉलेजावर हल्ले, राष्ट्रीय नेत्यांच्या पुतळ्यांची मोडतोड इ. ही सर्व त्यांच्या दृष्टीने सांस्कृतिक क्रांतीची लक्षणे असून, मध्यमवर्गीय मूल्यांबद्दल नापसंती व्यक्त करण्याचे हे मार्ग आहेत असे त्यांचे मत आहे.

गेले काही महिने आपल्या पक्षाला नव्याने आकार देऊन तो सुव्यस्थित करण्यात

श्री. मुजुमदार व्यग्र होते. 'जो स्वप्न पाहात नाही आणि इतरांना स्वप्ने पाहण्यास भाग पाडत नाही तो क्रांतिकारीच नव्हे.' असे त्यांचे म्हणणे आहे. आजच्या त्यांच्या अटकेमुळे त्यांच्या स्वप्नांमध्ये अडथळाच निर्माण झाला आहे खरा.

श्री. मुजुमदार हे ५६ वर्षे वयाचे गृहस्थ असून वयाच्या मानाने ते जरा मोठे दिसतात. त्यांच्या पत्नी श्रीमती लीला मजुमदार व दोन मुले सिलिगुरी येथे असतात. एक मुलगी कलकत्त्यात मेडिकल कॉलेजची विद्यार्थिनी आहे. श्री. मुजुमदार यांची प्रकृती ठीक नसते. ते अॅस्थमाचे पेशंट आहेत. खून, खुनांचे प्रयत्न, दंगेखोर-पणा, बेकायदा शस्त्रास्त्रांचा संग्रह करणे व सरकारविरुद्ध लढा उभारणे इत्यादी अनेक आरोप त्यांचेवर आहेत. त्यांना पकडून देण्यासाठी दहा हजारांचे बक्षीस लावले होते. खास वैद्यकीय उपचारासाठी एंटाली विभागात महिनाभर राहिल्या-नतर मात्र पोलिसांना पत्ता लागला व अचानक त्यांना अटक झाली.

वार्ताहर आणि फोटोग्राफरांनी पोलीस हेडक्वार्टरमध्ये त्यांच्याभोवती गर्दी केली. सर्वांना त्यांनी हसून अभिवादन केले. त्यांच्या डोळ्यात एक विलक्षण चमक आढळली. त्यांना प्रश्न विचारण्याची इतरांना मनाई होती.

श्री. मुजुमदार ह्यांचा जन्म १९१८ मध्ये सिलीगुरी येथे एका जमीनदार कुटुंबात झाला. १९३६ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. सध्या बांगला देशात असलेल्या पावना येथील एडवर्ड कॉलेजात ते नंतर दाखल झाले. दोन वर्षातच त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला आणि जलपायगुरीच्या किसान चळ-वळीत उडी घेतली. त्यांचे वडील कै. श्री. बिरेश्वर मुजुमदार हे विख्यात कॉंग्रेस नेते होते.

गृहमंत्री श्री. सुव्रत मुखर्जी श्री. चारु मुजुमदारांना भेटण्यास गेले. आपण खूप विस्तृतपणे राजकीय चर्चा करू या असे श्री. मुखर्जी म्हणाले, एवढेच नव्हे, "तुम्ही मला तुमचे राजकारण पटवून द्याल तर मी कदाचित् तुमच्या पक्षाला येऊन मिळेन." असेही श्री. मुखर्जींनी पुढे म्हटले. श्री. चारु मुजुमदार जास्त बोलले नाहीत. पण श्री. मुखर्जी परत जाण्यास उठले तेव्हा पटकन् मुजुमदार म्हणाले की "आमची चळवळ संपुष्टात आली आहे असे मात्र समजू नका हं!"

**—सौ. तारा पंडित**

प्रसिद्ध झाले

# एका पराभवाची कहाणी [ झुंड ]

लेखक : ब्रिगेडियर जॉन पी. दळवी

अनुवाद : अनंत भावे

# अय्ययो ! मद्रास्स !

## अशीच एक सायंकाळ....

नलिनी अंबाडे

तब्बल दहा वर्षांनी प्रथमच, पद्मश्री भिमसेन जोशींच्या सुश्राव्य शास्त्रोक्त संगीताचा कार्यक्रम, चौपाटीवरच्या विद्यापीठात ठेवलेला. विचार केला, संध्याकाळी चौपाटीवर हिंडावे, पाण्यात पाय भिजवीत ओल्या वाळूत भटकावे, भेळ खावी अन् 'मरीना बुहारी 'मध्ये झक्कपैकी चहा घ्यावा व गायनाला जाऊन बसावे. जोशीबुवा नक्कीच एकदोन तरी मराठी चिजा पेश करून, जाण्याचं चीज करतील !

आम्ही बाहेर पडून, माऊंट रोडवर आलो तर पोलीसांचा पक्का बंदोबस्त. जसजसा रस्ता मागे जाऊ लागला अन् समुद्रचौपाटीशी आलो, तो त्यांची संख्या वाढतच गेली. मद्रासच्याच काय, पण कुठल्याही चौपाटीवर रविवारी सायंकाळी गर्दी राहाणारच. पण आज तर तेथे फिरायला आलेल्यापेक्षा पोलीसच अधिक होते. लाठीधारी.. बंदुकधारी...लोखंडी टोप्यावाले, तर रिझर्वड् बटालियनवाले आणि जीपा धावताहेत भरभरून. फिरायला जाणारा प्रत्येकजण दुसऱ्याला विचारतोय 'एन्ना स्सामी, एन्न् ईद ? काय भानगड आहे हो ?' कुणीतरी उत्तर देतो—

'कामराजांची मोठ्ठी मिरवणूक आहे–मूक मिरवणूक.'

'कशाबद्दल ?'

'परवाच्या गोळीबारातील मृतात्म्यांना श्रद्धांजली म्हणून.'

'तुम्ही काय त्यासाठी थांबलात ?'

'नाही हो, हे पोलीस रस्तादेखील क्रॉस करू देत नाहीत. त्या मिरवणुकीला दोन तास अवकाश असेल अन् ह्यांनी केव्हापास्नं सगळी रहदारी तुंबवून ठेवलीय.

–आणि अशाप्रकारे रस्त्यांचे दुतर्फा गर्दी. अनावश्यक पोलीसांची धावाधाव अन् रहदारीचा खोळंबा. भीमसेनांच्या गायनास जाण्यासाठी पूर्ण एका मैलाचा फेरा घेतला. तेथेही बेताचीच गर्दी. ६॥ चा कार्यक्रम ७। वाजता सुरू झाला. एवढ्यात दोघेचौघे उठून बाहेर पळाले—

'कायहो, ऐकलं का ? मिरवणुकीवर लाठीहल्ला झाला !'

'खरंच ?'

' आधी दगडफेक झाली म्हणे न् नंतर लाठीचार्ज.'

' म्हणजे ज्यांना दगड लागले नाहीत, त्यांना लाठ्या. असंच ना ?'

' पण मिरवणूक तर ' मूक ' होती ना ?'

' अहो, ते सारं ठरलं होतं म्हणे !'

आत येऊन बसल्यावरही गायनाकडे लक्ष लागेना. ५ जुलैचा बुधवार संपूर्ण प्रांतभर ' बंद '.पाळला गेला होता. कशासाठी ? कोईमतूर-सेलम भागातील शेतकऱ्यांच्या चळवळीला सहानुभूती म्हणून. सत्तारूढ द्रमुक शिवाय सर्व पक्षांचा पाठिंबा. बंदचे दिवशी द्रमुकवाले दुकानदार दुकाने बंद करीनात. त्यामधून मग दगडफेक-लूटमार-जाळपोळ-पोलीसांचा लाठीमार-अश्रूधूर-गोळीबार हे सारे सोपस्कार पार पडले. प्रत्येक गावी हाच प्रकार थोड्या फार फरकाने झाला. दोन दिवसांनी पोलीस खात्यातर्फे अधिकृतपणे जाहीर झाले. ' प्रांतातील ज्या काही १०।१२ ठिकाणी गोळीबार झाला त्यात १४ मृत्यू, ४९ जखमी व २०,००० पेक्षाही अधिक धरपकड झाली !' चौदा मेलेल्यांपैकी, आठजण सेलम्‌मधील पेठानायकपालयम् ठिकाणचे. आठांनाही एकाच खड्ड्यात एकत्रच मूठमाती दिली. सात्तूर येथील श्रीनिवासन् फटाक्यांच्या कारखान्यात काम करणारा. पोलीसांनी अश्रूधूराची नळकांडी फोडताच त्याने धैर्याने जवळ जाऊन, ते वाळूत पुरून टाकावे. पोलीसांनी मग गोळीबार केला. अर्थातच पहिलाच बळी श्रीनिवासनचा ठरला. ह्या मृतात्म्यांना श्रद्धांजली देण्यासाठी, कामराजांनी मद्रासला ९ जुलैला ' मूक मिरवणूक ' आखली. १५ ते २० हजारांचा जमाव शांतपणे चालला होता. मौंटरोडवरील उंच एल. आय. सी. इमारतीजवळचे थिएटरामध्ये ' नान् येन् मिरंदेन ' सिनेमाची पोस्टर्स फाडली, कारण त्याचा नायक एम. जी. रामचंद्रन हा द्रमुकचा नेता. पुढच्याच प्लाझा थिएटरमध्ये ' पिल्लयी पिल्लै ' (म्हणजे बालके) हा तमीळ सिनेमा चालू होता, त्यावरही दगडफेक झाली. ह्या चित्रपटाचे कथालेखकच मुख्यमंत्री, तर नायक मुख्यमंत्र्यांचा सुपूत्र मुथ्यू आणि वितरण संस्थाही मुख्यमंत्र्यांचीच ! पुढच्याच चौकात अण्णादुराईचा पुतळा आहे. त्यांच्या जिवतपणीच तो बसविला होता. त्यावरही म्हणे दगडफेक झाली. आता, ' मूक ' मिरवणुकीतील काँग्रेसवाल्यांनी तोंडे बंद ठेवून, हात चालविले की, मिरवणूकीत गुंड घुसवून मुद्दाम असे करविले ते परमेश्वरच जाणो. मरीना चौपाटीवरील जमाव खूपच होता अन् तेव्हाच लाठीहल्ला झाला.

तमीळनाडूतील शेतकऱ्यांची चळवळ गेले ३–४ महिने चालू आहे. तिला निमित्त झाले वीज दरवाढीचे. देशातील सर्वांत अधिक पंपसेटस् तमीळनाडूतच असतील. इतके दिवस त्यांना वीजेचा दर १०·८ पैसे युनिट होता. आता परवापासून तो पहिल्या २०० युनिटस्‌करिता १२ पैसे झाला. ज्यांच्या मोटारी ५ हॉर्सपावरच्या किंवा त्याहून मोठ्या असतील, त्यांना पहिल्या ४०० युनिटस्‌ना १२ पैसे व पुढे सर्वांनाच जुनाच दर ! वास्तविक सर्वसाधारण शेतकरी दरमहा ८०० युनिटस्

जाळतो व पहिल्या २०० च्या वाढीव दराने त्याला फक्त २·४० पैसे दरमहा अधिक द्यावे लागतील. मग ह्या एवढ्याशा अल्प वाढीकरता ही "चौदा हुतात्म्यांची" चळवळ? आता जरा शेजारीपाजारी पहा. देशातील सर्वांत महागडा दर २३॥ पैसे युनिटचा उत्तर प्रदेशात आहे, तर दुसरा क्रमांक १९ पैसे युनिट बंगालचा. त्या खालोखाल १८ पैसेवाला महाराष्ट्र, तर चौथा १७·१ पैसेवाला गुजरात. देशातील सर्वांत स्वस्त वीज देणारा प्रांत म्हणजे म्हैसूर–फक्त १२ पैसे युनिट, त्यामानाने तमीळनाडूतील नवा वाढलेला दर म्हणजे ही स्वस्ताईच! चालू वर्षाचे सुरुवातीस तमीळनाडूने बजेटात तूट दाखविली, तेव्हा केंद्रानेच १६ कोटींची करवाढ करा असा सल्ला दिला. त्यानुसार वीजेचे दर वाढवून १०·७ कोटी, शेतसारा–माफी अजिबात रद्द करून ३ कोटी, पाणीपुरवठ्यावरील करवाढीने ३॥ कोटी, संपत्ती-करावर सरचार्ज, शेतसाऱ्यावर सरचार्ज असे काहीबाही करून, तमीळनाडूने सव्वाएकोणीस कोटींची तरतूद केली. आता द्रमुकचा दावा असा की, "करवाढ करण्यास केंद्रानेच (म्हणजेच कॉंग्रेसनेच) सांगितले व करवाढीविरुद्धची आजची "शेतकऱ्यांची चळवळ" प्रांतिक–कॉंग्रेसनेच चालविली आहे. सत्तारूढ (कॉंग्रेस) पक्षाचा हा दुटप्पीपणा आहे व केवळ आमचेच बिगर–कॉंग्रेस सरकार नीटपणे चाललेले त्यांना बघवत नाही म्हणून मुद्दाम अशांतता माजवीत आहेत."

१४ जुलैला ए. आय. सी. सी. तर्फे एक खास शिष्टमंडळ गोळीबार–दंगली झालेल्या ठिकाणास भेटी देण्यास गेले. त्यामध्ये श्री. व्ही. एन. गाडगीळ, तुलसी दासप्पा व श्री. भगत ही खासदार मंडळी आहेत. त्यांनी ठिकठिकाणच्या जळक्या लाकडांचे नमुने गोळा केले. लोकांच्या साक्षी घेतल्या. प्रत्येक ठिकाणी झालेली दंगल आपापसांतच झालेली आहे. द्रमुक विरुद्ध इतर सारे पक्ष. ठिकठिकाणच्या इतर पक्षांच्या ऑफिसेसवरच दंगलींचा डोळा होता हेही उघड झालेले आहे. अशा प्रकारचे पक्षीय शिष्टमंडळ पाहाणीस पाठविण्याचा प्रांतीय सरकारने निषेध केलेला आहे. चळवळीचे कारण कितीही किरकोळ असो, एक मात्र खरे की, द्रमुक पक्षाची पूर्वीची लोकप्रियता आज राहिलेली नाही. ती सावरण्यासाठी हे सारे प्रयत्न चालू आहेत. शेतकऱ्यांच्या एकूण दहा-बारा मागण्या आहेत. सारे पक्ष एकत्र झालेले आहेत. तिचे नेतृत्व कॉंग्रेसचेच माजी आमदार करीत आहेत. त्यांना सामना देण्यास, मारझोड करण्यासाठी "तमीळर पडै" (म्हणजे तमीळसेना) मदुरा येथे मागेच स्थापन झालेली आहे.

एकदम टाळ्यांच्या कडकडाटाने मी भानावर आले. पहाते तो समोरच्या स्टेजवर भीमसेन जोशीबुवा 'विठ्ठला! विठ्ठला!' म्हणून तोडे घेत होते. संध्याकाळचे चौपाटीवरचे फिरणे चुकले होते, भेळ मिळाली नव्हती, "बुहारी"मधील चहाही हुकला होता...आणि आताचे हे मराठी पदही हुकले होते...खरंच, अशीच एखादी सायंकाळ येते अन्......

□ □ □

# हिंदुस्थान अँटिबायोटिक्स

हिंदुस्तान अँटिबायोटिक्स लि. पिंपरी हा पुण्याजवळचा औषधी कारखाना, सरकारी उद्योगात मानाचे स्थान मिळवलेला कारखाना होता. परंतु सध्या तो घसरणीला लागला आहे. ६६–६७ साली १८०·३९ लाख रु. फायदा झालेल्या या कारखान्यास गेल्या वर्षी फक्त रु. १७·७९ लाख रु. फायदा झाला आहे. गेल्या काही वर्षातली या कारखान्याची वाटचाल चिंता करण्यासारखी आहे.

या कारखान्यात पेनिसिलीनचे उत्पादन ५५ साली सुरू झाले. पहिली १० ते १२ वर्षे चांगल्या प्रगतीची होती. या चांगल्या कार्याचा परिणाम म्हणून ६२ साली, जवळ जवळ २ कोटी भांडवल असलेला स्ट्रेप्टोमायसिनचा कारखाना बाहेरून कोणाचीही भांडवलाची मदत न घेता सुरू केला गेला.

त्याच सुमारास नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणे, येथे 'सी' जीवनसत्त्व (Vitamin C) बनवण्याची पद्धत शोधून काढली गेली. तिचा वापर करून 'सी' जीवनसत्त्वाचे उत्पादन करण्यासाठी सरकारची परवानगी मागितली गेली. त्याच प्रमाणे याचवेळी 'हेमायसिन हे नवीन औषध कंपनीच्या संशोधन शाळेत बनवले गेले. तेव्हा कंपनीस हेमायसिन' बनवण्यास परवानगी द्यावी, की 'सी' जीवनसत्त्व बनवण्यास परवानगी द्यावी याचा निर्णय घेण्यास सरकारला ४–५ वर्षे लागली. प्रथम हेमायसिनच्या उत्पादनास परवानगी मिळाली व तो कारखाना ६८ साली सुरू झाला. मागाहून 'सी' जीवनसत्त्वाच्या उत्पादनास परवानगी मिळाली. तो कारखाना या वर्षीच्या अखेरीस सुरू होईल. मूळ अंदाजाप्रमाणे 'सी' जीवनसत्त्वाची किंमत ७१·५१ रु. किलो झाली असती. त्या वेळी. परदेशाहून आयात केलेले तेच औषध ३० रु. किलो प्रमाणे मिळत होते व एक भारतीय कंपनी ५० किलो प्रमाणे हे औषध बनवीत होती. मध्यंतरी गेलेल्या काळामुळे कंपनीच्या 'सी' जीवनसत्त्वाची किंमत आता अंदाजे ९४·०८ रु. किलो होईल. परंतु गेल्या वर्षी सरकारने औषधाच्या किंमती ठरवल्या त्या प्रमाणे ही किंमत ७२·७० रु. किलो ठरवली आहे. किंमतीतल्या या तफावतीमुळे कंपनीचे 'सी' जीवनसत्त्व बाजारात खपणार कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे. कंपनीच्या सोईसाठी किंमत वाढवून दिल्यास त्याचा फायदा खाजगी उत्पादकांनाच अधिक मिळेल. हे झाले 'सी' जीवनसत्त्वाविषयी. आता हेमायसिनची कथा अशी – कारखान्याची उत्पादनक्षमता २५० किलोची आहे. प्रत्यक्ष उत्पादन ६८–६९ साली ११·४३ किलो, ६९–७० साली अजिबात नाही, ७०–७१ साली १७·०० किलो.

या औषधास अजून अमेरिकेच्या फेडरल ड्रग अॅडमिनिस्ट्रेशने मान्यता दिलेली नाही. म्हणून उत्पादन केले जात नाही, असे कंपनीच्या वतीने सांगण्यात येते. नवीन औषध निर्मितीच्या कंपनीच्या प्रयत्नांची अशी स्थिती असल्यामुळे भांडवल गुंतून पडले आहे.

पेनिसिलिन हे कंपनी बनवीत असलेले मुख्य औषध आहे. गली कित्येक वर्षे कारखान्याच्या क्षमतेपेक्षा कमी औषध बनविले जाते, कारण पेनिसिलीनची मागणी आता कमी झाली असे कंपनीतर्फे सांगण्यात येते. परंतु खाजगी कारखान्यांत मात्र जोराने उत्पादन चालू आहे.

गेल्या वर्षी स्ट्रेप्टोमायसिनचे उत्पादन २५ टनांनी कमी झाले. देशातल्याच सोयाबिनचा वापर करण्याच्या सरकारी आग्रहामुळे ते झाले. गेली १० वर्षे कारखान्यात अमेरिकेहून आलेले सोयाबिन वापरले जाते. त्याच्याऐवजी देशी सोयाबिन वापरण्याच्या प्रयत्नाससुद्धा कंपनीस यश आलेले नाही.

कारखान्यात औषधाच्या व्हायल्स भरण्याच्या यंत्रसामुग्रीचा अपुरा उपयोग केला जातो व ६६–६७ सालापासून तो हळूहळू कमीच होत आहे. ६०० लक्ष व्हायल्स भरू शकेल अशा यंत्राने ७०–७१ साली फक्त ४८० लक्षच व्हायल्स भरल्या. अशा प्रकारे यंत्रसामुग्रीचा अपुरा वापर करीत असतानाच, त्या यंत्रसामुग्रीत वाढ करण्यासाठी ७५ लक्ष रुपये खर्च करण्याची कंपनीची योजना आहे.

कारखान्याचे धोरण, औषधे मोठ्या प्रमाणावर (Bulk) खाजगी कंपन्यांना विकण्याचे आहे. या पद्धतीमुळे कारखान्याचा तोटा होत आहे. येथे उत्पादन केलेल्या स्ट्रेप्टोमायसिनची उत्पादनाची किंमत ३४५ रु. किलोस आहे. ते ग्लॅक्सो, फायझर, साराभाई वगैरे कंपन्यांना १९५ रु. किलोप्रमाणे विकले जाते. स्ट्रेप्टो-मायसिन बाटल्यांत भरून स्वतःच विकल्यास कंपनीस निश्चित फायदा होईल, परंतु सरकारने आखून दिलेल्या धोरणात ते बसत नसावे असे दिसते.

सर्वसाधारणपणे औषधी कंपन्यांना अतोनात फायदा होतो. परंतु या कार-खान्याची स्थिती दिवसेंदिवस बिघडत आहे. अकार्यक्षम व्यवस्थापन, अनेक मोठ्या अधिकारपदांवर अपात्र व्यक्तींची वशिलेबाजीमुळे नेमणूक, यंत्रसामुग्रीची होणारी हेळसांड, वगैरे कारणांमुळे परिस्थिती बिघडली आहे, असे युनियनचे मत आहे.

या साठीच इथल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची व गलथान कारभाराची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी गेली काही वर्षे युनियन करीत आहे. अनेक प्रसंगी अनेक मंत्र्यांच्या पुढे ही मागणी सातत्याने केली आहे, परंतु अजूनपर्यंत या मागणीची दखल घेतली गेली नाही. सरकारी उद्योगधंदे अधिक कार्यक्षमतेने चालले पाहिजेत हे सर्वजणच कबूल करतात. परंतु कृती करण्यासाठी सरकारची झोप केव्हा उडणार हा प्रश्न अनेकांना अस्वस्थ करीत आहे. ◻

[ फायनॅन्शियल एक्सप्रेस. दि. ४–५–७२ मधील एका लेखाचे आधारे ]

# स्त्री!

## कुटुंबाचा एक प्रमुख घटक

डॉ. सरोजिनी बाबर

स्थळकाळाच्या गरजेनुसार आपल्या अंगाच्या आत्मिक बळाचा वापर करून घरादाराला जिवाभावानं सांभाळणाऱ्या स्त्रीनं आपला स्वत:चा एकवेळ मनापासून अभ्यास करावा, समाजातील आपलं स्थान निश्चितपणे पक्के करून घ्यावं आणि त्याला अनुसरून आपल्या आशा आकांक्षांना मर्यादित करीत आपलं वागणं, बोलणं करावं या माझ्या मनोधारणेनं परवा विशेष उचल खाल्ली. आमच्या एका मैत्रिणीच्या घरात आम्ही चारचौघीजणी गप्पा मारीत बसलो होतो. तर अशाच इकडच्या तिकडच्या गोष्टी निघालेल्या. मनमुराद हसणं खिदळणं चाललेलं. तशी अवचितच एकजणीनं मला सांगितलं, 'या कमाल व किमान जमीन धारणेचा आणि नागरी मालमत्तेच्या संदर्भात तू बायकांची बाजू मांडावीस. कुटुंब प्रमुख म्हणून, कुटुंबातील एक स्वतंत्र घटक मानून – बायकांच्यावर अन्याय होता कामा नये.' मला हा प्रश्न नवीन नव्हता. या ना त्या संदर्भात ही भाषा यापूर्वीही अनेकदा झालेली. म्हणून मी होकारार्थी मान हलवीत फक्त मंदस्मित केलं. केवळ तिच्या म्हणण्याला दाद द्यावी या हेतूनं. पण माझी ही मुग्धता कुणाला खपली नाही. सगळ्याजणी माझ्यावर खेकसल्या, 'या बाबतीत बायकांना कोणीही कमी लेखता कामा नये. हसतेस काय नुसती ?' तरीही मी फक्त हसले. त्यांच्याकडे एकटक पाहात राहिले. कारण बायकांना स्वतंत्र अस्तित्व हवं आहे आणि पुरुषांच्या बरोबरीनं त्यांना घरच्या धनदौलतीत हक्क असला पाहिजे हे मान्य असूनही ही गोष्ट भीक मागून मिळणारी नव्हती! त्यासाठी कठोरपणानं कोणावर टीका करून अगर केवळ कायद्याचा आधार घेऊनही काही होणारं नव्हतं! या गोष्टी

या ठिकाणी लागू पडणारी एकच खरी मात्रा होती, माणुसकीची. समजुतीनं वागण्या बोलण्याची. घरच्या लोकांच्या मर्जीची. ज्यांच्या त्यांच्या घराण्यातील प्रतिष्ठेची. म्हणून माझ्या मते हा प्रश्न घरोघरच्या लोकांनी सोडवावा असा खाजगी होता! तो सोडविण्यासाठी सार्वजनिक व्यासपीठांवरील इर्षा घेऊन उठणाऱ्या भाषणांची, उपदेशांची किंवा मार्गदर्शनाची गरज आता राहिलेली नव्हती. या गोष्टी यापूर्वीच अनेकदा होऊन गेल्या होत्या. अशा मागण्यांचे ढीगच्या ढीग कित्येकदा उपसले गेले होते. म्हणून आमच्या बायकांनी खोटा आव आणीत असलेल्या मागण्या करू नयेत अगर त्या पायी निराशेच्या आहारीही जाऊ नये अशी माझी प्रामाणिक इच्छा होती. म्हणून मी आमच्या मैत्रिणींना शांत व्हायला सांगत बोलून गेले, 'असं चिडून काही होणार नाही...थोडा विचार कराल तर तुमच्या लक्षात येईल की, आपण आपल्याच हातानं हा दुजाभाव पत्करला आहे! मुकाटचानं पुरुषांची ताबेदारी स्वीकारली आहे!!' त्यामुळं त्या आणखीनच संतापल्या. एवढा वेळ खाल्याखुशालीत रंगलेली आमची बैठक मोडली गेली आणि प्रत्येकीनं दातओठ खात माझ्यावर तोंडसुख घेतलं, 'तू मूर्ख आहेस, एवढचासाठी इतकं शिकलीस काय?' मलाही मग बोलावं लागलं, 'शिक्षण घ्यायचं ते स्वतःच्या जिवावर सर्वार्थानं जगता यावं म्हणून!... आपल्याला हवं तसं आपण जगून दाखवलं पाहिजे. हिंमत धरून मुलांच्या बरोबरीनं मुलींना शिकवून ... इस्टेटीत हक्क दाखविण्यासाठी भीक मागण्यापेक्षा हे लाखपटीनं मोलाचं!...' पण माझं म्हणणं कुणालाच पटलं नाही. बसली बैठक मोडून सगळचाजणी निघून गेल्या. त्यांचे शिव्याशाप घेत मी माझ्या घरी आले. मला त्यांची कीव आली. आम्ही बायका किती वेडचा आहोत याचं दर्शन घडलं. या कल्पनेनं मी पुन्हा स्वतःशीच हसले. उठताबसता घरीदारी पुरुषांपेक्षा स्वतःला कमी दर्जाची मानून कित्येक वर्षं जगत आलेल्या स्त्रीनं एकदम बंडखोरी पत्करणं सोपं नव्हतं याची मला जाणीव होती म्हणून मी माझ्या मैत्रिणींनी माझ्यावर व्यक्त केलेल्या रागाला हसले होते! स्वतःला सावध करीत!

## वेदकालीन स्त्री

वास्तविक पहाता आर्यकालापासून ज्याचेबद्दल–

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः।

या आदरानं विचार केला गेला आणि पंचतंत्रामध्ये ज्यांचेसंबंधी–

न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते।

या शब्दांनी गौरवाची भाषा झाली त्या आम्ही स्त्रियांनी आमच्यासाठी अमूक एक हवं आहे अशी भाषा करावी लागण्याची वेळच का येऊ दिली हा महत्त्वाचा प्रश्न

यावेळी विचारात घेणं अत्यावश्यक ठरतं.

वेदकालीन युगामध्ये स्त्रियांबद्दल भाषा केली गेली ती उषा, सरस्वती, राका, कुहू, सूर्या, सावित्री, मेना या नावाच्या उच्चारानं आणि त्यांच्या सन्मानाचा निर्देश होत गेला तो–

यथा सिन्धुर्नदीनां साम्राज्यं सुषुवे वृषा ।
एवात्वं सम्राज्ञेधि यत्सुरस्तं परेत्य ।।
सम्राज्ञेधि श्वशुरेषु सम्राज्ञुत देवृषु ।
ननान्दुः सम्राज्ञयोर्ध सम्राज्ञुत श्वश्र्याः ।।
(अथर्व. कां. १४।१।४३,४४)

या रीतीनं. सर्व नद्यांमध्ये बलवान होऊन ज्याप्रमाणं सिंधु नदी ही आपलं साम्राज्य प्रस्थापित करू शकली त्याप्रमाणं नववधूनं आपल्या पतीच्या घरी आल्यानंतर सम्राज्ञी व्हावं ही अपेक्षा येथे व्यक्त केली गेली आहे. सासूसासरे, दीर व नणंद यांची मनं जिंकून तिनं सम्राज्ञीपद भूषवावं ही या श्लोकातील कल्पना आजच्या काळालाही लागू पडणारी आहे. विवाह समयी उच्चारल्या जाणाऱ्या अशा मंत्रा-वरून त्या वेळची कन्या–नववधू–ही विवाहसमयी शिक्षित असली पाहिजे हे उघड होतं. इथं शिक्षित याचा अर्थ केवळ अक्षर ओळख असलेली, शिकलीसवरलेली, एवढाच होत नाही. शिक्षित म्हणजे ज्ञान ग्रहण करण्यास पात्र ठरलेली, सुसंस्कृत, मनाचा विकास झालेली अशी. आजच्या शाळा-कॉलेजमध्ये जाऊन विद्या संपादन केलेल्या प्रौढ मुलींकडूनही हीच अपेक्षा आहे.

गृहिणी या दृष्टीनं आपल्या वाट्याला येणारी भूमिका पार पाडताना आमच्या स्त्रियांनी सामाजिक स्थैर्य राखण्याची आजवर शिकस्त केली आहे. म्हणून गृहिणी म्हणजेच घर या भाषेत तिचा गौरव केला गेला. आपलं बोलणं, चालणं, वागणं हे तिनं आपल्या शालीनतेला शोभेल असंच राहील याची खबरदारी घेतली. त्यामुळं तिचा घरात व समाजातही दरारा राहिला. एवढंच नव्हे तर गार्गी मैत्रेयीसारख्या स्त्रियांनी वादविवाद सभामधूनही प्राविण्य मिळविलं आणि म्हणूनच ऋग्वेदाच्या पहिल्याच मंडळातील तिसऱ्या सूक्तामधील बारावी ऋचा नोंदली गेली ती–

' सरस्वती आपल्या पराक्रमाने मोठ्या उदक प्रवाहाला जोराने चालना देते. ती अखिल बुद्धिमत्तेची अधिष्ठात्री होय. ' या रीतीनं.

शिवाय स्त्रीच्या ठायीच्या आत्मिक बळाचा कालमानानुसार तिनं केलेला उपयोग लक्षात घेता वेदकालीन मंडळींनी सौंदर्यसंपन्न उषेच्या रूपानं तिचं दर्शन घेतलं तिच्याकडून अपेक्षा केली ती अशी–

' हे गोसंपन्न, अश्वसंपन्न आणि तेजःसंपन्न उषे, हे वाग्देवते, तू आज येथे आम्हास प्रकाश आणि धन दे...हे द्यूचे कन्ये उषे, तू आम्हासाठी धनासहित प्रकाश

दे. हे तेजस्विनी देवी, उदार अशी तू मोठ्या संपत्तीने आणि वैभवाने युक्त आहेस. ...तू आल्हादकारक प्रकाशाने शोभायमान हो आणि देव यजनकाळी प्रकाशणारी तू आम्हांला विपुल सौभाग्य घेऊन ये. ' ऋग्वेद मण्डल पहिले. सूक्त १२ व ४८ वे.

म्हणजे त्या वेळची स्त्री ही आपला सामाजिक व सांस्कृतिक दर्जा ओळखून अभिमानानं जगली. लोकजीवनाचं परिपालन, पोषण व संरक्षण करीत ती गृहलक्ष्मी म्हणूनच सर्वत्र वावरली. निरपेक्ष मनानं तिनं पोटभर दान केलं. कमालीची सहनशीलता पदरी बाळगून त्यागात आनंद मानला. म्हणून दुर्गा नावाच्या ऋषीकन्येने आपल्या ' देवी सप्तशती ' ग्रंथामध्ये विवाहाची अपेक्षा ठेविली ती, ' जो मला युद्धामध्ये जिंकील, जो माझा गर्व हरण करील, जो ह्या जगात माझ्या बरोबरीचा असेल तो माझा पती होईल. ' या निर्धारानं. त्यामुळं त्या वेळच्या स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तित्वाला स्थैर्य लाभू शकलं. शक्तीची अधिष्ठात्री देवता म्हणूनही तिचा लौकिक झाला. शिवाय–

प्रजननार्थं महाभागाः पूजार्हा गृहदीप्तयः ।
स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति कश्चन ॥

(मनु. ९. २६ )

या शब्दांच्या सहाय्यानं गृहलक्ष्मी म्हणूनही तिचा गौरव केला गेला. माता म्हणून ती वंदनीय ठरली आणि घरात चांदणीप्रमाणं ती सर्वांना प्रकाश देणारीही मानली गेली. संसारामध्ये अखंडपणे तेवणारा नंदादीप म्हणून तिचं स्थान श्रेष्ठ ठरलं. समाधानीवृत्तीच्या बळावर तिनं घर जिंकलं. संसाराला स्थैर्य प्राप्त झालं ते तिच्यामुळं.

परंतु काळ बदलला गेला. वेदकालीन जीवनातील स्त्री स्वातंत्र्याचा अतिरेक झाला आणि मनुस्मृतीनंतर हळूहळू स्त्री जीवनात परावलंबित्व येत गेलं. समाजमनामध्ये स्त्रीचं स्थान हे पुरुषाच्या मानानं बरोबरीचं न रहाता ते दुय्यम प्रतीचं ठरत गेलं. स्त्रियांनी पतीला देव मानलं आणि खुशीनं दास्यत्व पत्करण्याच्या वृत्तीच्या त्या आहारी गेल्या. घरकाम हे त्यांचं कार्यक्षेत्र ठरलं आणि पुरुष प्रधान संस्कृतीच्या कुळाचारात त्यांनी जणू मुक्याचं व्रत धारण केलं. त्यांच्या जीवनात गवसणाऱ्या फावल्या वेळाचा त्यांनी धार्मिक कृत्यांसाठी उपयोग केला. अंधश्रद्धेला बळी पडून त्यांनी उपासतापास करीतच आपल्या सुखाच्या कल्पना राबविल्या. मुलांसारखं शिक्षण त्यांना घेता आलं नाही. समाजजीवनात बालविवाह रूढ झाले. त्यामुळं पुरुष म्हणतील ते प्रमाण मानून त्यांनी आपलं आयुष्य वेचलं !

ब्रिटिशांच्या राजवटीत मात्र स्त्री जीवनासंबंधीच्या खुळचा समजुतींना कलाटणी मिळाली. मिशनऱ्यांनी मुलांप्रमाणं मुलींनाही शिक्षण देण्याला प्रारंभ केला. आमच्याकडील समाज सुधारकांनीही या कामी पुढाकार घेतला. राजा राममोहन

रॉय, आगरकर, महात्मा फुले, महर्षी कर्वे इत्यादींनी या संदर्भात अपार मेहनत घेतली. हळूहळू स्त्रीशिक्षण वाढीस लागलं. समाज सुधारकांनी स्त्री जीवनात क्रांती घडवून आणण्यासाठी कायदे करून घेतले. स्त्रियांना समान हक्क मिळावेत म्हणून चळवळी निघाल्या. पण समाज मनात या चळवळींनी पक्कं स्थान निर्माण करणं फार जड गेलं. धार्मिक रूढींना गच्च धरून बसलेल्या कर्मठ पुरुषांप्रमाणं खुद्द स्त्रियांनीही या कामी विरोध केला ! स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे हा पुरुषांचा अहंकार त्यामुळं आणखीनच बळावला ! त्यागावर आधारलेलं स्त्री-जीवन अधिकच त्यागी बनलं !

## अनुकरणवृत्ती

परंतु स्त्री शिक्षणाचा जसजसा प्रसार होत गेला आणि स्वातंत्र्य चळवळीचं लोण आमच्या देशात आलं तसा तसा स्त्री दास्यविमोचनाचा विचारही प्रकर्षानं पुढं येत गेला. सतीसारख्या वेड्या समजुतीवर आधारलेल्या रूढींना कायद्यानं बंदी घातली गेली. समाज मनात स्त्री स्वातंत्र्यासंबंधीचे विचार बिबविले जाऊ लागले. स्त्रिया शिकू लागल्या. स्वतंत्रपणे विचार करू लागल्या. परंतु दुर्दैव असं की, समानहक्क म्हणजे जे जे पुरुष करील ते ते आपणही करावं या खुळ्या कल्पनेच्या वावटळीत त्या गवसल्यानं त्यांच्या विचाराला कोतेपणा येत गेला. सामाजिक जीवनात त्यामुळं सत्तास्पर्धेचं युग आलं. भूतकाळावर उभं राहून भविष्य-काळावर झेप घेण्याची वृत्ती सरसावून पुढं आली. तथापि पुरुषांनी कायदा करून दिलेले समानहक्कही सामान्य स्त्रियांना उपभोगता आले नाहीत ! विवाहानंतर झालेला विवाह हा सरकारदरबारी नोंदला गेलाच पाहिजे याला सर्वसामान्य बायकांनीच विरोध मांडला ! आणि वडिलांच्या इस्टेटीमध्ये मुलाच्याबरोबरीनं मुलींनाही हक्क प्राप्त झाला असता जाणकार मुलींनीदेखील वडील किंवा भाऊ सांगतात म्हणून या इस्टेटीवरील आपला हक्क लेखी नकार नोंदवीत घालवून टाकण्यास मागंपुढं पाहिलं नाही ? अनेक ठिकाणी हे घडून गेलं.

म्हणून मनात येतं की, कमाल जमीन धारणेच्या किंवा शहरी मालमत्तेच्या सदर्भात कायद्यानं स्त्रीला कुटुंबात स्वतंत्र स्थान दिलं गेलं तरी प्रत्यक्ष व्यवहारात तिची काय अवस्था राहील हरी जाणे. माझ्या दृष्टीनं अशा बाबतीत कायदेकान तोकडे पडतात. ही बाब माणुसकीनं, विश्वासानं, आपु:कीन वागण्याची आहे. त्या संदर्भातील स्वातंत्र्य किंवा व्यक्तिमत्व हे मागून मिळणारं नाही. ते प्रेमान घर जिंकल्यान साध्य होणारं आहे. त्यासाठी काही ···श्चर्येची गरज आहे.

मूल जन्माला आल्यापासूनच मुलगा व मुलगी हा भेदभाव घरात येता कामा नये. हा मुलगा आहे म्हणून त्याला खूप खाऊपिऊ घालायच, शिकवायचं आणि ही मुलगी म्हणून तिला अशी तशी वाढवायची ही वृत्ती घातक आहे. मुलाप्रमा मुलगीही स्वत:च्या जिवावर जगणारी निपजली पाहिजे. त्यासाठी ति ·

शिक्षणाची गरज आहे, ही जाणीव पालकांना असली पाहिजे. मात्र मुलींनही जे शिक्षण घ्यायचं ते आयुष्याला उपयोगी पडणारं असंच घेणं अगत्याचं आहे. नाहीतर तो केवळ दिखाऊपणा ठरेल. शिक्षण संपादून मिळणारी पदवी ही वस्त्रालंकारां-सारखी शोभेची वस्तू होता कामा नये.

परवा आमच्या ओळखीत एकाकडे मुलासाठी मुलगी पहायचा विषय निघाला होता. म्हणून मी म्हटले की, "प्रकृतीनं धडधाकट पहा. ती धीट असावी. खंबीर मनोवृत्तीची असावी. सोशीक, सुसंस्कृत हवी." तशी कोणीतरी माझ्या हातात एक कागद ठेवला न् वाचा म्हटलं. माझी कल्पना एखाद्या मुलीची कोणीतरी कळविलेली माहिती असेल. म्हणून पहातेय तर एका ज्योतिष्यान मुलींची सांगितलेली पारख त्या कागदावर टिपलेली होती ?

"प्रमाणाबाहेर लांब केस असमाधानी स्वभाव दर्शवितात; तर फार आखूड केस गरिबी दर्शवितात. मोठं कपाळ मंगळाचं अस्तित्व दर्शवितं, तर भव्य कपाळ आणि मोठे डोळे उदार मनाचे द्योतक ठरतात...कुरळे केस आणि मंडलाकृती मुखकमल हे अत्यंत यशस्वी व भरभराटीचे जीवन व्यतीत होणार असल्याचे द्योतक आहेत. स्त्रीच्या भुवया कपाळावर जोडलेल्या असतील तर ती फार कामुक असते. चंद्रकोरी प्रमाणे वक्राकार भुवया चांगली मनोवृत्ती व साहित्यिक पिंड दाखवितात...भरीव, मोठे, उभार उरोज व त्याच्याशी स्पर्धा करणारे नितंब सुखी, उत्साही, आनंदी जीवनाचे द्योतक मानतात तर दंडाकडे झुकणारे उरोज व छातीचा गळयाखालील भाग भरलेला असणे हे अखंड सौभाग्यवतीचे लक्षण आहे..."

वधूपरीक्षेच्या वेळी उपयोगी पडणारे हे ठोकताळे वाचून मला आश्चर्य वाटलं. कुणा नाही कुणाला आलेले अनुभव इथे या रीतीनं टिपले गेले होते. त्या वर्णनावरून सगळंच खरं ठरेल याची शाश्वती नव्हती ! म्हणून मी तो कागद बाजूला ठेवला आणि म्हटलं, "प्रत्यक्ष कर्तृत्वाला अधिक किंमत द्यावी हे चांगलं...पत्रिका बघून ते कळत नाही, माणूस प्रत्यक्षात कार्यक्षम पाहिजे" त्यावर मग खूप चर्चा झाली आणि मला मूर्खात काढून ती बैठक फिसकटली...मुलगी लाखात उठून दिसेल अशी देखणी पाहिजे. एवढाच सर्वांचा अभिप्राय होता !...जीवननिष्ठा निर्माण करणाऱ्या संस्कारक्षम मनाची गोष्ट त्यापुढं फिक्की पडली होती ! आणि—

## अतिरेक !

क्रीडा शरीर संस्कारं समाजोत्सव दर्शनम् ।
हास्यं परगृहे यानं त्यजेत प्रोषित भर्तृका ।।

ज्या स्त्रीचा पती देशांतरी गेला असेल त्या स्त्रीने खेळणे, न्हाणे, माखण उत्सवाला जाणे, हसणे किंवा दुसऱ्याच्या घरी उगाचच जाण ह्या गोष्टी करू नयेत याज्ञवल्क्यांची कल्पना आता मागासलेपणात मोडणारी ठरली होती !...बायकांन

मनाला येईल तसं वागू देणारं स्वातंत्र्य हवं होतं. त्या कारणानं वडिलधाऱ्यांना अपमान मिळावा लागून त्यापायी होणाऱ्या जखमा सोसाव्या लागत होत्या ! ...

मध्यंतरी मी माझ्या एका स्नेह्यांकडून सहजच निघालेल्या गप्पांमधून एक काळजाचा लचका तोडणारी गोष्ट ऐकली. जीव भेदरून गेला. खूप भीती वाटली. भयंकर घाबरायला झालं...' कोण्या एका भव्य हॉटेलाजवळ म्हणे रविवारी पाच पंचवीस गाड्या गोळा होतात. त्या गाड्यात घरच्या मालकिणी नटून थटून नवऱ्याबरोबर आलेल्या असतात ! त्यांना गाडीतच ठेवून हे नवरे त्या आलिशान हॉटेलात वर जातात. अंधेऱ्या खोलीत ते एकत्र येतात. तिथं पेटी असते. त्या पेटीत मोटारीच्या चाव्या टाकल्या जातात. मग पेटी खूप हलवली जाते. नंतर ज्याच्या हाती जी चावी लागेल त्यानं ती घ्यायची आणि ती चावी लागणाऱ्या गाडीतील स्त्रीच्या सहवासात ती रात्र काढायची ?'...

तर हे ऐकून मला गरगरल्यागत झालं. म्हणून मी त्या स्नेह्यांचं डोंबल काढीत त्यांच्यावरच खूप भडकले ! ...' चिडून नाही होणार. ही वस्तुस्थिती आहे.' स्नेह्यांनी शांतपणानं पुन्हा खुलासा केला. मला भोवळ आली चक्क ! ...

यातलं खरं असो खोटं असो. तोल सोडून बायकांचं स्वैराचारानं वागणं होणार असेल तर त्यांना स्थावर किंवा जंगम इस्टेटीत स्वतंत्र घटक म्हणून हक्क द्यायचाच कशाला ? मला या प्रश्नानं त्या दिवशी एकसारखं भंडावून सोडलं. म्हणून मी विचार केला, ' असल्यांच्या हातात फार पैसा अगर धनदौलत नसलेलीच बरी ! ... आयुष्याचा बट्ट्याबोळ होण्यापेक्षा आमच्या बायका तशाच असू देत. नांदू देत घरंदाजपणानं. बसू दे असा स्वैराचाराला आळा ! बसू दे खीळ !'...आणि मनाशी पक्कं केलं की, कायद्याच्या मागं लागून स्वतंत्र व्यक्तित्व मिळविण्यापेक्षा बाईनं ते आपल्या कर्तृत्वानं मिळवावं हेच उत्तम. तिथं कोणी तिला ' का ?' म्हणायला धजणार नाही की, हाती आल्या संपत्तीचा गैरवापरही तिच्याकडून होणार नाही ! उत्तम गृहिणी म्हणून तिच्या हातून होणारी कामगिरीच एवढी जबरदस्त व्हावी की, उभ्या घरानं तिच्यापुढे आदरानं नतमस्तक व्हावं ! ...



नजिकच्या भविष्यकाळात साखरेची मागणी वाढणार
हे सांगायला कोणी अर्थज्ञ हवा असे नाही.
पण या वाढत्या मागणीला तोंड देण्यासाठी
योग्य धोरण व कडक अंमलबजावणीची गरज आहे.

# गोड साखरेचे कडू राजकारण

प्रा. राम बिवलकर

या लोककल्याणकारी राज्यात साखरेसारख्या अनेक दैनंदिन गरजांच्या वस्तूंची टंचाई असावी, भाव सतत भडकत राहावेत, त्या महागड्या वस्तूही हव्या तेव्हा हव्या तेवढ्या प्रमाणात उपलब्ध होऊ नयेत, पण याची खंत व्यापाऱ्यांना नसावी, उद्योगपतींना नसावी, शासनाने तर, त्यातही राजकारण खेळावे ! याला काय म्हणावे ? 'बाबांनो, तुमचे राजकारण होते पण आमचे मात्र मरण ओढवते' असे म्हणण्याची पाळी सामान्य माणसावर आली आहे. १९६९–७० सालच्या हंगामात साखरेचे ४३ लक्ष टन उत्पादन झाले. आधीच्या वर्षीची १५–१६ लक्ष टन साखर पडून होती. वाटले होते, आता सरकार साखरेचा थोडा फार साठा करून ठेवील, साखर धंद्याला नियंत्रित मोकळीक देईल, साखरेची टंचाई दूर होईल, भाव उतरतील, सणासुदीला साखर खाताना ती जरा अधिक गोड लागेल ! पण गेल्या तीन वर्षांत साखर ६० टक्के खुली करूनही साखरेचे भाव काळ्या-बाजारापेक्षा अधिक चढून बसले. सरकारी दुकानातही साखरेचा भाव दीड रुपया-वरून दोन रुपयांवर चढला !

या देशात कापडाच्या धंद्याखालोखाल दुसरा महत्त्वाचा उद्योग म्हणजे साखर कारखानदारी. सहाशे कोटी रुपयांचे भांडवल त्यात गुंतले आहे. सव्वादोन लाख कामगारांना तो रोजगार पुरवतो. २ कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तो जगवतो. त्याच्या पदरी, प्रतिवर्षी ४०० कोटी रुपये तो घालतो. वर्षाभरात कर सोडून ५३५ कोटी रुपयांच्या साखरेचे तो उत्पादन करतो. ऊसावरी कर, एक्साइज ड्यूटी, आयकर अशा विविध प्रकारे १७५ कोटी रुपयांची भर तो सरकारी तिजोरीत टाकतो. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत साखर उद्योगाला किती महत्त्वाचे स्थान आहे हेच ही आकडेवारी बोलून दाखवते. पण अशा महत्त्वाच्या उद्योगाच्या

वार्षिक उत्पादनात प्रतिवर्षी चढउतार चालावेत, सरकारने प्रतिवर्षी आपल्या साखरेबाबतच्या धोरणात बदल करीत राहावे, साखरेचे उत्पादन घटत राहावे, किमती वाढत जाव्यात, या गोष्टी त्या धंद्यालाही शोभादायक नाहीत आणि त्या सरकारची इभ्रतही वाढवीत नाहीत.

## ठाम धोरणाचा अभाव

ऊसासारख्या जलद नाशिवंत कच्च्या मालावर प्रक्रिया करणारा हा उद्योग त्यामुळे या उद्योगाला आपल्याला लागणारा बहुतांश ऊस निर्मिण्याकरता सतत प्रयत्नशील राहावे आणि तरी सुद्धा वर्षाचे ४–५ महिने या उद्योगाची चक्रे बंद पडतात. हवामानाची लहर फिरली, की ऊसाचे उत्पादन घटावे आणि साखरेच्या उत्पादनावर त्याचा परिणाम व्हावा, साधारणतः या देशात निर्माण होणाऱ्या ऊसापैकी ४० टक्के ऊस साखरकारखान्याच्या चरकात शिरतो. बाकीचा ६०% ऊस गुळाच्या काहीलीत चढतो अगर खांडसरी साखर उत्पादनाच्या कामी येतो. साखरधंद्यातच फक्त कारखानदारी. त्यामुळे त्यावर नियंत्रणे लादणे सोपे. जनतेलाही आपण काही करतो आहोत असे दाखविता येते ! म्हणून सरकारची सारी नियंत्रणे साखर उत्पादनावर वा वाटपावर बसतात. बरे, या नियंत्रणाच्या धोरणात तरी काही सुसूत्रता असावी ! तेही नाही. कधी कंट्रोल, कधी डीकंट्रोल परत कंट्रोल, मग अर्धवट कंट्रोल असा खेळखंडोबा वर्षावर्षाला चालू आहे. दूरवर विचार करून साखर धंद्याबाबत काही ठाम धोरण ठरविणे सरकारला गेल्या वीस वर्षांत जमलेले नाही !

साखरेची वाढती मागणी व लहरी उत्पादन यात प्रतिवर्षी पडणारी तफावत दूर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे अजूनही सरकारच्या मनात येत नाही. १९६९–७० साली उत्पादन ४३ लक्ष टन झाले. ७०–७१ साली ते ३८ लाख टनांवर घसरले. यंदा १९७१–७२ साली ते ३१ लाख टनापर्यंत आले आणि साखरेची वार्षिक मागणी मात्र ३९–४० लाख टनावर जाऊन बसली.

१९७०–७१ साली निर्नियंत्रणाचे धोरण ठरले. १९७१–७२ सालीही ते चालू राहिले. साखर रेशनमध्ये होती तेव्हा काळाबाजार होई म्हणून हा उपाय होता. ग्राहकाला दोन रुपये किलोने खुल्या बाजारात साखर मिळावी असा अंदाज होता. पण या धोरणातून साखर तीन–साडेतीन रुपये किलोवर जाऊन बसली ! खुल्या बाजारातील किमतीनी काळाबाजारालाही 'परते सर' म्हटले ! ऐन लग्नसराईत साखर दुर्मिळ झाली. म्हणून सरकारने साखर-वाटपावर या वर्षाच्या जानेवारी महिन्यात परत अर्धवट नियंत्रण जारी केले ! कारखानदारांना ६०% साखर नियंत्रित दराने सरकारला विकायला भाग पाडले. पण यावेळी साऱ्या कारखानदारांचा माल सरकार एकाच दराने खरेदी करणार नाही. विभागवार तो कमी अधिक ठेवला आहे. म्हणजे काय, दक्षिणेत महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तमिळनाडू या

राज्यातील कारखाने कार्यक्षमतेने चालतात ना ? इथल्या उसातून १२ टक्क्या-पर्यंत साखर पदरात पडते ना ? त्यांनी गेल्या ५–६ वर्षांत आपली उत्पादनक्षमता वाढविली आहे ना ? त्यांना सरकार दर क्विंटलमागे रु. २५।– एवढा कमी दर देणार आहे. या उलट उत्तर–बिहार व यू. पी. तील साखर कारखानदारी अकार्य-क्षम आहे ना ? (१२ ऐवजी ७।८ टक्के साखर ते गाळतात !) तिथली उसाची शेती कमी प्रतीचा कमी ऊस एकरी पैदा करते ना, त्यांना सरकार जास्त भाव देणार ! सरकार हे विचारात घेत नाही की जे कारखाने अकार्यक्षम आहेत, त्यांच्या साखरेला अधिक भाव दिला म्हणून ते कार्यक्षम कसे होतील ? हे मरते कारखाने तगवून त्यांच्या बरोबर ग्राहकांना व कार्यक्षम कारखानदारांना मारून, सरकार साखरेचे उत्पादन वा वाटप कसे सुधारणार ? या धोरणामुळे दक्षिणेतील उसा-खालचे क्षेत्र कमी झाले, उत्पादन घटले, कारखान्यानी फटका खाल्ला तर त्यात ग्राहकांचा फायदा काय होणार ? साखरेचे उत्पादन वाढविण्याच्या धोरणाचा कृषिमंत्री वारंवार उच्चार करतात ! ते धोरण यातून कसे साधेल हे एक सरकारच जाणे !

कार्यक्षमतेला शिक्षा करणारे व अकार्यक्षमतेला भोंवळणारे हे धोरण आत्म-घातकी तर आहेच पण त्याला उत्तर–दक्षिण राजकारणाची दुर्गंधी येत आहे ! या देशात प्रामाणिकपणा हा गुन्हा ठरला आहेच. आता कार्यक्षमता हाही गुन्हा ठरला आहे. धंदा वाढवून उत्पादन वाढविण्याची दक्षिणेतील साखर कारखान्यांची उमेदच या धोरणाने खच्ची झाली आहे.

दक्षिणेतील साखर कारखान्यांची बाजू घ्यावी म्हणून हे लिहिले नाही. ग्राहकांना कमी भावात साखर मिळावी म्हणून महाराष्ट्रातल्या सहकारी कारखान्यांनीही कधी इच्छा दाखविलेली नाही अगर तशी कृती केलेली नाही ! मुद्दा एवढाच की, या पक्षपाती धोरणाने, उत्तरेच्या साखर कारखानदारांचे दिल्लीवर वजन पडते, दक्षिणेतल्या मंडळींचे पडत नाही, हे सिद्ध केले आणि साखर–धोरणात उत्पादन वाटपाच्या काळजीपेक्षा सरकारला राजकारण अधिक महत्वाचे वाटते हेही दाखवून दिले आहे !

साखर-धंद्याच्या मूळ दुखण्याशी या धोरणाचा सुतराम संबंध नाही. टंचाई उभी राहिली, की कसल्या तरी नियंत्रणांची मलमपट्टी मारू जावे, पण ते औषधच रोगापेक्षा भयंकर ठरावे असे अनेकवार झाले आहे. साखरेबाबत निर्नियंत्रणाचे धोरण चालू असताही साखर कारखानदारांना ठरवून दिलेल्या क्षेत्रातूनच ऊस खरीदण्याची सक्ती होती. ऊस उत्पादकांना, ऊसाची सरकारने ठरवून दिलेली किंमत त्यांना द्यावी लागत होती. त्यांनी मात्र भाव जास्त मिळाला म्हणून गूळ-वाल्यांना ऊस विकला तरी चालत होते. पण कारखानदारांनी उस-उत्पादनाची विक्रीही ठरीव नियंत्रित दराने करायची होती. टंचाई निर्माण झाली की नियंत्र-

## घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का ?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. **निरोध** वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. **निरोध** हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे **रबरी** संतति-प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे **निरोध** अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत ?

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध

**लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक**

केमिस्ट, वाणी जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/480

णांचा भाव वाढावा, किमती ठरवून दिल्या जाव्यात, पण त्या ठरविताना ऊस उत्पादकांना आपण चढत्या किमती ठरवून दिल्या आहेत हे सरकारने विसरावे ! कोटे माथी यावेत ! ते कोटेही वेळेवारी उचलले न गेल्याने भांडवल गुंतून पडावे गोडाउन्स भरून राहावीत, भाडी व व्याजे डोक्यावर बसावीत ! साखरेच्या किमतीवरच फक्त नियंत्रण गूळ वा खांडसरी साखरेच्या किमती उच्च ! मग ऊस उत्पादकांनी साखर कारखान्यांना ऊस न विकता, चढेभाव मिळतात म्हणून ऊस गुळवाल्यांना ! साखर कारखानदारांनी ठणाणा करावा !

## दूरवरचा विचार नाही

६९–७० साली ४३ लाख टन उत्पादन झाले. ज्यादा साखर सरकारने विकत घेऊन तिचा साठा करून ठेवावा की नाही ? म्हणजे कारखानदारांचे साठवणुकीवर, कब्जावर, भाड्यावर खर्च झाले ते ६ कोटी रुपये तरी वाचले असते. निर्नियंत्रणांच्या वेळी साखरेचे भाव वाढू लागताच ही सरकारी साखर बाजारात आणून साखरेची किमत रोखता आली असती. पुन्हा अर्धवट नियंत्रणे बसवावी लागली नसती ! पण सरकारच्या कुठल्या कृतीत दूरवरचा विचार आजवर कधी कुठे दिसला आहे ?

नजिकच्या भविष्यकाळात साखरेची मागणी वाढणार आहे हे सांगायला कुणी फार मोठा अर्थज्ञ हवा असे नाही. आज साखरेचा दरडोई वार्षिक उपभोग ७–५० किलो एवढा झाला आहे. हा या देशातील विक्रम असला तरी जगातील इतर देशांच्या मानाने तो न्यूनतम आहे. गुळाच्या वा खांडसरीच्या किमती व साखरेची किमत यातली तफावत कमी झाली तर साखरेची मागणी वाढेल. शिवाय १९५७ सालापासून घट सोसूनही आपण साखरेची निर्यात सुरू केली आहे. साखरेने परदेशी चलन मिळवावे म्हणून हा आटापिटा. आज खुल्या जागतिक बाजारपेठेत आपण साखर विकीत असल्यामुळे व त्या किमती कमी असल्यामुळे साखरेच्या निर्यातीत अजूनही आपण खोटच खात आहोत. पण आपली साखर आयात करणाऱ्या देशांशी विशिष्ट दराने साखर पुरविण्याचे करार झाले तर आपल्याला बरा भाव मिळेल. परदेशी चलनही मिळेल. १९७०–७१ साली ३ लक्ष १८ हजार टन साखर निर्यात करून आपण २५ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळविले. ७१–७२ साली आपण ४ लक्ष टन साखर निर्यात केली. तिने ३८ कोटी रुपयांचे परकीय चलन आणले. शिवाय आपली साखर, अमेरिका, कॅनडा, ग्रेड ब्रिटन, जपान यांसारख्या देशात जात असल्याने या परकीय चलनाचे महत्त्व अधिक आहे. म्हणजे भारताच्या परदेशी व्यापारात साखर महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल. पण त्याकरता साखर उत्पादनाचा खर्च कमी व्हायला हवा. (आज तो जागतिक किमतीपेक्षा जास्त आहे !) उत्पादन वाढायला हवे. कारण घरची वाढती मागणी सांभाळून ही दारची फायदे-

पृष्ठ ३८ वर

# कविता

## महापूर

मनाच्या मनात
आज उजाडले
तांबडे फुटले
चोहीकडे !

सुवर्ण शेंदरी
उजेड सांडला
घडा लवंडला
सूर्यमुखी !

चैतन्याच्या लाटा
उसळल्या उरी
भिंती देहधारी
ढासळल्या !

लोट फुंफाटत
बाहेर पडले
आला महापूर
वैफल्याचा !

—विनायक साने

## आंस

काळे काळे ढग
आले बरसले
भिजवून गेले
—अंग अंग !

खुळ्या श्रावणाचा
सुगंधीत वारा
हर्षाच्या या धारा
—मोहविती !

मन मोर धुंद
कोयल पंचमात
सारे धुंदफुंद
चोहीकडे !

माझे मन श्रांत
एक आंस व्याकुळ
उदास ध्यास
—सजणीचा !!

—विनायक साने

## आठव

आकाशाची निळसर पाखर
झेलुन फुलवित अंगावरती
क्षणात झाली गंधवती !

गंधवती मातीला स्पर्शून
पानांच्या सळसळीत मिसळून
क्षणात झाली स्वप्नवती !

स्वप्नवती एखाद्या वेळी
स्वप्नामध्ये बहरून जाता
क्षणात आठव उमलून येती !

उमलुन येता अशा आठवा
निळसर गाणी ओघळती
निळ्या मनाची होऊन दारे
शोधीत जाते मधुवंती !

—विनायक साने

## स्पर्श

गळाबंद झाले आता
उसळले गर्द जळ
सुटलेल्या पायी कैसे
वाहण्याचे आणू बळ.

काळ्यानिळ्या आवर्ताला
झाला जगबुडी हर्ष
'किती अंत पाहसी पोरा
आता यमुनेला करी स्पर्श !

—विनायक साने

## आस्वाद

'महापूर' या कवितेत विनायक साने यांनी मनाच्या आनंदसाक्षात्कारी क्षणाचे वर्णन केलेले आहे. रात्रीचा विनाश करून दिवसाचे चैतन्य उधळणाऱ्या पहाटेचे रूपक यासाठी योजलेले आहे आणि आपला अनुभव निसर्गरूप बनवून एक दृश्य-चित्र प्रारंभी रेखाटलेले आहे. सुवर्णशेंदरी उजेड सांडला, सूर्यमुखी घडा लवंडला आणि कवीच्या मनीचा एक अव्यक्त अनुभव शब्दांचे रंगरूप घेऊन साकार झाला. 'चैतन्याच्या लाटा उरी उसळल्यावर देहधारी भिंती ढासळल्या' ही कल्पना सार्थ प्रतीती देणारी आहे. देहाच्या भिंतीत अडकलेल्या चैतन्याला इथे स्वत्वाची ओळख पटलेली आहे, उन्मेषाच्या लाटा त्यात उसळलेल्या आहेत आणि त्यामुळे देहभिंतींचे बंधन आपोआपच नाहीसे झाले आहे. 'भिंती ढासळल्या' या शब्दयोजनेत दृक्-प्रत्यय देण्याचे समर्पकतेचे सामर्थ्य आहे. चैतन्याचे लोट मनातून 'फुंफाटत' बाहेर पडले आहेत. एका सामान्य माणसाच्या असामान्य अनुभूतीच्या साक्षात्काराचा हा क्षण कवीने नेमका टिपला आहे.

निसर्ग आणि मनभावना यांचे एकरूपत्व अनुभवणे ही विनायक साने यांची नहमीचीच लकब दिसते. 'आस' या कवितेतही याचा प्रत्यय आल्यावाचून राहात नाही. काळे काळे ढग बरसतात नि कवीचे अंगअंग भिजून जाते. खुळचा श्रावणाचा सुगंधित वारा येतो नि हर्षाच्या धारा कवीला मोहवितात. निसर्गाशी कविमन असे समरस होत राहाते; पण सजणीचा उदास ध्यास लागलेला असल्याने ते श्रांत आणि व्याकुळलेले असते. चोहीकडच्या धुंदफुंद वातावरणात एकटेच एकाकी राहते.

उत्कट संवेदनांनी बहरलेले एक निसर्गरूप मन विनायक साने यांच्या 'आठव' या कवितेत दिसते. रंग, गंध आणि स्पर्श या संवेदना इथे उत्कट बनल्या आहेत; आणि त्यांच्यात परस्परमुग्ध नाते निर्माण झालेले आहे. निसर्गाच्या रूप, स्पर्श, गंधातून बहरलेल्या स्वप्नांचा अनुभव येथे अत्यंत तरलतेने कवीने चित्रित केला आहे आणि या स्वप्नबहराचा धागा उमललेल्या आठवणींशी जोडला आहे. आभाळाची निळसर पाखर, ओघळणारी निळसर गाणी, निळ्या मनाची दारे– अशी ही सगळी निळ्या रंगाची कविता आहे. कवीची शैली सौकुमार्याने युक्त आहे आणि त्यामुळे या निळ्या रंगाला हळवेपणाची कांती लाभलेली आहे. गंधवती, स्वप्नवती आणि मधुवंती ही कवितेतील व्यक्तित्वाची क्रमाक्रमाने विकसलेली मोहरूपे आहेत.

विनायक साने यांच्या 'स्पर्श' या छोटयाशा कवितेत एक अतिशय आतुर आणि उत्कट भावस्थिती साठविलेली आहे. भावनेच्या आवर्तात गळाबंद गर्द जळ उसळले आहे. अशा वेळी सुटलेल्या पायी वहाण्याचे बळ कसे आणावयाचे अशी अगतिकता कवीच्या मनात उभी आहे. या अगतिकतेने काळ्यानिळ्या आवर्ताला जगबुडी हर्ष झाला आहे. 'काळ्यानिळ्या' आणि 'जगबुडी' ही विशेषणे येथे कशी काव्यमय आहेत! आवर्ताच्या भीषण एकतानतेचे रूप 'काळ्यानिळ्या' या रंगवैशिष्ट्याने साकार होते, तर 'जगबुडी' हे विशेषण अकटोविकट हर्षाची विध्वंसनीय व्यापकता साकार करते. अशा विकट पार्श्वभूमीवर यमुनेला स्पर्श करण्याचे व्याकुळ आवाहन आणि 'पोरा' हे लडिवाळ हक्काचे संबोधन अनेक आत्मनिष्ठ अर्थाच्या गहिऱ्या छटा निर्माण करणारे ठरते.

– रसिक

# माणुसकीचं चक्र



**लैला महाजन**

“ ऊं ऊं ऊं ऊं ” बारीक स्वरातलं ते रुदन कानी आलं. न् हातातलं काम सोडून आशू धावली. “हं बाईसाहेब इथ आहेत तर !” तिनं मनातच म्हटलं. मग उघडच विचारलं, “ काय झालं ?” “ भूक लागली मला. ” “ पण तासापूर्वीच मुसंबीचा रस दिला ना ?” बोलून चुकल्यावर आशू गडबडली. तिला पश्चाताप

झाला. कारण आता वाजले होते चार! सहा वाजता नवरा येणार. हिच्याशी आता वाद घालीत बसलं तर पडल्या जागची ही हलायची नाही. हिला इथं पाहून मग नवऱ्याच्या तोंडाच्या सुरूंगाला बत्ती दिल्यासारखं व्हायचं! आशूनं परत तिच्याकडे पाहिलं. अंगाचं मुटकुळं करून ती मजेत त्या सोफ्यावर पडली होती. पाच-सहा दिवसापूर्वीच नवऱ्यानं नवलाईनं डनलॉपचा हा महागडा मऊमऊ सोफा आणला होता. गेल्या महिन्यात त्याला प्रमोशन मिळालं होतं...आता घराची सजावट बदलणं अपरिहार्य होतं. आजकाल ऑफिसातून येतानाही त्याच्याबरोबर नेहमीच कुणी असायचं. असा तो आज कुणाला घेऊन आला नं इथं हिचं गाठोडं पाहिलं तर! बापरे! आजकाल नवऱ्याला ती नजरेसमोरही नकोशी झाली होती. पण त्यानं कितीही धुत्कारलं तरी ममतेचे बंध तोडणं आशूला शक्य नव्हतं. ती स्त्री होती. आई होती. ती आशूजवळ गेली. मांड्यांपर्यंत तिचे पाय उघडेच पडले होते. आशूनं तिचे कपडे सारखे केले व मनात म्हणाली, हिला देहाची जराही शुद्धबुद्ध राखता येत नाही का? कितीदा सांगितलं की हॉलमध्ये पडायचंच असलं तर जरा अंग झाकूनपाकून घेत जा! पण कळतंच नाही का हिला? अशात कुणी आलं न् अशा अवतारात हिला पाहिलं तर? आशूनं काही म्हणायच्या आतच तिनं अवयवाची चाळवाचाळव केली न क्षीणपणं विव्हळली, "ऊं ऊं! मला एकटं वाटतं.. माझ्याजवळ बस."

"ममी आत स्वयंपाकघरात येणार का?...तिथं खुर्चीवर बसून रहा. मग बोलता येईल." आशूनं तिची केविलवाणी स्थिती जाणून समजूतदारपणं म्हटलं. बिचारीला कुठं बाहेर जाता येत नव्हतं. कोंडल्यासारखं हातपाय आखडून दिवसभर घरातच रहायचं. आशू कळवळली. "थालिपीठ देशील? डॉक्टरनं असलं काही तळलेलं जडान्न तिला देऊ नका सांगितलंय. कारण एका जागी बसून खाल्लेलं पचत नाही. मग बात्या! ती सारी उस्तवारी आशूला करावी लागे. ती करीही पण नवऱ्याचा प्रेमळपणा प्रगटे न् तो म्हणे. "आशू का तू निष्कारण ही अडगळ घरात राखतेस? नुसती घाण! तिच्यासाठी बाई ठेव म्हटलं..." आशू खिन्न होई. ती रात्र व दुसरा दिवस तिच्यावर मळभ दाटे. आजकाल त्यानं असं बोलणं सोडलं होतं. पण तिच्याकडे तो फार विखारी नजरेनं बघे. आशूला कळे! पण ती सहन करी...मुकाट्यानं! नवऱ्याचं पाहून, येणारे जाणारेही आशूला तिच्यावरून टोकत. आशूची कीव करीत! खूपदा तिला ऐकू जाईल असं कुचकं लागट बोलत. कुणी डाव्या हातानं दोन भडकावून द्याव्यात तसं तिला ते बोलणं दुखवी मग ती आशूला गहिवरून विचारी, "कोण ग होतं...?"

कधी तरी ती आशूजवळ हट्ट धरी. "मला कुठंतरी नेऊन टाका!...तुला त्रास होतो. माझं करायला लागतं...माझ्यामुळं ऐकायला लागतं...वाईट साईट!" आशू ते हसण्यावारी नेई. तिचे हट्ट, लाड, सारं चाले फक्त आशूजवळ! अन्

आशूही ते पुरवी.. बिनतक्रार ! आशूचे विचार थांबवले बेलनं ! "अगबाई आता कोण आलं ?" म्हणत तिनं दार उघडलं ! अन् दारात नवरा ! भलताच खुशीत होता. आशूच्या गालावर त्यानं चक्क टिचकी मारली. अन् डोळे उंचावून विचारलं, "मुलं घरात नाहीत ना ?" आशू खुदकन् हसली. तो मंजुळ घंटानाद तिच्या कानावर गेला असावा. कारण तिनं हॉलमध्ये आलेल्या आशूला विचारलं, "कोण आलं ग ?" आशू काही उत्तर देणार तोच नवरा गरजला ··"अच्छा म्हणजे तू तिला कवटाळून बसली होतीस वाटतं ? शी: शी: अन् तशीच मी तुला जवळ घेतली." त्याच्या त्या वाक्यानं आशूलाच त्याची किळस आली. तिला स्पर्श न करायला ती काय गटारातली घाण होती ? पण ह्याच्या डोळ्यांवर, प्रमोशन, पैसा, पोझिशनचा पडदा पडलाय ना ? निदान तिच्यासमोर तरी असं बोलायचं नाही. तीसुद्धा माणूसच होती ना ? तिला काय वाटलं असेल. कसल्यातरी ओढीनं आशू अभावितपणे तिच्याजवळ जाऊन बसली. तो आणखीनच पेटला. अगदी पेट्रोल शिंपलेल्या ज्वाळेसारखा धगधगू लागला. "कितीदा सांगितलं, तिला इथं येऊ देऊ नकोस. आता माझ्याबरोबर कुणी असतं तर मग ?...घरातच उकिरडा बाळगायचो तुझी हौस आहे ना ?...तिला खोली दिलीय...बाकीच्या घरात पाऊलच टाकायचं काम काय ? नेऊन टाक म्हटलं कुठं..." त्याचे जळजळते शब्द ऐकून तिनं माशासारखी तडफड सुरू केली. बळ नव्हतं तरी लटपटत उठायचा प्रयत्न करू लागली. आशू कळवळली. नवऱ्याकडं तिनं शोकानं पाहिलं.. अन् तिरीमिरीनं तिला उचललं...कशी फुलासारखी हलकी होती ती ! आशूनं तिच्या खोलीत पलंगावर नेऊन ठेवलं तिला. कडेवर बाळाला घ्यावं तसं वाटलं होतं तिला. आशूनं तिच्या अंगावर नीट पांघरूण घातलं. तिला थोपटल्यासारखं केलं. बाहेर येताना तिच्या खोलीचं दार लोटून घेतलं.

नवरा एवढ्या लवकर घरी आला तरी संध्याकाळ कुजलेल्या पाचोळ्यासारखी कुबटच गेली. पिंकी आली तेव्हा तिला जरा बरं वाटलं. घरात विलक्षण ताणाचं धुकं दाटल्यासारखं झालं होतं. तिला वाटलं, कॉलेजात नुकतीच जाऊ लागलेली आपली लाघवी लेक बडबडीला सुरुवात करील. गमती जमती सांगेल. अभिनयासहित ! अन दोघांमधला खेच जरा सैलावेल. नवऱ्याचं खाणं झालं होतं. तरी तिनं मुद्दाम त्याला परत बोलावलं. डायनिंग टेबलाशी तिघं बसली होती. आशूनं उत्सुकतेनं पाहिलं. पण पिंकी घुम्म बसली होती. नेहमीसारखी खळखळून हसली नाही.

"हॅल्लो डॅडी स्वीट ओल्ड बॉय ?..." म्हणून खट्याळपणं खिदळली नाही. किंवा "डॅडी तुमची वाइफ किती चार्मिंग आहे... ओ : नो : माझा बॉयफ्रेंड म्हणाला असं." अशी ममीची थट्टा केली नाही. ती शांतता असह्य होऊन आशू काही म्हणणार तोच पिंकी म्हणाली,

" ममी...मला काही सांगायचंय तुला ! म्हणजे कंप्लेंट नव्हे पण डॅडी...!" आशूनं चमकून नवऱ्याकडं पाहिलं. ' काहीवेळा फार व्हिमजिकल वागतात. परवा चिंटी आला ना त्याला भलं मोठं लेक्चर दिलं......लांब केसावर ! पिलीला पण तिनं सिथ्रू ब्लाऊज घातलं होतं, त्याबद्दल सुनवलं. आता मिरचंदानीचं तुला माहितेच.. फिल्म लाईनीतले लोक ते ! तिनं हिप्सवर साडी नेसली तर ह्यांना काय करायचं ?...आपण फारतर तिकडं बघू नये. " पिंकी वैतागून तिरसटून सांगत होती.

" पिंकी...यू डेव्हिल...मला शिकवायला निघालीस ? तुझी ही हिम्मत ?"

आशू एखाद्या न्यायाधिशासारखी स्तब्ध बसली होती. विरुद्ध पक्षाच्या वकीलांसारखे ते दोघं झुंजणार ह्यात तिला शंका नव्हती.

" ओ : डॅडी !" पिंकीनं नाक उडवून म्हटलं, झुरळ झटकावं तसं !

" पिंकी... त्यांचं काय घेऊन बसलीस ? पण तुझे सुद्धा नसते थेर मला मुळीच पसंत नाहीत. परवा तुला कुणीतरी चिलीम ओढताना पाहिलंय. त्यात भांग होती की गांजा कुणास ठाऊक ! गिव्ह ए फुलस्टॉप टू ऑल धिस. तुझं रात्रीचं बाहेर बाहेर रहाणं, बॉयफ्रेंड, कपड्यातून नेकेड बॉडी दिसेल असे वेष. सगळं थांबलं पाहिजे एकदम !, मला हे मुळीच चालणार नाही."

" ओ : डॅडी ! डॅडी ! तुम्ही का डोकं खुपसलं माझ्या गोष्टींत. डोन्ट बी ए डिक्टेटर ! आजकाल तुम्ही फार विचित्र वागता. ममी, डॅडी अगदी जंक जंक आहेत ! बुरसटलेले...टाईमबार !"

" आशू...आशू ऐकलंस ? मला जंक म्हणते ? मी अडगळ ? गंजलेला ? मोडतोड ? माझ्या पैशावर हे सगळं चाललंय तुझं पिंकी,...चैन...मौजमजा. मी तुझा बाप ! माझ्याबद्दल काही आदर ?...कृतज्ञता ?...यू शेमलेस क्रीचर. मी पैसे देणार नाही तुला. माझ्या जिवावर ख्याली खुशाली करतेस ? मला डाफरतेस ! मी पैसेच देणं बंद करतो."

" डॅडी तुम्ही पैसे देणं म्हणजे चॅरिटी करत नाही. वा डयूटी समजून देत नाही. तुम्ही चक्क बिझिनेस करता. माझ्यावरचा खर्च म्हणजे कॅपिटल गुंतवता तुम्ही ! आशेनं, लोभानं, मोठ्या हुशारीनं. मी म्हातारपणी तुम्हाला बघावं...संभाळावं म्हणून! तेव्हा तुम्ही अगतिक, असहाय, डिझेबल असणार. आताच्या खर्चाची सगळी भरपाई तुम्ही तेव्हा वसूल करणार. आता कॅपिटल ठेवताय, तेव्हा इंटरेस्ट भरपूर व्याज हक्कानं मिळवावं म्हणून ! तुम्ही काय प्रेमापोटी लालनपोषण करता ? ही तुमची इनव्हेस्टमेंट आहे."

तिचे ते विचार ऐकून आशूला धक्के बसत होते. पण ती हादरली नाही. नवरा मात्र फार भांबावला होता. कोसळला होता. पिंकी तर प्रत्युत्तराची वाट न पाहता निघून गेली होती. जराशानं भानावर येऊन तो आशूला म्हणाला, ' पाहिलंस.

आजच्या पिढीचं पाऊल कुठच्या वाटेनं पडतंय?" त्याला वाटलं होतं, आशू सांत्वनासाठी भडभडा काही तरी बोलेल. त्याच्या मनाचा दाह कमी होईल. पण ती तर गप्प बसली. तिच्या मौनानं तो भडकला. 'तूच तर तिला चिथावणी दिली नाहीस ना?'

"उगीचच भलतंसलतं रागाच्या भरात बोलू नका. पिंकीवरचा घुस्सा माझ्यावर काढू नका. उलट जरा शांतपणं विचार करा."

"म्हणजे तिचे बोलणे पटतं तुला?" त्यानं उसळून विचारलं. "डोन्ट गो बाय इमोशन! शांतपणं विचार करण्याची...ऐकायची तयारी असली तरच मी उत्तर देईन. गो बाय रीझन!"

त्याला शांतपणाची सक्त गरज होती. प्रेमळपणानं पण ठाम स्वरातलं दिलेलं तिचं उत्तर ऐकून त्यानं पडते घेतलं. "बोल."

"पिंकी म्हणाली त्यात खोटं काय आहे? ह्या पिढीला शुगर कोटेड पिल नकोय. कडू कारले तूपसाखरेत घोळवून खायला घालणं त्यांना मानवत नाही. वाघाला वाघच अगदी नरभक्षक वाघच म्हणतात ते!"

"म्हणजे.. मी मी जंक आहे?...ती म्हणाली तसा?" त्याच्यासारख्या रुबाबदार, सदोदीत वेल्ड्रेस असलेल्या माणसाला ते विशेषण अंगावर डांबर ओतावं तसं वाटत होतं. उदारमतवादी म्हणून त्याची ख्याती होती. आशूला तो ड्रिंक्स, डान्स, कॅबेरेला नेई. इतका तो फॉरवर्ड? अन् ह्या चिमुरडीनं त्याला बुरसटलेला म्हणावं?

"ती म्हणाली तसंच तुम्हीही म्हणता...आपल्या आईला! जिनं जन्म दिला, पण जी आता दुबळी-पांगळी आहे त्या जिवाला! 'अडगळ' शब्दाशिवाय तिचा उल्लेख करत नाही! हा असला आदर्श तुम्ही पिंकीपुढं ठेवलात...तिनं तुमचंच अनुकरण केलं...तुम्ही आई म्हातारी...असहाय्य होईपर्यंत थांवलात. पिंकीला हा धीर निघाला नाही. पिंकी म्हणाली त्यात काय खोटं आहे? तुमच्या आईनं तुमच्या खस्ता काढल्या. तिनं रोप लावलं. त्याच्या निगराणीत उमेद घालवली...का?... प्रत्येक आईबाप हेच करतात म्हणून हेटाळू नका. मग पिंकीत न तुमच्यात काय फरक उरला?...आपण रुजवलेल्या रोपट्याचं डेरेदार झाड व्हावं, त्याच्या सावलीत पुढं आपल्या थकल्या, खचल्या, जिवाला उतार वयात आसरा लाभावा म्हणूनच ना? तुमच्या मातापित्यांनी तेच केलं. आपण तेच केलं. आतांची पिढी... पोरं प्रत्येक गोष्ट भावनेपेक्षा—व्यवहार—उपयोगितेच्या दृष्टिकोनातून मोजतात. म्हणून पिंकीनं तुमच्या प्रेमाला—मायेला बिझिनेस म्हटलं."

"पण मी कधी आईला..."

"बिझिनेस म्हटलं नाही. तुझं कर्तव्य केलंस असं लाखदा ऐकवलं."

"तुझी सासू असून तू इतका कैवार घेतेस? मला काहीच वाटत नाही न् तू मात्र जेव्हा तेव्हा..."

"हेच तर तुमचं चुकलं? अहो आई म्हणजे दोन पिढयांतला पूल! पण तोच तुम्ही उध्वस्त केलात...त्याला...अडगळ संबोधून! जिच्या मांडीवर खेळलात... झोपलात...ती तुमच्या सोफ्यावर पडली..."

"पुरे...पुरे...आशू माझं चुकलं...खरंच..."

"तुमचं चुकलं...पण मला केवढं सहन करायला लागलं?...तुम्ही तिला टाकलंत. म्हणून ती माझी सासू हे मी पार विसरून गेले. सासू मानणं सोडलं, तिला अगंतुगं करू लागले. तिच्याशी खूप मायेनं वागू लागले. वाटलं पिंकीच्या मनात हे कोरल्यासारखं ठसायला हवं. आपल्या सासूला तिनं आई मानायला हवं. म्हातारपणात सासू-सासऱ्यांना तिनं अजाण मुलासारखं मायेनं संभाळावं. कारण सून तरी काय? सासू-सासऱ्यांची कन्याच ना?"

"कन्या नव्हे. तू तर माझ्या आईची आई झालीस! मघाशी तिला मी बोललो तर लहान बाळासारखं उचलून नेलंस तू तिला."

"म्हातारपण बालपणच असते. कधीकाळी ते आपले आईबाप असतात. नंतर आपण त्यांचं आईबाप व्हायचं. मग पोटच्या पोरासारखी आपण त्यांच्यावर पाखर घालायची, बीजातून रोप...रोपट्याचा तरू. त्यातून परत बीज...असं हे चक्र आहे आईची आपण आई व्हायचं. बापाचा बाप व्हायचं. हे चक्र आहे. माणुसकीचं. ते सतत गरगरत राहिलं पाहिजे. त्याची गति थांबवली, की माणसामाणसातली नाती संपतील. मानवी जीवन म्हणजे फक्त बिझिनेस होईल. पिंकी म्हणते तसा..."

□ □ □

## गोड साखरेचे कडू राजकारण....

पृष्ठ २३ वरून

शीर मागणी आपल्याला भागवायची आहे, जगातील अर्धी साखर बीटच्या कंदा पासून निर्मितात. आपल्याकडेही ऊसाबरोबर बीटची शेती जोपासता येईल. उत्पादन वाढविता येईल.

पण त्याकरता साखर धंद्याबाबत सरकारने योग्य धोरण आंखून ते सुविहीतपणे अंमलात आणले पाहिजे. गेली वीस वर्षे झाला तो खेळखंडोबा थांबला पाहिजे प्रादेशिक हितसंबंधापेक्षा राष्ट्राचे हित अधिक महत्त्वाचे ठरले पाहिजे. राजकारणी मंडळी साखरधंद्याच्या दुखण्यावर राष्ट्रीयीकरणाचा उपाय सुचवितात यु. पी. सरकारने तर तसा ठरावही केला आहे. महाराष्ट्राच्या विधान सभेतही मध्यंतरी तसा आवाज घुमला. पण राजकारण्यानी हे ध्यावी घ्यावे की, साखर उद्योगांची समस्या फक्त मालकीची नाही ती सुविहीत धोरणाची आहे. राष्ट्रीयीकरणाने कार्यक्षमता वाढते असा खात्रीचा अनुभव कुठल्याच राष्ट्रीयीकरणाने य देशात दिलेला नाही. गोड साखरेचे हे कडू राजकारण संपले तर या देशाचे भले होईल!!

□ □ □

## पुस्तके

डोक्यात प्रश्नांचे काहूर उठविणारी

# प्रश्नचिन्हे

सु. म. घाटे

काही विषय कधीच शिळे होत नाहीत. सतत कोणी ना कोणीतरी त्यांच्यावर लिहितच असतो. त्यापैकी एक विषय म्हणजे वेश्या व्यवसाय. 'प्रश्नचिन्हे' ही कादंबरी वेश्या जीवनावर आहे. पण केवळ तेवढीच नाही. आणखीही खूप काही त्या कादंबरीत जरूर आहे.

मेनका ही या कादंबरीची नायिका आहे. ती 'नायकिणीची' मुलगी आहे. तिची आईच हा धंदा चालवते. मेनका जरी धंद्यावर मुबलक पैसा मिळवीत असली तरी तिचे मन त्या व्यवसायात नाही. तिला कुठेही थोडे प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची इच्छा आहे. विश्वासराव हे तिचे 'गिऱ्हाईक' आहे. पण विश्वासरावांवर तिचं प्रेम आहे, श्रद्धा आहे. त्यांच्याकडे कायमची 'राहायची' तिची तयारी आहे. मेनकेच्या आईला ही 'थेरं' पसंत नाहीत. एका शेटजीकडून ती आगाऊ पैसे घेऊन मेनकेला त्याच्या सुपूर्द करते. सकाळीच उठून ती विश्वासरावांकडे जाते. अर्थातच विश्वासराव तिला धुडकावून लावतो, ती आपल्या एका मावशीकडे मुंबईला जाते. मावशीही पूर्वी धंदाच करीत असते. पण आता एका पैलवानाने तिला ठेवलेली असते. मेनका आपल्या मनातील हेतू तिला सांगते. 'चांगल्या मार्गाने पोरगी जायला बघते, जाऊ दे की!' असा विचार करून मावशी तिला ओळखी–पाळखीने एका घरात काम मिळवून देते. अशा दोन तीन घरात मेनका, 'माया' या नावाने कामं करते. कुठे आजाऱ्याची सेवा, कुठे धुणीभांडी, कुठे मुलाला सांभाळणे. पण या प्रत्येक घरात तिला वाईट अनुभव येतात. प्रतिष्ठेच्या शुभ्र पायघोळ झग्याआड तिला अनेक काळ्या गोष्टी दिसतात. भयंकर पापाचार आढळतो. फसवाफसवी, पशुत्व, वासनांचे धगधगीत निखारे आढळतात. ती आपल्या जुन्या जीवनाची व या

संभावित प्रतिष्ठित जीवनाची तुलना करते व तिला या पांढरपेशा जीवनाचा उबग येतो. ती मावशीला सांगून आपल्या धंद्याकडे पुन: येते. पुनः व्यवसाय सुरू करते.

## पहिलीच आणि स्वतंत्र

केवळ विषयाचा, कथेचा विचार केला तर वरवर फारसं नाविन्य आढळणार नाही. पण यश रचनेत, मांडणीत आहे. शिवाय लेखकाची ही पहिलीच कादंबरी आहे. पहिल्याच कादंबरीच्या वेळी सामान्यत: लेखक कोणत्या ना कोणत्या प्रवृत्तीचा, ढंगाचा, लेखनाचा आश्रय घेतो. कदाचित तसे आपोआपच घडते. नंतर त्याच्यावर शिक्केही बसतात. पण प्रा. कुलकर्णी अशा कोणत्याही मोहाला बळी पडले नाहीत हे उत्तमच झाले. अगदी स्वतंत्रपणे, स्वयंभू अशी त्यांनी ही कादंबरी लिहिली आहे.

व्यक्तिरेखा ही अलीकडे कथानकापेक्षाही महत्त्वाची बाजू समजली जाते आणि ते योग्यच आहे. या कादंबरीत मेनका, मावशी, बाई या तीन केवळ अविस्मरणीय व्यक्तिरेखा आहेत.

मेनका ही फार कमी शिकलेली आहे, तिची प्रारंभीची धंद्याबद्दलची घृणा जितकी सत्य तेवढीच तिची पांढरपेशा जीवनाबद्दलची घृणा सत्य ! त्यामुळे तिने आपल्या व्यवसायात पुन: पडणे यात एकदम 'लेखकाच्या मर्जीनुसार' परिवर्तन घडले आहे असे मुळीच वाटत नाही. जे काही परिवर्तन झाले आहे ते तिच्या अनुभवांचे सार आहे. आपोआप घेतला गेलेला तो निर्णय आहे. ती अंतर्मुख आहे, तिच्या मनात अपार सहानुभूती आहे. पुरुष 'जातीला' ती ओळखून तर आहेच पण त्याचबरोबर सर्व मानवजातीच्या अगतिकपणाची तिला एक प्रौढ समज आलेली आहे. ती समज केवळ तिच्या विचारप्रवाहातून, जागृत मनाने घेतलेल्या अनुभवातून आलेली आहे. कादंबरीतले हे सर्वांत ठळक, रेखीव, मध्यवर्ती पात्र आहे. तिला पडलेल्या प्रश्नांनी आपणही अंतर्मुख होऊन जातो. तिच्या निर्णयाने विद्ध होऊन जातो. क्षणभर सुन्न होतो.

त्यानंतरचे ठळक पात्र म्हणजे मावशीबाई. हिचं लहानपणी लग्न झालं, विधवा झाली. दिरांच्या वासनेला बळी पडली. नाईलाजानं धंद्याला लागलेली आहे. पण तिचं मन जीवंत आहे. तिला एका पैलवानाने आसरा दिला आहे. पण गरजे-साठी ती कधी कधी शरीर विक्रय करते. आयुष्यातल्या अनुभवांनी तिच्यातून एक समंजस, प्रेमळ, व्यवहारी स्त्री निर्माण झाली आहे. तिचं असं खास तत्त्वज्ञान आहे. जीवनपद्धती आहे. मेनकेवर तिचं प्रेम आहे. मेनकेचं लग्नही तिनं ठरविलं आहे. मेनकेनं जे 'वेड' डोक्यात घेतलं आहे त्याला तिची मनापासून साथ आहे. रोज सायंकाळी मेनका आपले दिवसभरचे प्रसंग तिला सांगते. पण इतके असूनही जीवनातले भेसूर सत्य ती धीराने पाहू शकते. स्वप्नाळूपणा तेथे नावालाही नाही. तरीही एक कायमची चांगल्याची ओढ तिला लागलेली आहे.

मावशी व मेनका यांची जी दिलजमाई झाली आहे, तो एक कादंबरीतील

उत्कृष्ट भाग आहे. त्यांनी एकमेकींची मनं जाणली आहेत. दोघींनीही एकमेकींना सुंदर साथ दिली आहे.

'बाई'ची कॅरॅक्टर अशीच मनोरम वठली आहे. आठ वर्षं बाईंचा पती आजारी आहे. मुलंही जगली नाहीत. मेनका त्यांच्या मदतीला राहते. बाईंचं दुःख समजावून घेते. नवरा मेल्यावर त्यांनी लग्न केलं ते मेनकेला खपलं नाही आणि तेही अशा माणसाशी की जो बाईंचा नवरा मरावा याची वाट पाहात होता. बाईंचं दुःख अजब आहे. अस्फुट आहे. त्या म्हणतात,

'गेली आठ वर्षं मी अर्धा प्रपंच करते आहे. घरी नवरा आहे, मी सौभाग्यवती आहे, पण जिणं मात्र विधवेचं जगते आहे.' मेनका त्यांना पुनः लग्नाविषयी विचारते, नवऱ्याला सोडून का देत नाही असं विचारते. त्यावर बाई म्हणतात, 'सुखापुरते सोबती जोडायचे याला संसार म्हणत नाहीत, मेनका!' आणि तरीही वैधव्यात त्या पुर्नविवाह करतात. का? मेनकेपुढं हेही एक प्रश्नचिन्ह आहे.

इतर अनेक पात्रं तशी बरीच आहेत. ज्या दोन तीन घरात ती कामं करते तिथल्या सर्व अंतःस्थ भानगडी मेनकेला आपोआपच कळतात. चंद्रकलेच्या पुटपुटीपणाची कमाल, रावसाहेबांची नीच वासना, त्यांच्या पत्नीचं गुलामी, असहाय्य जीवन, मेनकेची आई, राजा, शोभा व तिचा प्रियकर ही सर्व पात्रे कादंबरीत त्या त्या ठिकाणी व्यवस्थित आहेत.

कादंबरीची निवेदन-पद्धतीही कथेनुरूप आहे. सरळ कथानकात भर टाकणारी आहे. तिच्यात शैलीदारपणा, उगाचच नटणे मुरडणे असले प्रकार मुळीच नाहीत. उगाच काही मोठी गोष्ट सांगतो आहोत असा आव आणलेला नाही. 'पोझिंग' नाही. जे जसे सांगायला हवे अशी मागणी कथानक करते, ते तसेच सांगितले आहे.

फक्त क्वचित कोठे असा संभ्रम पडतो, की ही मेनका कुठे चार यत्ता शिकलेली आहे. पण तिची विचार करण्याची पद्धती मात्र अगदी सुसंगत, लॉजिकल! पण अशिक्षितांच्याही मनात विचारप्रवाह एखाद्या सुशिक्षितासारखा चालू राहाणं शक्य आहे, असे म्हणायलाही जागा आहे. त्याचप्रमाणे मेनकेची विचार-शृंखला कित्येक ठिकाणी थोडी मोठी वाटत असूनही कंटाळवाणी वाटत नाही हे विशेष! कादंबरीचाच एक अविभाज्य भाग म्हणून ती जाणवतात, वाटतात.

'प्रश्नचिन्हा'चे यश केवळ विलक्षण आहे. 'सह्याद्रि', 'बुवा' वगैरे मासिकातून प्रा. शांताराम कुलकर्णींच्या कथा वाचकांनी वाचल्या असतीलच. पण त्या बऱ्याचशा विनोदीच आहेत. गंभीर विषयावरची, गंभीर समस्येवरची कादंबरी लिहून प्रा. कुलकर्णींनी कादंबरीक्षेत्रात वाटचाल सुरू केली आहे. व ह्या वाटचालीतले पहिलेच पाऊल विलक्षण देखणेपणाने, डौलाने टाकले आहे. असे की पुढच्या त्यांच्या वाटचालीकडे अगदी जागरूकतेने लक्ष ठेवणे रसिकांना भाग आहे. ◻

प्रश्नचिन्हे : प्रा. शांताराम कुलकर्णी : ज्ञानराज प्रकाशन : पुणे ३०



ओरियेन्ते प्रांतातील दक्षिण किनाऱ्यावर सिएरा मेस्त्रा लगतच एल उव्हेरो हा बाटीस्टाचा लहानसा लष्करी तळ होता. झपाट्याने या गॅरिसनवर हल्ला करायचा आणि शत्रूला चकित करून टाकायचे, सैनिकांना शरण आणायचे आणि त्यांना नवी कुमक मिळण्याच्या आत सापडतील तेवढी शस्त्रास्त्रे घेऊन लगबगीने सिएरा मेस्त्रात सुरक्षित ठिकाणी पळ काढायचा अशी फिडेलची योजना होती. २८ मे १९५७ रोजी हल्ला चढवायचा असे ठरले. तोवर या योजनेबाबत आत्यंतिक गुप्तता पाळायची होती.

रस्त्यावरून जाणाऱ्या सैनिकांच्या ट्रक्सपैकी एखादा अडवून त्यावर हल्ला करावा ही चे ची सूचना.
यापेक्षा एखाद्या लष्करी तळावरच सरळ हल्ला करावा असे फिडेलचे मत.
अखेर यासाठी एल् उव्हेरो तळ पक्का करण्यात आला.
बंडखोरांची ही पहिलीच मोठी लढाई.

# फिडेल चे आणि क्रांती

अरुण साधू

लेखांक आठ । नऊ

हल्ल्याचे ठिकाण निश्चित झाल्यावर एकूण चढाईची बारीक तपशीलवार योजना फिडेलने आपल्या सहकाऱ्यांसह आखली. प्रथम या तळावर किती सैनिक आहेत, पहाऱ्याच्या किती चौक्या आहेत, त्या कुठे कुठे आहेत, त्यांची दळणवळणाची साधने कोणती, रस्ते कोणते, सैनिकांची बायकामुले कोणकोणत्या इमारतीत राहतात ही सर्व माहिती स्थानिक लोकांच्या मदतीने मिळविण्यात आली. त्यानंतर हल्ला कसा करायचा याचा संपूर्ण तपशील ठरविण्यात आला. तेव्हापासूनच प्रत्येक लढाईची अगदी तपशील-

वार योजना तयार करण्याची सवय फिडेल कास्ट्रोने लावून घेतली. कोणी, कोठ, किती अंतरावर उभे रहायचे, प्रत्येकाजवळ किती काडतुसे असावीत, कोणकोणत्या मार्गांनी हल्ल्याच्या लक्ष्यापर्यंत पोचायचे आणि कोणत्या रस्त्याला किती वेळात कुठे परतायचे हा सर्व तपशील तो तयार करीत असे.

एल उव्हेरोच्या बराकी अगदी समुद्र किनाऱ्याला लागून होत्या. रातोरात सोळा किलोमीटर्स चाल करून जाऊन बंडखोरांनी लष्करी तळाच्या तीनही बाजूंनी वेढा घालून उंचवटयावर झाडयांमध्ये दबा धरला. चौथ्या बाजूला समुद्र होता. आत एका इमारतीत स्त्रिया आणि मुले होती. या इमारतीवर कुठल्याही परिस्थितीत गोळी झाडायची नाही असा सक्त हुकूम होता.

सगळयांनी आपापल्या ठरलेल्या जागा घेतल्यावर फिडेलने एक गोळी झाडून हल्ल्याचा इशारा दिला. ताबडतोब तिन्ही बाजूंनी बंदुकांच्या आणि मशीन गन्सच्या गोळयांचा मारा सुरू झाला. सैनिकांना बंडखोरांच्या हालचालींचा अगोदर सुगावा लागला असावा कारण ते तयारीतच असल्यासारखे दिसत होते. त्यांच्याकडून जोरात प्रत्युत्तर आले. सैनिक सहजासहजी घाबरून शरण येणार नाहीत असे दिसू लागले. अखेर जुऋन अलमैडाच्या तुकडीने जीवावर उदार होऊन एका पहाऱ्याच्या चौकीवर चाल केली आणि ती ताब्यात घेतली. तेव्हा कुठे लढाईला वळण लागले. आणखी चौक्या पडल्या आणि आतल्या बराकीतल्या सैनिकांचा प्रतिकार थंडावू लागला. शेवटी पावणेतीन तासानंतर बराकीमधून पांढरे निशाण फडकविण्यात आले आणि सैनिक शरण आले.

बंडखोरांची संख्या ऐंशी होती आणि सैनिकांची त्रेपन्न. बंडखोरांनी आक्रमक पवित्रा घेऊनही त्यांचे सहा जवान ठार झाले होते आणि नऊ जखमी झाले होते. सैनिकांपैकी चौदा ठार झाले होते. एकोणीस जखमी झाले होते आणि चौदा कैदी झाले होते. सहा सैनिक निसटून पळाले होते. विशिष्ट इमारतींवर गोळीबार करण्याचे बंडखोरांनी कटाक्षाने टाळल्याने एकाही नागरी जीविताला धोका पोचला नव्हता.

लढाई मोठ्या हातघाईची झाली होती, यात शंका नाही. चे गव्हेरा म्हणतो उघडया छातीच्या बंडखोरांनी निधडेपणाने कच्च्या संरक्षण फळीमागे असलेल्या शत्रूवर केलेला हा हल्ला होता. दोन्ही बाजूंनी मोठेच शौर्य दाखविले हे कबूल केले पाहिजे. या विजयाने आमचे गनिमी सैन्य वयात आल्यासारखे आम्हास वाटले, या युद्धापासून आमचे नीतिधैर्य एकदम सहस्रपटींनी वाढले. आमचा निश्चय आणि विजयाच्या आशा आता द्विगुणित झाल्या. पुढचे वर्ष आम्हाला नंतर अतिशय जिकीरीचे गेले. परंतु विजयाचे रहस्य आता आमच्या हाती आले होते. एल उव्हेरोच्या आमच्या या विजयामुळे मोठ्या लष्करी तळापासून दूर वसलेल्या लहान लहान बराकींचे भविष्य संपुष्टात आले होते. लवकरच अशा बराकी शत्रूने बंद करून टाकल्या.



**या पहिल्या लढाईबद्दल बोलताना चे म्हणतो,**
**'आमचे गनिमी सैन्य वयात आल्यासारखे वाटले.'**

गोळीबार सुरू झाल्यावर पहिल्या काही सेकंदातच बराकीमधला टेलीफोन फुटला आणि सैनिकांचा सांत्यागोशी संपर्क तुटला. दोन छोटी विमाने फक्त बराकींवर घिरटया घालून गेली. लढाऊ विमाने आली तेव्हा बंडखोरांनी चंबूगबाळ आवरून दूरवर आणि पहाडीत उंचावर प्रस्थान ठेवले होते.

दोन जखमी बंडखोरांची परिस्थिती अत्यंत गंभीर होती. त्यामुळे त्यांना जखमी सैनिकांबरोबरच बराकीत ठेवण्यात आले. निघण्याच्या अगोदर चे गव्हेराने सर्व जखमी सैनिकांनाही योग्य ती वैद्यकीय मदत दिली होती. जाताना बंडखोरांनी आपल्याबरोबर प्रचंड शस्त्रसंभार आणि औषधे व इतर उपयुक्त वस्तू नेल्या.

तुकडया तुकडयांनी वेगवेगळया दिशांनी बंडखोर वेगाने पसार झाले. जखमींना सांभाळण्यासाठी चे च्या नेतृत्वाखाली एक वेगळी तुकडी करण्यात आली. कारण जखमी जवान हव्या त्या वेगाने चालणे शक्य नव्हते.

एल उव्हेरो वरील विजयी हल्ल्याचे सवंध क्यूबन द्वीपकल्पात जोरदार पडसाद उमटले. फिडेल कास्ट्रो मोठया संख्येने सिएरा मेस्त्रामध्ये वावरत आहे एवढेच नव्हे तर बाटीस्टाच्या सैन्याला आव्हान देण्याइतपत ताकद आता त्याने कमाविली

आहे याची लोकांना खात्री पटली. सिएराच्या आसपासच्या लहान सहान चौक्या लष्कराने ताबडतोब बंद केल्याने बंडखोरांचा संचार अधिकच वाढला. मुक्त प्रदेशाची व्याप्ती वाढली. ऑगस्टपर्यंत तर बाटीस्टाच्या सैनिकांनी सिएरा मेस्त्रा कायमचे सोडले. शहरातून, खेड्यातून बंदुका घेऊन सिएरा मेस्त्रामध्ये येणाऱ्या तरुणांची रीघ लागली. महिनाभरात त्यांची संख्या दोनशेवर गेली. बंडखोरांची सुरक्षितता वाढली. पूर्वी बाटीस्टाच्या सैनिकांचा आणि इतरांचा एवढा सुळसुळाट होता की रात्री झोपण्याची जागा कळू नये म्हणून बोलताना देखील हळू बोलण्याची काळजी घ्यावी लागे. आता मुक्त गप्पा मारायला परवानगी मिळाली. खेड्या-पाड्यांमध्ये जाऊन स्थानिक लोकांशी मोठ्या प्रमाणावर संपर्क साधण्याचीही परवानगी मिळाली.

सिएरा मेस्त्राच्या जंगलाची, वाटांची आणि सुरक्षित जागांचीही आता बंड-खोरांना चांगली माहिती झाली. वाटा आणि ठिकाणे लक्षात ठेवण्याच्या बाबतीत स्वत: फिडेल कास्ट्रो अतिशय तल्लख.

## गॉर्शिया सांगतो....

सिएरा मेस्त्रामध्येच ज्याचा जन्म झाला असा शेतकरी, बंडखोर गुलेर्मो गार्शिया त्यावेळी फिडेलबरोबर होता. तो एका मुलाखतीत सांगतो : फिडेल या पहाडीत पूर्वी आधीच आलेला नव्हता. परंतु सहा महिन्याच्या अवधीत इथेच जन्मलेल्या कोणत्याही शेतकऱ्यापेक्षा फिडेलला संपूर्ण सिएराची अधिक चांगली माहिती झाली. एकदा एका ठिकाणी जाऊन आल्यावर फिडेल ते ठिकाण कधीच विसरत नसे. प्रत्येक गोष्ट त्याच्या लक्षात राही–तिथली जमीन, तिथली झाडं, प्रत्येक झोपडीत राहणाऱ्या माणसांची नावं. मी गुरांचा व्यापार करीत असे. त्यामुळे मला सतत त्या पहाडीत सर्वत्र भटकावे लागत असे. परंतु अवघ्या सहा महिन्यात फिडेलला सिएराची माझ्यापेक्षा चांगली माहिती झाली. खरं म्हणजे माझा जन्मही सिएरात-लाच आणि सारे आयुष्यही तिथेच गेलेले ! –

सिएरामध्ये अशा तऱ्हेने दिवसेंदिवस बंडखोरांचा प्रभाव वाढत असतानाच शहरामधील घातपाताच्या चळवळींनाही जोरात ऊत आला होता. सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांनी हॅवानामधील एक पॉवर हाऊस उडवून लावले. दोन रात्र ही राजधानी अंधारात बुडून होती. याच गडबडीत एक कॅथॉलिक पाद्री, फादर गुलेर्मो सार्डीनास याने आपले पॅरिश सोडून सिएरा मेस्त्राचा रस्ता धरला. फादर सार्डीनासच्या या निर्णयाला क्यूबन वृत्तपत्रांनी जोरदार प्रसिद्धी दिली. पुढे एका स्पॅनिश पत्रकाराने फादर सार्डीनासची मुलाखत घेतली. तेव्हा त्याने सांगितले, की कास्ट्रोबरोबर एक प्रोटेस्टंट पाद्री असल्याचे त्याने एका वर्तमानपत्रात वाचले होते. बंडखोरांबरोबर कॅथॉलिक पाद्री नसावा याचे त्याला मोठे वैषम्य वाटले आणि केवळ कर्तव्य म्हणून त्याने सिएराचा रस्ता धरला.

परंतु त्यावेळी तरी फादर सार्डीनासच्या प्रकरणाला जोरदार प्रसिद्धी मिळाली आणि चर्चमधील एका गटाचा फिडेल कास्ट्रोला भक्कम पाठिंबा आहे असे उघड बोलले जाऊ लागले.

राजकीय पातळीवरही फिडेल कास्ट्रोने आता आक्रमक धोरण स्वीकारले. बारा जुलै १९५७ रोजी त्याने सिएरा मेस्त्रामधून आपला पहिला जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि बाटीस्टा सरकार उलथून पाडण्यासाठी सर्वांना सहकार्य देण्याचे आवाहन केले.

फिडेल कास्ट्रोचे वजन वाढते आहे हे ध्यानात आल्याबरोबर त्याला आपल्या बाजूने वळवून घेण्याची क्यूबन राजकारण्यांमध्ये गुप्त स्पर्धा सुरू झाली. अर्थशास्त्रज्ञ फिलीप पाझो आणि हुतात्मा एडी छिबासचा धाकटा भाऊ राऊल छिबास या दोघांचे त्यावेळी क्यूबात मोठे नाव होते. राऊल केवळ आपल्या भावाच्या नावावर ओर्टोडोक्सो पक्षात आपले स्थान टिकवून होता. पण फिलीप पाझो हा स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा होता. क्यूबन राजकारणात सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळला असताना आणि पाझो नॅशनल बँकेचा अध्यक्ष असूनही अतिशय स्वच्छ होता. बाटीस्टाच्या लष्करी उठावानंतर त्याने बँकेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. सिएरा मेस्त्रात येऊन आपणच चळवळीचा ताबा घ्यावा अशी पाझोसची मनीषा प्रथमपासूनच दिसत होती. परंतु चळवळीची सूत्रे आपल्या हातून सोडण्याची कास्ट्रोची कधीच तयारी नव्हती.

फिडेलच्या जाहीरनाम्याबावत चर्चा करण्यासाठी फिलीप पाझोस आणि राऊल छिबास हे दोघेही सिएरात आले होते. त्यांच्या उपस्थितीत आणि त्यांच्या संमतीने जाहीरनामा फारसा प्रागतिक करणे शक्य नव्हते. परंतु सबंध क्यूबन जनतेला आपल्याबरोबर घेण्यासाठी या दोघा राजकारण्यांचे सहकार्य घेणे योग्य होते.

जाहीरनाम्याचा भर होता सर्व क्रांतिकारी बंडखोर संघटना सर्व नागरी संघटना आणि सर्व विरोधी राजकीय पक्ष यांची एक विस्तृत नागरी क्रांतिकारी आघाडी उभारण्यावर.

जनता लढ्यासाठी अशी नागरी क्रांतिकारी आघाडी उभारणे, लढ्याच्या यशस्वी पूर्ततेनंतर येणाऱ्या तात्पुरत्या सरकारसाठी अध्यक्षाची नेमणूक करणे, कोणताही लष्करी अंमल तात्पुरते सरकार म्हणून न स्वीकारणे, क्यूबातील अंतर्गत राजकारणात कोणत्याही परदेशाचा हस्तक्षेप न स्वीकारणे आणि लष्कराला राजकारणापासून अलग ठेवून एक वर्षाच्या आत निवडणुका घेणे हे जाहीर नाम्यातील प्रमुख मुद्दे होते.

क्रांतीच्या यशानंतर नवे सरकार काय काय पावले टाकील याविषयीचेही ओझरते दिग्दर्शन या जाहीरनाम्यात होते. त्यातला महत्वाचा भाग होता शेती सुधारणेचा. सरकारी पडीक जमिनीचे योग्य वाटप करणे. खंडकऱ्यांना आणि शेत-

मजुरांना मालकी हक्क देणे आणि अनधिकृत झोपडपट्टयांना त्यांच्या जमीनीचा ताबा देणे हे मुद्दे त्यात आग्रहाने घालण्यात आले.

पाझोस आणि छिबास यांच्या सहकार्यासाठी जाहीरनामा अधिक जहाल आणि धारदार करता येत नाही याची फिडेलला जाणीव होती. परंतु सर्व संमत असा कार्यक्रम जनतेपुढे ठेवणे आवश्यक होते. त्यासाठी तरी थोडी तडजोड करणे भाग होते.

## मुरब्बी राजकारणी

जाहीरनामा तयार झाल्यावर पाझोस आणि छिबास हे गुप्तपणे उत्तर अमेरिकेत मियामी येथे गेले आणि तेथून तो प्रसिद्धीस दिला. फिडेल कास्ट्रोच्या सहीसकट तो जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याने त्याला बरीच प्रसिद्धी मिळाली. त्याचे श्रेय पाझोस आणि छिबास यांनी उपटण्याचा प्रयत्न केला. फिडेलचे गनिमी सैन्य आणि त्याची सव्वीस जुलै चळवळ आपल्याच ताब्यात आहे. आपण म्हणू त्या तडजोडीच्या मसुद्यावर सही करायला फिडेल तयार आहे आणि जाहीरनाम्यात उल्लेख केलेल्या अध्यक्षाच्या नेमणुकीसाठी उमेदवार दुसरा तिसरा कोणी नसून खुद्द आपणच आहोत अशी शेखी जेव्हा पाझोसने मिरवायला सुरुवात केली तेव्हा फिडेलने पाझोस आणि छिबास यांच्या सहकार्यातून अंग काढून घेतले आणि आपल्या चळवळीचा वेगळेपणा जाहीर केला. फिडेल वयाने कोवळा आहे, राजकीय दृष्टया अगदी अपरिपक्व आहे; आपण केव्हाही त्याच्या डोक्यावरून हात फिरवू शकू असा क्यूबातल्या अनेक मुरलेल्या राजकारण्यांचा समज होता. पण फिडेल राजकारणात चांगलाच तरबेज होता, पक्का बेरकी होता. त्यानेच सगळयांना धडा शिकविला.

या १२ जुलै १९५७ च्या जाहीरनाम्याच्या निमित्ताने हेही सांगणे आवश्यक आहे, की फिडेलने स्वतःला अजून कोठल्याही पक्षाला बांधून घेतले नव्हते. फिडेल हा छुपा कम्युनिस्ट होता. त्याने पुढे सबंध चळवळीचा विश्वासघात केला आणि क्युबाला कम्युनिस्ट कळपात लोटले, असा अमेरिकनांचा त्याच्यावर आरोप आहे. क्रांतीच्या यशानंतर तीन वर्षांनी फिडेलने आपणहून स्वतःला कम्युनिस्ट म्हणवून घेऊन जागतिक कम्युनिस्ट चळवळीत स्वतःचा वेगळा पंथ कसा निर्माण केला हा इतिहास वेगळा आहे. तो पुढे येईलच. पण क्रांतीपूर्व काळात फिडेल कोणत्याच पक्षाला बांधला नव्हता हे उघड आहे. मोंकाडावरील हल्ल्यापूर्वी काही महिने तो ओर्टीडोक्सो पक्षात होता एवढेच. पुढे त्या पक्षाचेही संबंध त्याने सोडले. फिडेलचे व्यक्तिमत्व, त्याचा जहालपणा आणि त्याचा बंडखोरपणा कोठल्याही एका पक्षाच्या चौकटीत बसणे शक्य नव्हते. कम्युनिस्टासारख्या कर्मठ, शिस्तबद्ध पक्षाच्या चाकोरीत तर नाहीच नाही.

फिडेल प्रथमपासून जहाल मतांचा होता. समतावादी होता. बाटीस्टाची जुलुमी,

भ्रष्टाचारी राजवट उलथून पाडून त्या जागी न्यायी व समतावादी, समाजवादी सरकार स्थापन करणे हे त्याचे ध्येय होते. हे न्यायी, समतावादी आणि समाजवादी सरकार कसे असेल, त्याचा रंग कोणता असेल याविषयी त्याने विचारही केला नव्हता. समोर येईल त्या स्थितीतून योग्य मार्ग काढीत आपल्या उद्दिष्टाकडे जाणे हा एकच ध्यास त्याला होता. क्रांती यशस्वी झाल्यावर आपणच सत्ताधारी व्हावे अशीही त्याची योजना नव्हती. त्याचे जहाल विचार त्याने मोंकाडा खटल्याच्या वेळीच 'इतिहास मला दोषमुक्त करील' या सुप्रसिद्ध भाषणात प्रकट केले होते. मार्क्सवादाचा त्याने अभ्यासही केला नव्हता. पुढे परिस्थितीनुरूप त्याचे विचार अधिकाधिक कडक होत गेले आणि त्याचीच नैसर्गिक परिणती साम्यवादात झाली. पण हा साम्यवादही त्याचा स्वतःचा होता. मास्को अथवा पेकिंगला मान तुकविणारा नव्हता. त्याच्या आत्यंतिक अमेरिका-द्वेषामुळे त्याच्यावर अमेरिकनांनी अगदी सुरुवातीपासूनच छुपा कम्युनिस्ट असा शिक्का मारायला सुरुवात केली, ही गोष्ट वेगळी. परंतु अमेरिकन साम्राज्यशाही एवढाच कम्युनिस्ट रशियन साम्राज्यशाहीचाही फिडेलला सिएरामेस्त्राच्या कालखंडात तिटकारा होता, हे अनेक अमेरिकन पत्रकारांनीच स्वतःच्या अनुभवावरून सांगितले आहे.

## अमेरिकी प्रचार

क्यूबन कम्युनिस्टांचा तर फिडेलला सुरुवातीला मुळीच पाठिंबा नव्हता. उलट बाटीस्टाच्या मंत्रीमंडळात सुरुवातीला काही कम्युनिस्ट होते. फिडेलच्या मोंकाडा हल्ल्याची कम्यूनिस्ट लोक 'मूर्ख धाडस' अशी हेटाळणी करीत. पुढे त्यांनाही सर्व दारे बंद झाल्यावर सिएरा मेस्त्राच्या अखेरच्या कालखंडात कम्युनिस्टांनी फिडेलला संपूर्ण पाठिंबा दिला. एवढेच नव्हे, तर त्याच्या सशस्त्र गनिमी चळवळीतही भाग घेतला. फिडेल कम्युनिस्ट विरोधी नव्हता. त्याला सर्व बाजूंनी पाठिंबा हवा होता. कम्युनिस्टांचा आणि त्याचा संबंध जुलै १९५८ मध्ये झाला. त्या महिन्यात कम्युनिस्टांचा एक जुना नेता कार्लो राफेल रॉड्रिग्ज हा स्वतः कास्ट्रोच्या गनिमी सैन्याला जाऊन मिळाला आणि नंतर सर्व क्यूबन कम्युनिस्टांनी फिडेलचे नेतृत्व स्वीकारले. कम्युनिस्टांनी फिडेलवर ताबा मिळविला किंवा फिडेलला गिळून टाकले असा लगेच अमेरिकेत प्रचार झाला. बावळट फिडेल कास्ट्रोला, मास्कोच्या तालावर चालणारे अनुभवी, वेरके कम्युनिस्ट आपल्या बोटाभोवती नाचविताहेत, गिळून टाकताहेत असा प्रचार अमेरिकेत झाला. जे या प्रचारावर विश्वास ठेवीत होते तेच खरे म्हणजे बावळट होते. फिडेलचा स्वभाव ज्यांना माहीत होता त्यांना कळून चुकले होते की, जिवंतपणी फिडेलला कोणी गिळू शकणार नाही. उजव्या गटातील राजकारणी हा धडा आधीच शिकले होते. पुढे चारपाच वर्षांनंतर आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीला देखील हा धडा मिळाला.

फिडेलप्रमाणेच चे गव्हेरावरही तो छुपा कम्युनिस्ट असल्याचे आरोप करण्यात

यत होते. पण गव्हेराला मार्क्सवादाची नुसती तोंडओळख तेवढी होती. कम्युनिस्ट पक्षाचा तो सभासद तर कधीच नव्हता. फिडेलप्रमाणेच डाव्या जहाल विचारांकडे त्याच्या मनाचा ओढा नैसर्गिकरीत्या वळला. क्रांतीच्या यशानंतर आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत क्यूबाचे स्वतंत्र अस्तित्व टिकवण्यात चेचाच वाटा मोठा होता. रशियन आणि चिनी कम्युनिस्टांशी त्याचे कधीच पटले नाही. म्हणूनच त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विचारांचा एक वेगळाच पंथ निर्माण झाला.

परंतु सिएरा मेस्त्राच्या त्या खडतर कालखंडात तरी फिडेल आणि चे यांना राजकारणावर चर्चा करायला फारशी फुरसद नव्हती. जिवंत राहणे, लढणे आणि युद्ध जिंकणे एवढाच प्रथम ध्यास त्यांना होता. क्यूबामधील व्यावसायिक राजकारण, अमेरिकेत मियामी मध्ये आश्रय घेतलेले क्यूबन नेते, त्यांची आपापसातील भांडणे, वाद, भावी सरकार विषयक त्यांच्या योजना, सिएरा मेस्त्रात पाठविली जाणारी त्यांची शिष्टमंडळे या गोष्टीत फिडेलला फारसा रस नव्हता. या गोष्टी क्रांती करताना अपरिहार्य ओझे होऊन बसतात आणि त्या स्वीकाराव्याच लागतात असे त्याचे मत होते. म्हणून तो त्यांना तोंड देत होता.

कास्ट्रोजवळ सिएरा मेस्त्रात एक जोरदार ट्रान्झिस्टर आल्यावर सिएरा मेस्त्रातील बंडखोरांचा आवाज सबंध क्यूबाभर उमटू लागला. फिडेलची भाषणे सर्वत्र ऐकू जाऊ लागली. या सर्व जाहीरनाम्यांमधून, भाषणांमधून फिडेलचे जे विचार जाहीर झाले तोच त्याच्या राजकीय तत्त्वप्रणालीचा पाया. लोकशाही, निवडणुका, मुक्त वृत्तपत्र व भाषण स्वातंत्र्य, १९४० च्या घटनेची पुनर्स्थापना हे मुद्दे जरी फिडेल आपल्या भाषणांमधून पुन्हा पुन्हा मांडत असला तरी क्यूबामध्ये आपल्याला खरी खुरी क्रांती घडवून आणायची आहे ही गोष्ट त्याने कधी नजरेआड केली नाही. बाकीच्या गोष्टी दुय्यम. ही क्रांती करताना आपल्याला कोणत्या अडचणी येतील आणि काय काय करावे लागेल याची त्याला तेव्हा जाणीव झाली असेल असे दिसत नाही. सर्वच क्रांतीचे तसेच होते. फ्रेंच आणि रशियन क्रांतीची तसेच चिनी क्रांतीचीही तीच कथा आहे.

चीनमध्ये माओ-त्से-तुंग क्रांतीसाठी लढत होता तेव्हा त्याच्यामागे कम्युनिस्ट पक्षाची सर्व तत्त्वप्रणाली होती. कास्ट्रो लढत होता तेव्हा कोणतीही प्रणाली त्याच्या डोक्यात नव्हती. फक्त निर्भेळ क्रांतीचे स्वप्न होते. त्यामुळेच समोर येईल त्या परिस्थितीला योग्य रीतीने तोंड देऊन मार्ग काढणे एवढा व्यवहारवाद तेवढा कास्ट्रोपुढे होता. बाटीस्टाचा पराभव करून देशात सामाजिक क्रांती घडवून आणणे, या उद्दिष्टात जे जे अडथळे समोर येतील ते दूर सारणे, हीच त्याची कार्यपद्धती होती.

त्यामुळे बारा जुलैचा जाहीरनामा हा बंडखोरांना आपल्या मार्गातील केवळ एक टप्पा वाटत होता. बाटीस्टाच्या जुलमी सैन्याचा रणांगणावर पराभव करण्याचे

मूलभूत कार्य आपणा गनिमी सैनिकांनाच करावे लागणार याबद्दल त्यांना शंका नव्हती. आणि त्या दृष्टीने आपली ताकद वाढविण्याचे त्यांचे काम चालू होते.

गनिमी सैन्यामध्ये नव्याने भरती होणाऱ्यांची रीघ लागू लागली तेव्हा सैन्याची आधुनिक धर्तीवर संघटना करण्याची गरज भासू लागली. अधिकाऱ्यांना रँक्स दिल्या गेल्या. सगळ्यात वरची जागा म्हणजे मेजर. चे गव्हेरा मेजर होता. सैन्याची सख्या वाढली तेव्हा त्यांच्या स्वतंत्र तुकड्या पाडून त्यांना सिएरा मेस्त्राच्या वेगवेगळ्या भागात स्वतंत्र हालचाली करण्यास पाठविण्यात आले. ताकद वाढली तशा या वेगळ्या तुकड्यांच्या हालचालीही वाढू लागल्या. सिएराच्या बाहेर पडून तुकड्या बाटीस्टाच्या सैनिकी तळावर हल्ले करू लागल्या.

## दोन सैन्यातील फरक

गनिमी सैन्याची शिस्त आणि नीतिधैर्य किती पक्के होते याचे मार्मिक विवेचन चे गव्हेराने केले आहे. तो म्हणतो, सैन्याचे स्वरूप कसेही असो शिस्त आणि नीतिधैर्य यांच्या पायावरच त्याची ताकद अवलंबून असते. क्यूबन गनिमी सैन्याचे युद्धातील नीतिधैर्य विलक्षण होते. आणि नेमका हाच गुण बाटीस्टाच्या भाडोत्री सैन्याजवळ नव्हता. 'पितृभूमीसाठी मरणे म्हणजे अमर होणे' या राष्ट्रगीतातील ओळीने आमच्या भावना तळापासून ढवळल्या जात. बाटीस्टाच्या सैनिकांनाही या ओळी पाठ होत्या. परंतु ते शब्द त्यांना आमच्यासारखे आतून ढवळून काढीत नसत. आम्ही एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन न्यायासाठी लढतो आहोत अशी आमची श्रद्धा होती. त्यांना आपण कशासाठी लढतो आहोत हेच माहीत नव्हते. हा दोन्ही बाजूच्या सैनिकांमधील मोठा फरक होता.

सैन्यातील शिस्तीचेही दोन प्रकार असतात. बाह्य शिस्त आणि अंतर्गत शिस्त. लष्करी राजवटीमध्ये नेहमीच बाह्य शिस्त अतिशय कडकपणे पाळली जाते. अंतर्गत शिस्त मात्र काहीच नसते. त्यामुळे अशा सैनिकांचे लढाईतील मनोधैर्य अतिशय थिटे पडते. आपण कशासाठी आणि कुणासाठी लढतो आहोत ? कोणाची तरी खाजगी राजवट राखण्यासाठी ? सैनिकी गणवेश घालून चोरी आणि लुटालूट आणि खून करण्यासाठी ? हे प्रश्न सतत त्यांच्या अंतर्मनाला भेडसावत असतात. अशा परिस्थितीत सैनिक लढतात खरे. पण कोठवर ? जोवर त्यांच्या प्राणाला त्याग करण्याची पाळी येत नाही तोवर.

या उलट गनिमी सैन्य असते. या सैन्याचे नीतिधैर्य भक्कम असते. बाह्य शिस्त अभावानेच असते. पण श्रद्धेमधून निर्माण झालेली अंतर्गत शिस्त परोपरीची असते. गनिमी सैनिक मद्यपान करीत नाहीत याचे कारण आपले अधिकारी रागावतील म्हणून नव्हे तर त्यांची मनोदेवता सांगत असते की मद्यपान हे आपल्या कर्तव्यात अडथळा आणील. लढण्यासाठी तो आपणहून आलेला असतो आणि लढता लढता देह ठेवणे हे आपले कर्तव्य आहे याची त्याला जाणीव असते.

असे श्रद्धावान, विलक्षण नीतिधैर्याचे, शिस्तबद्ध गनिमी सैनिक जेव्हा सिएरा मेस्त्राच्या खेड्यापाड्यातून हिंडू लागले तेव्हा बाटीस्टाचे क्रूर, जुलुमी आणि लोभी सैनिकांपेक्षा ते ग्रामीण लोकांना एकदम वेगळे आणि आपले वाटत यात नवल ते कसले ?

याचा अर्थ गनिमी सैन्यात काहीच समस्या नव्हत्या असे म्हणता येणार नाही. अधून मधून वाह्य बेशिस्तीची उदाहरणे घडत. शिक्षाही दिली जाई. शिस्तीबद्दलच्या अशाच एका आणीबाणीच्या प्रसंगाचे चे गव्हेराने वर्णन केले आहे.

लालो सार्डीनास हा स्थानिक शेतकरी गनिमी सैन्यात अधिकारी झालेला. फिडेल आणि चे यांचा तो आवडता होता. तो चे च्या तुकडीत होता. एकदा चे फिडेलशी चर्चा करायला गेला असताना तुकडीतील एका बेशिस्त जवानास लालोने पकडले आणि त्याच्या डोक्याशी धमकी देण्यासाठी पिस्तूल धरले. आणि अचानक गोळी सुटली. तो जवान जागच्या जागी ठार झाला.

चे ला ही बातमी कळली तेव्हा तो तावडतोब आपल्या तळावर परतला. लालोविषयी सर्व तुकडीत मोठाच असंतोष माजला होता. काहीजण लालोवर कोर्टमार्शल भरवून त्याचा वध करावा अशी मागणी करू लागले. चे ने लालोला कडक पहाऱ्यात ठेवले.

साक्षीदारांच्या साक्षी घेण्यात आल्या. लालोने मुद्दाम आधी ठरवून हा खून केला आहे असे काहीजण म्हणू लागले तर हा केवळ अपघात आहे असे इतर काही सांगू लागले. गनिमी सैन्याच्या नियमाप्रमाणे कुणालाही शारीरिक शिक्षा करण्यास बंदी होती आणि नियम मोडण्याची लालोची ही काही पहिलीच वेळ नव्हती.

## एक नाजूक प्रसंग

परिस्थिती मोठी नाजूक होती. लालो सार्डीनास हा एक उत्कृष्ट योद्धा होता, नेहमी आघाडीवर लढणारा. अत्यंत शिस्तीचा सैनिक. समर्पणाची पूर्ण भावना असलेला. या उलट त्याला वधाची शिक्षा देण्याची मागणी करणारे सर्वच आदर्श क्रांतिकारक होते असे म्हणता येणार नाही.

साक्षीपुरावे रात्र पडेपर्यंत चालले. रात्री फिडेल तळावर आला. मृत्यूदंडाची शिक्षा देण्यास त्याचा विरोध होता. परंतु सर्व तुकडीच्या मतानुसार निर्णय घ्यावा असे त्याला वाटत होते. लालो निर्भयपणे सर्व प्रकार पाहत होता. चेची बोलण्याची पाळी आली तेव्हा त्याने सांगितले, की हा प्रश्न एवढा साधा नाही. आपल्या लढ्याची खडतर परिस्थितीच आपल्या साथीच्या मृत्यूला जबाबदार आहे. खरा दोषी बाटीस्टा आहे. पण त्याचे म्हणणे कोणाला पटलेले दिसले नाही.

नंतर फिडेल बोलला. अंधार पडला होता. चर्चा पुढे चालविण्यासाठी काही मशाली पेटविण्यात आल्या. फिडेल चांगला एक तासभर बोलला. लालो सार्डीनासला दोषमुक्त करणे योग्य कसे होईल हे त्याने तपशीलवार सांगितले. आपले

दोष, आपली बेशिस्त, आपल्या रोजच्या चुका याचे त्याने वर्णन केले. अखेर शिस्तीचे पालन करतांनाच लालोच्या हातून हे कृत्य घडले हे आपण लक्षात ठेवले पाहिजे, मशालीच्या अंधुक फडफडत्या उजेडात अत्यंत भावनाविवशतेने फिडेल आर्जवी शब्दात बोलत होता आणि त्याचे म्हणणे बऱ्याच जणांना पटत असल्यासारखे दिसत होते. त्या रात्री मन वळवून घेण्याच्या त्याच्या विलक्षण हातोटीची परीक्षाच झाली.

फिडेलच्या वक्तृत्वानेही विरोधकांचे समाधान झाले नाही. तेव्हा लालोला काय शिक्षा द्यायची यावर मतदान घेण्याचे ठरले दोन शिक्षा होत्या. लगेच गोळी घालून ठार मारणे किंवा त्याचे अधिकारपद काढून घेणे. एका लहानशा वहीत जो तो आपले मत नोंदवू लागला. लालो स्वतः अतिरेकी होता. त्यामुळे लोक एक तर त्याच्यावर एकदम प्रेम तरी करीत किंवा त्याचा राग तरी करीत.

मशालींच्या अंधुक उजेडात मतदान झाले. चे गव्हेराकडे मते मोजण्याचे काम होते. अखेर मोजणी झाली तेव्हा तळावरील १४६ गनिमी सैनिकांपैकी ७० जणांनी लालोला मृत्यूदंड द्यावा असे मत दिले तर ७६ जणांनी विरुद्ध मत नोंदविल्याचे आढळून आले. अवघ्या सहा मतांनी लालोचा जीव वाचला.

पण एवढ्याने काही सगळे प्रकरण संपले नाही. मतदान झाल्यावरही लालोच्या जीवावर उठलेल्यापैकी काही लोक नाखूषच होते. अशांचा एक गट दुसरे दिवशी बंडखोरांना सोडून निघून गेला.

क्रांतीसैन्यातील शिस्त अशी पक्की होती. त्याच सुमारास काही दरोडेखोर क्रांतीसैन्याच्या नावाखाली सिएरा मेस्त्रात धुमाकूळ घालीत होते. त्यांना पकडून शिक्षा देण्याची कामगिरी चे गव्हेराच्या तुकडीवर आली. बंडखोरांच्या नावाखाली लुटालूट आणि अत्याचार करणाऱ्या या दरोडेखोरांना पकडून ठार मारण्यात आले, कारण त्या परिस्थितीत गोळी घालून मारणे हीच शिक्षा. शिक्षेचा दुसरा प्रकार अशक्य होता. सिएरात तुरुंग नव्हते.

आता सिएरामधील बराच मुलूख बाटीस्टाच्या सैनिकांपासून मुक्त झाला होता. मोठ्या भागावर आता फक्त बंडखोरांची हुकमत चालत होती बंडखोरांनी ठिक-ठिकाणी स्थायी तळ स्थापन केले. चे गव्हेराने तर एल् होंब्रितो या आपल्या तळावर ऑक्टोबर १९५७ च्या सुमारास एक जलविद्युत केंद्र स्थापण्याची तयारी चालविली. एक लहानसा छापखाना क्रांतिकारकांनी आणला होता. त्यामधून एक वृत्तपत्रही निघू लागले.

साल १९५७ संपत आले तेव्हा क्रांतिकारकांनी सिएरा मेस्त्राच्या बहुतेक भागात आपला पूर्ण अंमल बसविला होता. क्रांतिसैन्याची संख्या वेगाने वाढू लागली होती. सैन्याचे वेगवेगळे स्वतंत्र विभाग वेगवेगळ्या ठिकाणाहून निर्भयपणे हालचाली करू शकत होते चळवळीची व्याप्ती वाढत होती. सिएराच्या विभागात नागरी अंमल-

देखील आता क्रांतीकारकांचाच होता.

बाटीस्टाला आता काहीतरी करणे भाग होते. आतापर्यंत बंडखोरांकडे त्याने दुर्लक्षच केले होते. पण त्यांची ताकद वाढलेली पाहून त्याचे धाबे दणाणले आणि त्यांना निपटून टाकण्यासाठी त्याने एक मोठी लष्करी मोहीम हाती घेतली. ☐

बंडखोरांच्या वाढत्या ताकदीला बाटीस्टाच्या लष्कराने आपल्या वैशिष्टचपूर्ण शैलीत जोरदार प्रत्युत्तर दिले. ही शैली म्हणजे जुलूम, जबरदस्ती, घरादारांची जाळपोळ, लुटालूट आणि रक्तपात. बंडखोर हाती सापडत नाहीत म्हणून आजूबाजूच्या खेड्यातून दहशत निर्माण करायची आणि तरुण मुलांना निवडून गोळ्या घालून ठार करायचे असा लष्कराने उद्योग आरंभिला. सैनिकांचे आणि स्थानिक जनतेचे संबंध कधीच चांगले नव्हते. नंतर तर आणखीच बिघडले. स्थानिक लोक आणि बाटीस्टाचे सैन्य यांच्यात एक प्रचंड दरी तयार झाली. जुलुमाच्या धाकाने स्थानिक जनता सैनिकांना भीत असे तर बंडखोर यांच्यातच लपले आहेत याची खात्री पटून सैनिक स्थानिक लोकांना घाबरत. शक्य होईल तेव्हा सैनिकांना चुकीचे मार्ग सांगून भलतीकडेच फिरविणे, त्यांची शस्त्रे चोरणे आणि त्यांच्या हालचालीची इत्थंभूत माहिती बंडखोरांना पुरविणे हे उद्योग तरुण मंडळी करीत.

सिएरा मेस्त्रामधील बंडखोरांना निपटून टाकण्याची मोहीम बाटीस्टाने आखली तेव्हा प्रथम सिएरामधील हजारो कुटुंबांना बाजूच्या शहरांमध्ये हलविण्याचे ठरविले. सिएरा निर्मनुष्य केले म्हणजे बंडखोरांना कुणाची मदत मिळणार नाही अशी कल्पना होती. असा हुकूम निघाल्याबरोबर लोक खवळले. ज्यांना शक्य होते ते पुरुष आणि जवळ जवळ सारे तरुण या गोष्टीला विरोध करू लागले आणि आपोआप बंडखोरांना सामील झाले.

स्त्रिया, मुले आणि म्हातारे यांची मोठी केविलवाणी अवस्था होती. हाती लागेल ते सामान गाठोड्यात बांधून आपली जन्मभूमी सोडून या लोकांच्या लांब लांब रांगा सैनिकी पहाऱ्यात शहरांकडे निघाल्या. शहरात त्यांच्या पुनर्वसनाची अर्थातच काहीच व्यवस्था नव्हती. शहराच्या कडेला निवारा मिळेल तिथे ही बेकार कुटुंबे जाऊन पडली. अन्न नाही, पाणी नाही, दुसरी व्यवस्था नाही. भूकबळी पडू लागले. इकडे सैनिकांनी त्यांची घरेदारे जाळून टाकली होती.

या निर्वासितांच्या परिस्थितीमुळे सर्व क्यूबात संतापाची लाट उसळली. आंतरराष्ट्रीय पातळीवर हा प्रश्न चर्चिला जाऊ लागला तेव्हा एकदम पवित्रा बदलला. पुनर्वसनाची प्रक्रिया थांबली आणि निर्वासितांना आपापल्या गावी जाण्यास परवानगी देण्यात आली. परंतु ते सिएरा मेस्त्रात परत येतात तो त्यांच्या नजरेला

पडली बाँब वर्षावात उध्वस्त झालेली किंवा जाळपोळीने राख झालेली घरे बाटीस्टाला मनोमन शिव्या देत आणि संधी येईल तेव्हा सैनिकांशी लढण्याची मनोमन प्रतिज्ञा करीत. त्यांनी त्या राखेवरच घरे बांधायला सुरुवात केली.

इकडे सिएरा मेस्त्रात फिडेलचे गनिमी सैन्य शक्तीमान बनत असतानाच सबंध क्यूबन द्वीपकल्पातील डोंगराळ भागामध्ये तुरळक गनिमी हालचाली चालू होत्याच. यापैकी काहींचा सव्वीस जुलै चळवळीशी संबंध होता. काहींचा नव्हता.

## नाविक तळाचा उठाव

सशस्त्र चळवळीतील आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे ५ सप्टेंबर १९५७ चा शेनफुगो नाविक तळाचा उठाव. खरे म्हणजे संबंध लष्करातील एका भूमिगत संघटनेने सर्व क्यूबन द्वीपकल्पात एकदम लष्करी उठाव घडवून आणण्याची ही योजना आखली होती. ५ सप्टेंबर ही तारीख ठरविण्यात आली. पण ऐनवेळी उठाव स्थगित करण्यात आला. सर्वत्र तसे संदेश धाडण्यात आले. शेनफुगो तळाला मात्र वेळेवर संदेश मिळाला नाही. निरोप मिळाला तेव्हा हालचालींना सुरुवात झाली होती आणि त्या परिस्थितीत उठाव थोपवून-धरणे शक्य नव्हते. त्यामुळे शेनेफुगोच्या गटाने उठाव तसाच पुढे नेण्याचे ठरविले.

उठाव तात्पुरता यशस्वी झाला आणि सबंध शहर क्रांतीकारकांच्या ताब्यात आले. सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांनीही उठावात भाग घेतला. परंतु उठावात भाग घेतलेल्या क्रांतिकारकांनी एक चूक केली. एकट्या शेनफुगो शहरातच उठाव झाला आहे हे त्यांना कळून चुकले होते. त्यामुळे थोड्याच वेळात बाटीस्टाचे सैन्य येऊन थडकेल याचीही खात्री होती. अशा वेळी शस्त्रास्त्रे घेऊन जवळच्याच एस्काम्ब्रे पर्वताच्या जंगलामध्ये शिरून तेथून गनिमी पद्धतीने आपला लढा चालू ठेवण्याचा प्रयत्न न करताच शेनफुगो शहरच रक्ताचा शेवटचा थेंब सांडेपर्यंत लढण्याचा त्यांनी निर्धार केला. परिणाम उघड होता. बाटीस्टाचे सैन्य सावकाश शेनफुगो शहराभोवती जमले आणि हल्ला चढविला.

क्रांतिकारकांची भीषण कत्तल झाली. शहरांमधून लढण्याऐवजी जंगलामधून गनिमी काव्याने लढणे अधिक श्रेयस्कर आहे हे अजून बऱ्याच क्यूबन क्रांतिकारकांना पटत नव्हते.

सव्वीस जुलैच्या क्रांतिकारकांचे शहरामधून ठिकठिकाणी दहशतवादाचे उद्योग चालू होते. पण अशा प्रकरणामधून निरपराध लोकच सैन्याच्या अत्याचाराला बळी पडत होते.

गनिमी सैन्याची जशी संख्या वाढू लागली तशी शस्त्रे कमी पडू लागली. शहरातील सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांकडून शस्त्रे मिळवणे हाच प्रमुख मार्ग होता. शहरातील कार्यकर्ते सिएरात शस्त्र पाठविण्यास नाखूष असत. कारण त्यांना स्वतःची गरज आधी भागवायची असे.

हळूहळू गनिमी क्रांतिकारकांनी सिएरा मधील सुरक्षित भागात छोटे मोठे उद्योग उभारण्यास सुरुवात केली. विमानातूनही दिसणार नाही अशा स्थळी प्रथम चे गव्हेराने एक मोठे रुग्णालय उभारले. सैन्याच्या वेगवेगळ्या तुकड्यानाही मग आपापल्या तळामध्ये रुग्णालये उभारली. सैनिकी गणवेश, बूट, पट्टे, टोप्या तयार करण्यासाठी छोट्या यंत्रशाळा उभारल्या. बंदुका, पिस्तूल तयार करण्याचे आणि बॉम्ब् बनविण्याचे छोटे कारखाने वेगवेगळ्या भागात उभारले गेले. थोड्या साधन सामग्रीमध्ये बनणारी आणि जास्तीत जास्त काम देणारी आणि पुन्हा पुन्हा वापरता येणारी अशी स्फोटक हत्यारे क्रांतिकारकांनी प्रयत्नांनी बनविलीं.

धूम्रपान हे क्यूबाचे राष्ट्रीय व्यसन. क्रांतिकारकांनी सिगार बनविण्याचीही एक फॅक्टरी टाकली, विद्युत निर्मितीची सोय केली. रेडिओ ब्रॉडकास्टींगचाही उपक्रम आरंभिला. अर्थात तेथील कारखान्यातील उत्पादनाला गनिमी सैनिकां-बरोबरच स्थानिक जनताही ग्राहक होतीच.

बाहेरच्या क्यूबातील राजकीय परिस्थिती त्या वेळी अत्यंत गुंतागुंतीची आणि परस्परविरोधी झाली होती.

बाटीस्टाच्या राजवटीला निवडून आलेल्या कॉंग्रेसचा पाठिंबा होता. ही कॉंग्रेस कोणकोणत्या मार्गाने निवडून आली आहे हे सर्व क्यूबन जनतेला माहीत होते. ही कॉंग्रेस म्हणजे बाटीस्टाचा रबर स्टॅंप. वृत्तपत्रावर वाटेल तेव्हा निर्बंध टाकले जात होते. सोयीचे असेल तेव्हा निर्बंध उठविले जात. पुन्हा गैरसोय झाली की निर्बंध.

निर्बंध नसतील तेव्हा काही एका विवक्षित मर्यादेपर्यंत विरोधी मतांना स्थान मिळेल. बहुतेक सर्व विरोधी गट सत्तेच्या म्हणजे पर्यायाने पैश्यांच्या मागे लागलेले. बहुतेक विरोधी गटात बाटीस्टाचे एजंटस् पेरलेले. ते ऐनवेळी दगा देत. गटांमध्ये आपापसात मारामाऱ्या आणि धुमाकूळ.

विद्यार्थ्यांच्या संघटनेनेही सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला होता. परंतु सुरुवातीला तरी संघटनेचा सव्वीस जुलै चळवळीशी संबंध नव्हता. क्यूबन कम्युनिस्ट पक्ष सुरुवातीस फिडेलचा उपहास करीत होता, पण बाटीस्टाने त्या पक्षावर बंदी घालताच कम्युनिस्ट कार्यकर्ते भूमिगत झाले आणि काही बाबतीत सव्वीस जुलैशी सहकार्य करू लागले. परंतु दोन्ही संघटनांमध्ये परस्परांविषयी अविश्वास होता. कम्युनिस्ट पुढारी गनिमी युद्धाचे महत्त्व मानायला तयार नव्हते आणि फिडेलचे नेतृत्वही स्वीकारीत नव्हते. अखेर गनिमी युद्धाच्या शेवटच्या अवस्थेत काही महत्त्वाचे कम्युनिस्ट कार्यकर्ते क्रांतिकारकांना येऊन मिळाले. पण त्यांचा फारसा प्रभाव पडला नाही.

खुद्द सव्वीस जुलै चळवळीत गनिमी सैन्य आणि शहरी संघटना यांच्यात अनेक बाबतीत तीव्र मतभेद होते. गनिमी युद्धाची व्याप्ती हळूहळू वाढवून सर्व शहरांना वेढे देता देतील असा आत्मविश्वास सिएरामधील कार्यकर्त्यात होता आणि अशा

तऱ्हेने सर्व शहरांची नाकेबंदी करून बाटीस्टा राजवटीला शरण आणणे शक्य आहे असे त्यांना वाटत होते. परंतु शहरी संघटनेचा पवित्रा वेगळा होता. सर्व शहरांमध्ये सशस्त्र चळवळी चालवून त्यांची परिणती सार्वत्रिक संपात करावयाची व अशा तऱ्हेने बाटीस्टाला सत्तेवरून खेचायचे असा त्यांचा इरादा होता. शहरी पवित्रा पुढे पूर्णपणे फसल्याचे आढळून आले. १९५८ मध्ये एप्रिल महिन्यात शहरी संघटनेने सार्वत्रिक संपाचा आदेश दिला होता. पण हा संप म्हणजे संघटनेचा प्रचंड पराभव ठरला आणि आपोआप सिएराला अधिक महत्त्व आले.

सव्वीस जुलैच्या या दोन शाखांमधील मतभेदांचा फायदा घेऊन त्यांना अलग पाडण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. पण आपापसातले तीव्र मतभेद सांभाळूनही संघटनेने आपली एकी कायम टिकविली. फिडेल कास्ट्रोचेही नेतृत्व अबाधित राहिले.

सव्वीस जुलै चळवळीचा फायदा घेऊन फेलीप पाओससारखे लोक स्वत:ची पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करताहेत असे लक्षात येताच फिडेलने चौदा डिसेंबर १९५७ रोजी एक जाहीर पत्रक काढले आणि त्यात पुन्हा आपली भूमिका मांडली आणि बाटीस्टाची राजवट कोसळेपर्यंत सशस्त्र लढा चालूच राहील अशी घोषणा केली.

## धामधुमीचे वर्ष

पुढचे संबंध १९५८ साल छोट्या मोठ्या चकमकी, बाटीस्टाच्या विमानदलाचे सिएरावर अव्याहत बाँबहल्ले, सैनिक आणि पोलिसांच्या अत्याचाराचा ऊत, जाहिरनामे, प्रती जाहिरनामे, घोषणा अशा धामधुमीत गेले. बाटीस्टाच्या लष्करी मोहीमांना तोंड देण्यासाठी गनिमी सैनिकांनीही आक्रमक मोहीमा सुरू केल्या. फिडेल कास्ट्रो, चे गव्हेरा, राऊल कास्ट्रो यांच्या नेतृत्वाखालील बंडखोरांच्या लहानशा फौजा वेगाने हालचाल करून लष्कराची त्रेधा उडवू लागल्या. या वेळपर्यंत क्रांतिकारकांचे जाळे दूरवर पसरून कनिष्ट झाले होते. मार्च महिन्यात तर मेक्सिकोमधून गुप्तपणे विमानातून थेट सिएरात शस्त्रपुरवठा होऊ लागला.

मार्च महिना उजाडला तेव्हा सव्वीस जुलै चळवळीने सार्वत्रिक संपाच्या तयारीला शहरांमधून जोरात सुरुवात केली. ९ एप्रिल हा संपाचा दिवस ठरला होता. परंतु संपाचा दिवस जाहीर न करण्याचे ठरले. ऐनवेळी अचानकपणे संप चालू करायचे ठरले.

संपाला मदत करण्यासाठी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात फिडेलच्या गनिमी सैन्याने ठिकठिकाणी आक्रमण धोरण स्वीकारले. कॅमिलो शेनफुगोच्या तुकडीने ओरियेन्ते प्रांतातील बयामो गावाजवळ सिएरातून उडी घेतली आणि सैनिकी बराकीजवळ घातपाताचे सत्र आरंभिले. एप्रिल १ रोजी राऊल कास्ट्रोच्या तुकडीने सिएरा दि क्रिस्तल येथपर्यंत धडक मारली आणि सिएरा मेस्त्रा व सिएरा दि क्रिस्तक यांना वेगळे करणाऱ्या खोऱ्यातून जाणाऱ्या टेलिफोनच्या वीजेच्या तारा

आणि रेल्वे लाईनी यांची नासधूस करण्यास प्रारंभ केला. देशातले वातावरण तंग होते. सार्वत्रिक संपाची अपेक्षा सर्वांनाच होती. फक्त दिवस माहिती नव्हता.

## संप फसला

नऊ एप्रिलचा दिवस उजाडला. बरोबर अकरा वाजता हॅवानातील एक टेलिव्हीजन स्टेशन काबीज करून तेथून सार्वत्रिक संपाची घोषणा करायची आणि स्टेशन उडवून द्यायचे अशी योजना होती. ऐनवेळी काय झाले कुणास ठाऊक, टेलिव्हिजनवर घोषणा देण्याचा बेत फसला. हॅवानात ठिकठिकाणी गोळीबाराच्या फैरी ऐकू आल्या. थोड्या चकमकी, जीव घेऊन पळणारे तरुण आणि त्यांच्या मागे गोळ्या झाडत पाठलाग करीत असलेले पोलीस. संप साफ फसला होता. अर्ध्या तासात हॅवानाच्या रस्त्यावर १४० तरुण मरून पडले. कोणीतरी पोलिसांना आधीच खबर दिली होती. बरेच कार्यकर्ते कम्युनिस्टांवरच दगाबाजीचा आरोप करीत होते.

हॅवानातील संप फसला. इतर ठिकाणी मात्र बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला. विशेषत: जिथे जिथे सपाट प्रदेशात फिडेलचे गनिमी सैन्य घुसले होते तिथे. परंतु योजनेप्रमाणे गनिमी सैन्य मैदानी प्रदेशात फार काळ राहणार नव्हते. तीन चार ठिकाणी बाटीस्टाच्या लष्करी तळावर जबरदस्त प्रहार करून आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखवून बंडखोरांच्या तुकड्या लगेच जंगलात आणि पहाडात सुरक्षित स्थळी विजेच्या वेगाने परतल्या.

परंतु एकूणच संपाच्या अपयशाने शहरी चळवळीत एकदम मरगळ आली. पोलीसांचे दडपशाहीचे सत्र अधिकच वाढले.

याच सुमारास घडलेली एक घटना एकदम बांगलादेशच्या युद्धाच्या वेळच्या अमेरिकन दुटप्पेगिरीची आठवण करून देते. क्यूबामधील दडपशाही वाढू लागली, रक्तपात वाढू लागला तेव्हा अमेरिकेत अमेरिकन सरकारवर बाटीस्टाला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करीत असल्याबद्दल जोरदार टीका होऊ लागली. कारण बंडखोरांशी लढताना बाटीस्टा सारी अमेरिकन शस्त्रास्त्रेच वापरीत होता. जिथे जिथे म्हणून बंडखोरांच्या हालचालींचा संशय येई त्या खेड्यांवर नागरी वस्तीचा विचार न करता बाटीस्टाची विमाने बाँबवर्षाव करीत. हे बाँब्सुही साधे नसत. शक्तीची अमेरिकन रॉकेटस बाटीस्टाचे वायुदल वापरीत असे. गनिमी सैन्याला तर या रॉकेट्सना आणि बाँब वर्षावाला रोज तोंड द्यावे लागत असेच पण नागरी वस्तीचेही भयंकर हाल होत. स्त्रिया, मुले, म्हातारे, गुरे – सारे या बाँब्सना बळी पडत.

खूपच टीका झाल्यावर बाटीस्टाला शस्त्रपुरवठा बंद करण्याचे अमेरिकेने जाहीर केले. परंतु फसलेल्या सार्वत्रिक संपानंतर बरोबर एक महिन्याने क्यूबामध्ये तीनशे अमरिकन रॉकेट्स् नुकतीच आल्याची बातमी झाली. गडबड उडाली. आरोप

प्रत्यारोप होऊ लागले. प्रथम रॉकेट्स् पाठविल्याचाच अमेरिकन सरकारने इन्कार केला. अखेर प्रकरण दबत नाही असे पाहिल्यावर असे जाहीर करण्यात आले की, अमेरिकेने शस्त्रबंदी जाहीर करण्याआधीच बाटीस्टा सरकारची ही तीनशे रॉकेट्सची ऑर्डर स्वीकारण्यात आली होती. त्यानुसार ती पुरविण्यात आली !

आणि अमेरिकेने जरी शस्त्रबंदी घातली असली तरी आजूबाजूच्या लॅटिन अमेरिकन देशांमधून बाटीस्टाला भरपूर अमेरिकन शस्त्रे सहजासहजी मिळू शकत होती. पण हा शस्त्रास्त्रांचा पुरवठा आणणारे वैमानिकच राजवटीला कंटाळून सहवीस जुलै चळवळीला येऊन मिळू लागले.

## अत्यंत कठीण काळ

बंडखोरांना निपटून टाकण्याची अखेरची जोरदार मोहीम बाटीस्टाने २४ मे १९५८ रोजी सुरू केली. आपली सर्व शक्ती त्याने या मोहीमेत ओतली. सारे सैन्य, विमाने, रणगाडे, रॉकेट्स्, हाती येतील ती साधने त्याने वापरली. ही मोहीम कास्ट्रोला अत्यंत कठीण गेली. सिएरा मेस्त्रातील अत्यंत कठीण काळापैकी हा काळ होता. गनिमी सैन्य नष्ट होता होता वाचले. बाटीस्टाच्या सैन्यात भ्रष्टाचार नसता आणि पुरेसे नीतीधैर्य असते व कास्ट्रोचे लष्करी डावपेच कमी पडते किंवा बंडखोरांची सहनशक्ती कमी पडली तर गनिमी सैन्य खलासच झाले असते.

बाटीस्टाची तयारी पाहून कास्ट्रोने दूर दूर गेलेल्या आपल्या तुकड्यांना सिएरा मेस्त्रात एकत्र केले. काही तुकड्या ओरिएन्ते प्रांताच्या अगदी दक्षिणेकडे घुसल्या होत्या. राऊल कास्ट्रोची तुकडी सोडून सहा तुकड्या पिको तुर्कीनो या बंडखोरांच्या मुख्य तळाभोवती संरक्षणासाठी उभ्या ठाकल्या. या सहा तुकड्यांचे नेतृत्व होते स्वत: कमांडर फिडेल कास्ट्रो आणि बाकीचे मेजर्स जुआन अल्मेडा, कॅमिलो शेनफुगो, चे गव्हेरा, रामिरो वाल्देस आणि क्रेसेन्शो पेरेझ यांच्याकडे. तीस किलोमीटरची वर्तुळाकार साखळी या तुकड्यांनी आपल्या मुख्य-तळाभोवती धरली.

बाटीस्टाच्या दोन फौजा पाच मैलाचे अंतर ठेवून या तळाच्या दिशेने निघाल्या. सिएराच्या पायथ्याच्या टेकड्या, अरूंद दऱ्या, नद्यांची खोल खोरी, रस्ते नसलेली जंगले यांना पार करून या फौजांना पुढे सरकायचे होते. सैनिकांना त्या भागाची माहिती कमीच होती. पाच-पाच बंडखोरांच्या छोट्याश्या तुकड्या ठिकठिकाणी सापळे रचून अचानक हल्ले चढवून या फौजांच्या मोठ्या मोठ्या तुकड्यांना सहज गोंधळात टाकू शकत. पण फौजा पुढेच सरकत होत्या. चारी बाजूने वेढा पडत होता.

यावेळी कास्ट्रोजवळ किती सैनिक या युद्धात होते हा वादाचा प्रश्न आहे. काही म्हणतात फक्त ३०० गनिमी बंडखोर होते. पण हा आकडा फार कमी वाटतो. तेथली संबंध लोकसंख्याच कास्ट्रोच्या बाजूची होती. बाटीस्टाने दहा हजार सैनिक या मोहिमेत ओतले होते.

शेवटी पिको तुर्कीनोच्या उतारावरील सान्तो दोमिन्गो या खेड्याजवळ लढाईला

१९ जून रोजी तोंड लागले, चार दिवस घनघोर लढाई झाली. नंतर जोर कमी झाला. पण रोजची गोळागोळी सुरूच राहिली. विमाने येऊन बॉंब वर्षाव करून जात. परंतु तो जंगली प्रदेशच एवढा विचित्र होता की आपण नेमके कोणावर बॉंब टाकीत आहोत हे पायलट्स्नाच कळत नसे. २९ जूनला फिडेलने जोराची उचल घेऊन प्रतिहल्ला सुरू केला.

## फिडेलचा जोर वाढला

ही लढाई सबंध जून आणि जुलै महिनाभर चालू होती. पण एकदा सुरुवातीचा हल्ला पचविल्यावर कास्ट्रोची ताकद वाढू लागली. कास्ट्रोला जंगलाची आपल्या तळहातासारखी माहिती होती. आणि बाटीस्टाच्या योजनेची खडा न् खडा माहिती मिळेल अशी व्यवस्था होती. या दोन्ही गोष्टी बाटीस्टाच्या लष्कराजवळ नव्हत्या. लष्कर दूर दूर पसरले होते. विमानांचा आणि रणगाड्यांचा काहीच उपयोग होत नव्हता. पिछाडीहून येणारी रसद बंडखोर मोठ्या जिद्दीने आणि सातत्याने तोडत होते. बाटीस्टांच्या सैनिकांचे रणधैर्य आधीच कमी. त्यात तहान-भूक, अनोळखी प्रदेश याने ते आणखीच गर्भगळीत झालेले. ठार होणारांची संख्या वाढू लागलेली. ऑगस्टच्या मध्यापर्यंत सिएराला वेढा घातलेल्या लष्कराचा नक्षा पार उतरला. आणि सैन्य मागे परतले. क्रांतिकारकांनी ४४३ सैनिकांना कैद केले होते. त्यांना रेडक्रॉसच्या स्वाधीन केले. रणगाडे, मॉर्टर्स, तोफा, मशीनगन्स, बंदुका आणि दारूगोळा असा प्रचंड शस्त्रसंभार बंडखोरांच्या हाती पडला.

बाटीस्टाचा सरळ सरळ पराभव झाला होता. समोरासमोरच्या युद्धात फिडेलच्या छोट्याश्या सैन्याने स्पष्ट विजय मिळवून आपले सामर्थ्य दाखवून दिले होते. फिडेलचा मार्ग स्पष्ट दिसत होता आणि बाटीस्टाच्या राजवटीचे भविष्य अटळ होते. किती दिवस टिकणार एवढेच मोजायचे. परंतु पराभव अद्याप बाटीस्टाने स्वीकारला नव्हता. अमेरिकन राजदूत अर्ल टी. स्मिथ यानेही वस्तुस्थितीकडे डोळे झाक केली होती. हॅवानामध्ये अमेरिकन दूतावासात बाटीस्टाच्या अकार्यक्षम पराभूत जनरल्स्ना अजूनही मेजवान्या दिल्या जात होत्या. खास शौर्य पदके दिली जात होती.

परंतु फिडेलच्या या विजयाचा अर्थ क्यूबन कम्युनिस्टांनी ताबडतोब ओळखला होता. वारे कुठल्या दिशेने वाहते आहे हे त्यांच्या लक्षात आले होते आणि त्यानुसार त्यांनी फिडेलच्या प्रवाहात पक्षाला पूर्णपणे झोकून दिले.

या विजयाचा फायदा घेऊन क्रांतिकारकांनी अखेरचा पवित्रा घेण्याचे ठरविले आणि योजना आखल्या. दूरवरच्या तीन महत्वाच्या ठाण्यांवर हल्ले करण्याचे ठरले. ओरिएन्ते प्रांतातील सांत्यागो-दि-क्यूबा, मध्य क्यूबामधील सिएरा दि-एस्कांब्रे जवळील लास विलास आणि क्यूबाच्या अगदी दुसऱ्या टोकाचे पिनारदिल-रियो. लास विलास वर चाल करून जाण्याची कामगिरी गव्हेरावर सोपविण्यात आली. पिनार-दिल-रियो कॅमिलो शेनफुगोसच्या तुकडीने घ्यायचे होते. लास विलास-

कडे जाताना क्यूबाच्या दोन भागांना जोडणारे सर्व रस्ते पद्धतशीरपणे तोडणे, वाटेत जे जे क्रांतिकारी गट सापडतील त्यांच्याशी संपर्क जोडणे आणि मुक्त झालेल्या प्रदेशात क्रांतिकारक सत्ता स्थापन करणे ही कामगिरी चे गव्हेरावर देण्यात आली.

## चे चा लाँगमार्च

ऑगस्ट ३०, १९५८ रोजी चे गव्हेरा प्रत्येकी ऐंशी क्रांतिकारकांच्या दोन तुकड्या घेऊन लास विलासकडे निघणार होता. परंतु त्यांच्या ट्रक्स्साठी येणारे पेट्रोल शत्रूच्या हाती पडले. पुन्हा एकदा चेची बंडखोर तुकडी पायावर आली. पुढचा संबंध शेकडो मैलांचा प्रवास चे ने पायी केला. ऑगस्ट-सप्टेंबरमधील हवामान अत्यंत वाईट होते. घनघोर वादळे आणि तुफान पाऊस. मोठे रस्ते तर टाळायचे होते. त्यामुळे नद्या, नाले, ओढे पार करीत, दलदलीतून मार्ग काढीत जड शस्त्रास्त्रे रॉकेट्स् आता खांद्यावरून वाहून नेत पुढे जावे लागले. बंडखोरांच्या अपार नीतिधैर्याची ही अखेरची परीक्षा होती. ओरियेन्ते प्रांत ओलांडल्यावर नागरी वस्त्यांना टाळून जावे लागे. वाटेत विश्रांती घेणे मुश्कील कारण गस्तांचा भयानक सुळसुळाट. मध्ये एका ठिकाणी चुकून एका लष्करी तुकडीशी गाठ पडली आणि चकमक उडाली. दोन क्रांतिकारक ठार झाले आणि क्रांतिकारक सुखरूप निसटले. पण आता चे गव्हेरा ओरियेन्ते प्रान्त सोडून लास विलासच्या दिशेने निघाला आहे ही माहिती शत्रूला कळली. तेव्हापासून शत्रू सनिकही पाठीवर लागले. बातीस्टाची विमानेही डोक्यावर घिरट्या घालू लागली. थोडे मोकळ्यावर आले की बाँबवर्षाव. शत्रू सैनिकांशी चकमकी टाळणे अशक्य होते. अशा स्थितीत स्थानिक लोकांचा पाठिंबाच आश्रयाला होता. पण कधी कधी तेही लोक दगा देत. चकमकीमध्ये आणि बाँबवर्षावात जखमी झालेल्या माणसांनाही बरोबर बाळगावे लागे. दलदलीमुळे अनेकांचे बूट फाटलेले. त्यामुळे उघड्या पायांनी चालावे लागले. पायांचे भयंकर रोग होऊ लागले आणि अशाही परिस्थितीत चालीचा वेग मंदावता येत नव्हता. कारण शत्रू पाठीवरच होता असे नव्हे तर चारी बाजूने होता.

अशा तऱ्हेने थकलेले, जर्जर झालेले आणि संख्येने कमी झालेले क्रांती सैनिक अखेर सहा ऑक्टोबरला सिएरा दि एस्क्रांबेच्या एक सुरक्षित स्थळी पोचले आणि हा छोटासा 'लाँग मार्च' संपुष्टात आला. हा मार्च हेही एक लोकविलक्षण धाडस होते. आणि केवळ जिद्द आणि अपार मानसिक सामर्थ्य या जोरावरच क्रांतिकारक हे धाडस पूर्ण करू शकले. कॅमिलोच्या तुकड्याही आणखी पुढे पिनार-दिल-रियो ला जाण्यासाठी तिथे येऊन पोचल्या. कॅमिलो फिडेलला लिहितो: 'गेल्या एकतीस दिवसात आम्ही फक्त अकरा वेळा खाल्ले; एकदा तर घोड्याचे कच्चे मांस मीठाशिवायच खाल्ले.'

लास विलास प्रांतातील सिएरा एस्क्रांबे या पहाडीत पोचल्यावर चे गव्हेरा

आणि कॅमिलो यांनी विश्रांती घेऊन हळूहळू आपल्या हालचालींना प्रारंभ केला.

तीन नोव्हेंबरला बाटीस्टाने अध्यक्षीय निवडणुका घेण्याचे एक नाटक ठरविले होते. हे नाटक आहे हे साऱ्याच लोकांना माहित होते. अध्यक्षीय उमेदवार होता बाटीस्टाचा पित्तू डॉ. आंद्रे अगेरो. सत्ता अर्थातच बाटीस्टाच्याच हाती राहणार होती. चे गव्हेराच्या तुकडीकडे काम होते आजूबाजूच्या शहरांचे दळणवळण तोडणे आणि निवडणुकीविरूद्ध प्रचार करणे. प्रचारामुळे निवडणुकांना मतदान फारच कमी झाले आणि निवडणुका म्हणजे खरोखरचा फॉर्स झाला. चे आणि कॅमिलो या दोघांचीही संख्या वाढली होती. आणि क्रांतीकारकाच्या तुकड्या लास विलास प्रांतात सर्वत्र संचार करू लागल्या. शहरा शहरातील सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांना निवडून त्यांना तोडफोडींच्या कृत्यांचे शिक्षण देण्यासाठी चे ने छोटी छोटी शिबिरे काढली. जो तो तरुण आता डोंगराकडे धाव घेताना दिसू लागला होता. जनमानसाला प्रचंड भरती आली होती आणि बाटीस्टाचे दिवस भरत आले आले होते.

इकडे दक्षिणेकडे ओरियेन्ते प्रांतात फिडेल आणि राऊल कास्ट्रो यांनी आपापल्या तुकड्यांसह दिनांक सात नोव्हेंबरला सांत्यागो – दि – क्यूबा शहरावर चाल करून जाण्यास सुरुवात केली. राहुलच्या फौजांची संख्या आता २ हजारावर गेली होती. शत्रूच्या खड्या फौजांना समोरासमोर तोंड देण्याची आता बंडखोरांची तयारी होती आणि सबंध जनमत त्यांच्या बाजूला होते. आणि बाटीस्टाच्या सैन्याचे मनोधैर्य एवढे रसातळाला गेले होते की, गोळागोळी सुरू होताच तासाभरातच सैनिक पाय काढू लागत. वाटेतली लहान मोठी शहरे सहज काबीज करीत. फिडेल आणि राहुल कास्ट्रो वेगवेगळ्या दिशांनी सांत्यागो कडे चाल करीत होते. सांत्यागो काबीज करताच तात्पुरते सरकार स्थापन झाल्याची घोषणा करता आली असती.

पण फिडेल सांत्यागोला पोचण्यापूर्वीच जर कौणी बाटीस्टाच्या लष्कराचे कंबरडे मोडले असेल तर ते गव्हेराने सान्ता क्लारा येथे.

नोव्हेंबर–डिसेंबरच्या दरम्यान गव्हेरा आणि कॅमिलो यांच्या तुकड्या, फौजा म्हणवून घेण्याइतपत वाढल्या होत्या. लास व्हिलास प्रांतातील जवळ जवळ सर्व दळणवळण हळू हळू या दोघांनीही बंद पाडले होते. रस्ते तुटले होते, पूल पडले होते आणि टेलीफोनच्या तारा तुटल्या होत्या. सर्व रेल्वेरूळ ठिकठिकाणी कापण्यात आले होते. लास व्हिलास हा क्यूबाच्या मध्य विभागातील प्रांत. त्यामुळे सबंध द्वीपाचे दोन तुकडे झाले. ओरियेन्ते प्रांताला मदत करण्यासाठी बाटीस्टाजवळ हवाई किंवा नाविक मार्गाशिवाय दुसरा इलाज राहिला नाही. शत्रू बेजार झाल्याचे स्पष्ट दिसत होते. शत्रूसैन्यात प्रचंड गोंधळ उडाला होता. स्वतःची कातडी वाचविण्याकडे सर्वांचे लक्ष लागले. एकमेकांना मदत करून संयुक्तपणे बंडखोरांना तोंड देण्याचे भानही लष्कराच्या वेगवेगळ्या तुकड्यांना राहात नव्हते.

अखेर चे-गव्हेराच्याच्या फौजांनी लास व्हिलासची राजधानी सांताक्लारा या दीड लाख लोकवस्तीच्या शहरावर मोर्चा बांधला. शहरातील सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांनी लष्कराला आधीच सळो की पळो करून सोडले होते. २९ डिसेंबर रोजी घनघोर लढाईला तोंड लागले. तिकडे सांत्यागो शहरालाही फिडेलच्या फौजांचा पक्का वेढा पडला होता.

सान्ता क्लाराचे संरक्षण मोर्चे पक्के होते. लष्कराजवळ रणगाडे होते. परंतु चे गव्हेराने कडव्या क्रांतीकारकांची आत्मनाशी पथके तयार केली होती. सान्ता क्लारा भोवतालच्या मोर्चांवर प्रथम या पथकातील जीवावर उदार झालेले तरुण त्वेषाने तुटून पडत. त्यांचा आवेश बघूनच सैनिक गर्भगळीत होत. रेल्वे स्टेशन, पॉवर हाऊस, पोलीस स्टेशन – असे एकेक मोर्चे भराभर क्रांतीकारकांच्या ताब्यात येऊ लागले. तीस डिसेंबरला सान्ता क्लाराचे रेडियो स्टेशन पडले. चे गव्हेराने मोठ्या अभिमानाने सारे सान्ता क्लारा क्रांतिकारकांच्या ताब्यात आल्याची रेडियोवर घोषणा केली. शहरातील बराकी पडू लागल्या.

असा पाडाव चालू असताना बाटीस्टाचा एक जनरल हेलीकॉप्टरने फिडेलच्या भेटीसाठी गेला. बाटीस्टाचे दिवस संपले होते. आणि त्याला आता फक्त आपला जीव वाचवायचा होता. बाटीस्टाला देशाबाहेर निघून जाण्याची सवलत दिली आणि लष्कराची रचना कायम ठेवण्याचे फिडेलने आश्वासन दिले तर बाटीस्टा रक्तपात टाळण्याठी युद्ध थांबवायला तयार आहे, असा निरोप जनरल कँटिलोने आणला होता. फिडेलला अर्थातच या दोन्हीही अटी अमान्य होत्या. लॅटिन अमेरिकेतील लष्करे किती भ्रष्टाचारी आहेत हे त्याला चांगले ठाऊक होते. आणि बाटीस्टाला तर त्याला न्यायासनासमोर खेचायचे होते.

## बाटीस्टाचे पलायन

चे गव्हेराचा सान्ता क्लाराच्या मध्यभागी असलेल्या पक्क्या किल्ल्याला वेढा पडला असतानाच आतील अधिकाऱ्यांनी शरणागती पत्करली. पण शस्त्रे टाकण्यास टाळाटाळ करायला सुरुवात केली. इकडे फिडेलने चे गव्हेराला हॅवानावर चाल करून जाण्याचा हुकूम दिला. पण चे गव्हेरा हॅवानाकडे वळण्यापूर्वीच त्या राजधानीत एक वेगळेच नाटक घडत होते.

एक जानेवारी १९५९ च्या पहाटे दोन वाजता हॅवानाजवळ कँप कोलंबिया विमानतळावर एकच गर्दी उडाली होती. गव्हेरा हॅवानाकडे येत असल्याच्या बातम्या होत्या. बाटीस्टाचा सर्व परिवार आपापल्या बॅगा, नोटांनी भरलेल्या टंका, जडजवाहीर घेऊन विमानतळावर हजर होता. अनेक बडे लष्करी अधिकारीही आपापल्या कुटुंबासह होते. उड्डाणासाठी अमेरिकन विमाने जय्यत तयार होती. बाटीस्टाने सारे लष्करी अधिकार जनरल कँटिलोकडे सुपूर्द केले. तो विमानात बसला आणि विमानाने डोमिनिकन रिपब्लीकच्या दिशेने झेप घेतली. बाटीस्टाची जुलमी राजवट संपली होती.

बातमी शहरात पसरताच हॅवानातले लोक आनंदाने जल्लोष करीत रस्त्यावर आले द्यूतगृहे, पोलीस स्टेशन्स्‌ बराकी, फॅशनेबल क्लब्स्‌ यांच्या जाळपोळीला सुरुवात झाली

बाटीस्टाने यः पलायन केल्याची बातमी कास्ट्रोला सकाळी ९ वाजता मिळाली. खरे म्हणजे बातमी आनंदाची होती. पण फिडेल अस्वस्थपणे येरझारा घालत होता. बाटीस्टा पळो वा न पळो, क्रांती यशस्वी होणारच होती. आता बाटीस्टा आणि त्याच्याभोवतीचे टोळके पळून गेले होते. त्यांना शिक्षा करता येणार नव्हती. आणि बाटीस्टाने जनरल कँटिलोला पित्तू नेमले होते. लष्करावर अद्याप त्याचाच तावा होता.

ताबडतोब त्याने सर्वत्र क्रांतिफौजांना संदेश धाडले. लढाई चालू ठेवा. लष्कराची संपूर्ण शरणागती पत्करा. हॅवानातून काहीही बातमी येवो. त्याचबरोबर त्याने सर्वत्र नागरी संपाचीही हाक दिली. पण नासधूस न करण्याचे लोकांना आवाहन केले. त्याचबरोबर स्वतःच्या फौजांना आज्ञा सोडल्या–" सांत्यागो चलो. "

क्रांतिसैन्याच्या जोरापुढे आणि नागरी संपाच्या दहशतीमुळे सर्वत्र लष्करी तुकडचा आता भराभर शरण येऊ लागल्या. फिडेल कास्ट्रो दोन जानेवारी रोजी सांत्यागो शहरात शिरला. शहरातील सारे पावणेदोन लाख लोक त्याचे स्वागत करण्यासाठी रस्त्यावर आले. बंदुकीची एकही गोळी न झाडता मोंकाडा बराकी शरण आल्या. कास्ट्रोचा तो मोठा भावरम्य, वचनपूर्तीचा क्षण होता.

त्या दिवशी पहाटे दीड वाजता फिडेलने सांत्यागो शहरातील प्रचंड गर्दीपुढे त्या ऐतिहासिक मोंकाडा बराकीतील एका उंच चौकीवरून आवेशपूर्ण भाषण केले. फिडेलने आपले वचन पूर्ण केले होते. ' स्वातंत्र्य मिळवू किंवा हुतात्मे होऊ. '

बरोबर पाच वर्षे, सहा महिने आणि सात दिवसांपूर्वी फिडेलने वयाच्या सत्तावीसाव्या वर्षी बाटीस्टाची जुलुमी राजवट उलथून पाडण्याच्या ईर्षेने याच मोंकाडा बराकींवर हल्ला केला होता. तेव्हा त्याच्याबरोबर उणेपुरे दोनशे जवान होते. हल्ल्यातून अवघे सत्तर जवान वाचले होते. तीन वर्षांनंतर आणखी ब्याऐंशी क्रांतिकारकांसह मेक्सिकोतून क्यूबाच्या किनाऱ्यावर फिडेल उतरला. पहिल्याच दिवशी शिरकाण होऊन त्यातले अवघे बारा बंडखोर सिएरा मेस्त्रात शिल्लक राहिले. या बारा जणांनीच पंचवीस महिन्यांच्या अवधीत बाटीस्टाच्या तीस हजार संख्येच्या सुसज्ज सैन्याचा पराभव केला होता ! विजयाचा आणि वचनपूर्तीचा क्षण यापेक्षा किती अधिक नाटचमय असू शकेल ?

सांत्यागो शहर घेतल्यावर फिडेलला हॅवानाला जाण्याची घाई नव्हती. आपल्या सुमारे एक हजाराच्या फौजेसह आठशे मैलांवरील हॅवानास जाण्यासाठी कास्ट्रो मजल दरमजल करीत निघाला. आपल्या मागे गर्दी खेचीत, भाषणे देत, क्यूबा, नवा क्यूबा कसा असेल याविषयीची आपली स्वप्ने लोकांना सांगत तो निघाला. लोक त्याच्याशी हस्तांदोलने करीत होते, त्याला मिठचा मारीत होते आणि त्याचा



नव्या क्यूबाचा आज जन्म झाला आहे.—फिडेल

जयजयकार करीत होते. क्यूबात आता नव्या युगाचा उदय झाल्याचे स्पष्ट दिसत होते. फिडेल क्यूबाचा नवा एकमेव नेता होता.

इकडे क्रांतिसैन्याने सारी शहरे ताब्यात घेतली होती. फिडेलने डॉ. मॅन्युअल उरुटिया याची अध्यक्षपदी आधीच नेमणूक केली होती. प्रधानमंत्र्याची आणि इतर मंत्र्यांचीही नेमणूक झाली. क्रांती पूर्ण यशस्वी झाली होती.

परंतु आता फिडेल कास्ट्रोची काय भूमिका होती? तो स्वतःला फक्त क्रांति-सैन्याचा प्रतिनिधी म्हणवून घेत होता. राजकीय सत्तेविषयी थोडीदेखील आस्था दाखवीत नव्हता आणि अपार प्रसिद्धीच्या झोतात अगदी धिमे धिमे हॅवानाच्या दिशेने मजल मारीत होता.

अखेर तो हॅवानाला पोचला तेव्हा त्याचे देवदुर्लभ स्वागत झाले. हॅवानातील जनता त्याला भेटायला उत्सुक झाली होती. त्याचा एकुलता एक मुलगा फिडेलिटो याच्याशी त्याची पहिली भेट झाली आणि एका रणगाड्यावरून आपल्या मुला-बरोबर त्याने राजधानीतील अध्यक्षीय राजवाड्यात प्रवेश केला.

राजवाड्यातील एका गच्चीवरून त्याने छोटेसे भाषण केले. आपल्या आयुष्या-तील सर्वांत महत्त्वाचे भाषण त्याने कँप कोलबियातील प्रचड गर्दीपुढे करण्यासाठी राखून ठेवले होते. बाटीस्टा राजवटीचे प्रतीक म्हणजे कँप कोलबिया.

राजवाड्यातून फिडेल जेव्हा कँप कोलबियात पोचला तेव्हा गर्दीतून कबुतरांचे थवेच्या थवे आकाशामध्ये सोडून देण्यात आले. त्यातले एक कबुतर दाढीवाल्या फिडलच्या खांद्यावर बसले तेव्हा गर्दीने त्याच्या नावाचा एकच जल्लोष केला. जुलूम जबरदस्तीने बेजार झालेल्या क्यूबामध्ये आता नवे, शांतीचे आणि समृद्धीचे युग उजाडत असल्याचे ते सुचिन्हच लोकांना वाटले. [क्रमशः]

## क्रीडांगण

# फिशर-स्पास्की लढत

## शतकातील महान सामना

**मुकुंद मणूरकर**

'बुद्धिबळ' या खेळाच्या नावावरूनच खेळातील बुद्धिचे महत्त्व कळून येते. पण खेळाप्रमाणेच खेळ चालू नसतानाही बुद्धिचा खेळ करावा लागतो. हे सध्या आपण पहात आहोत.

रेकजेविक येथे अकरा जुलैपासून जागतिक विजेता रशियाचा बोरेस स्पास्की आणि अमेरिकन आव्हानवीर बॉबी फिशर यांच्यात बुद्धिबळाचा जागतिक अजिंक्य-पदासाठी सामना चालू आहे. सामना चालू होण्यापूर्वी बॉबी फिशरने अनेक चाळे केले. बुद्धिबळ तज्ज्ञांच्या मते हे प्रताप त्याने केवळ स्पाकीचा मानसिक तोल ढळण्यासाठीच केले असावेत. आणि एकदा का तोल ढळला की सामना हातातून जाण्याची शक्यता वाढलीच !

चोवीस डावाचा हा सामना वास्तविक चार जुलैलाच सुरू होणार होता. पण फिशर महाशय हजर राहिलेच नाहीत. न्यूयॉर्कमधूनच आपल्या 'गुप्त निवास स्थानातून' ते एकेक बातम्या बाहेर सोडीत होते. प्रथम प्रथम फिशरच्या प्रकृती अस्वास्थ्याच्या बातम्या येत, पण नंतर खरे कारण बाहेर आले. स्पर्धेसाठी बक्षिस होते दीड लाख पौंडाचे. पण फिशरच्या मते ही रक्कम कमी होती. त्याने ती दुप्पट करण्याची मागणी केली. अखेर एका ब्रिटीश लक्षाधिशाने ही त्याची मागणी मान्य करण्याचे वचन दिले. तेव्हाच हे महाशय प्रकट झाले आणि मोठ्या दिमाखाने स्पर्धेच्या स्थळी हजर झाले. अर्थात स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी गैरहजर राहिलेच !

तीन लाख पौंडाच्या या स्पर्धेत विजेत्या खेळाडूस पाच अष्टमांश रक्कम मिळेल शिवाय टेलीव्हीजन छायाचित्रापोटी प्रत्येक खेळाडूस शे. ३० इतकी रक्कम मिळेल. पण फिशरने आल्या आल्या नवी मागणी केली की तिकीट विक्रीपायी जमा झालेल्या रकमेच्या शे. ३० आपल्याला मिळावी.

स्पर्धेची तयारी पहाण्यासाठी दोन्ही खेळाडू गेले तेव्हाही फिशरचा विक्षिप्तपणा चालूच होता. सोंगटयांच्या वजनासंबंधी त्याने दोष काढले. तसेच त्याला दिलेल्या खुर्चीबद्दलही त्याने नापसंती दर्शविली. आपण स्पास्कीपेक्षा उंच असल्याने दिलेली खुर्ची आरामदायक ठरणार नाही असे सांगितले. मग त्याने स्वतःच आपली खास खुर्ची न्यूयॉर्कहून मागवून घेतली आणि 'बुद्धिबळ हा माझा पेशा असल्यामुळे कुठल्याही गोष्टीची कमतरता आपल्याला चालणार नाही' ही त्याला पुष्टी जोडली.

आधीच स्पर्धेला झालेला उशीर आणि त्यात भरीला फिशरची चालू असलेली नाटकं, त्यामुळे कुठलाही खेळाडू संतप्त झाला असता. पण स्पास्की अतिशय शांत राहिला. एकाही गोष्टीचा त्याने मनावर परिणाम होऊ दिला नाही. आता स्पास्की अजून व्यवस्थित तापला नाही हे पाहून फिशरने दुसऱ्या एका गोष्टीकडे आपला मोर्चा वळविला. स्पर्धेच्या ठिकाणी टेलीव्हीजनचे कॅमेरे लावून ठेवले होते. याचा आपल्याला त्रास होतो, सबब ते काढून टाकावे अशी त्याने मागणी केली. यामुळे व्यवस्थापकांचीही पंचाईत झाली. कारण त्यांनी आधीच चेस्टर फॉक्स या अमेरिकन धनिकाकडून पन्नास हजार पौंड वाजवून घेऊन टेलीव्हीजनचे सर्व हक्क विकले होते. परंतु तरीही त्यांनी हे कॅमेरे खेळाडूंच्या नजरेस येणार नाहीत, त्यांना त्रास होणार नाही अशा रीतीने दूरवर कोपऱ्यामधून बसविले. पण हे कॅमेरे तिथे आहेत ही गोष्टच मला बैचेन करते' असे फिशरने सांगितले.

अशा परिस्थितीत एकदाची स्पर्धेतील पहिल्या डावास सुरुवात झाली. फिशर हा डाव हरला पण त्याने खापर फोडले टेलीव्हीजन कॅमेऱ्याच्या अस्तित्वावर! वस्तुस्थिती अशी होती की त्याने एक अत्यंत बालीश खेळी करून स्वतःवर मात

---

## खोखोने बाजी मारली !

भारत सरकारतर्फे नुकतीच १९७० व १९७१ सालच्या अर्जुनपदक मिळविलेल्या खेळाडूंची यादी प्रसिद्ध झाली. या यादीत खोखो खेळाडूंना बऱ्याच वर्षानंतर प्रथमच स्थान मिळाले. १९७० सालचे पारितोषिक बडोद्याच्या गुजरात क्रीडा मंडळाचा हुकूमी एक्का सुधीर परब यास मिळाले. तर एकाहत्तर सालचे पारितोषिक बडोद्याच्याच मध्यस्त रमत केंद्राच्या अचला देवरे हीस मिळाले. खोखो प्रमाणे कबड्डीचा मात्र या यादीत समावेश होऊ शकला नाही. खरे म्हणजे कबड्डीला पारितोषिक देण्याचे नक्की झाले होते. पण ऑल इंडिया कबड्डी फेडरेशनची दोन शकले मध्यंतरी झाली. आणि आता खरी कबड्डी फेडरेशन कुठली याबाबत वाद चालू आहे. त्यामुळे कबड्डीला पारितोषिक दिले गेले नसावे. असो, पुढील वर्षी तरी कबड्डीचा समावेश या यादीत व्हावा अशी आशा करू ;

---

करून घेतली होती. अर्थात हा त्याच्या डावपेचाचाही प्रकार असू शकेल.

नंतर दोन दिवसांनी दुसऱ्या डावास सुरुवात झाली. पंचांनी घड्याळ सुरू केले. स्पास्की वेळेवर हजर होता. पण फिशर आलाच नाही. तो त्याच्या हॉटेलमध्येच बसून राहिला. 'डावाच्या नियोजित वेळेपासून एका तासाच्या आत खेळाडू उपस्थित झाला नाही तर तो डाव प्रतिस्पर्ध्याला बहाल करण्यात यावा' या नियमाप्रमाणे पंचांनी या डावात स्पास्कीला विजयी ठरविले. फिशर तापला त्याने भराभरा सात पानांचा, तिखट शब्दांनी युक्त असा तक्रार अर्ज पाठविला. नियमावलीत एक नियम आहे, 'स्पर्धेच्या ठिकाणी बसविलेल्या टेलीव्हीजन कॅमेऱ्यापासून खेळाडूंना त्रास होणार नाही याची व्यवस्थापकांनी काळजी घेतली पाहिजे.' या नियमाच्या आधारे फिशरने हा डाव पुन्हा खेळला जावा अशी मागणी केली. ही मागणी फेटाळण्यात आली. पण व्यवस्थापकांनी अखेर फिशरपुढे मान तुकवली ! स्पर्धेची जागा तिच्या मूळच्या ठिकाणाहून एका छोटया एकांतातील खोलीत हलविण्यात आली. पण स्पास्कीने ह्या जागेबद्दल नापसंती दर्शविली. या खोलीच्या पलीकडून वाहनांची वर्दळ चालू असते. तसेच जवळपास मुले खेळत असतात.

हा मजकूर लिहीपर्यंत पाच डाव झालेले आहेत. त्यापैकी पहिले दोन स्पास्कीने जिंकले, तिसरा व पाचवा फिशरने जिंकला तर चौथा बरोबरीत सुटला. यापूर्वी या दोघात एकूण पाच वेळा लढती झाल्या. त्यापैकी तीन स्पास्कीने जिंकल्या, तर दोन बरोबरीत सुटल्या. फिशरला मात्र एकातही स्पास्कीवर मात करता आली नाही. पण तरी देखील फिशरचा खेळ स्पास्कीपेक्षा यत्किंचितही कमी नाही. उलट काहीवेळा तो स्पास्कीपेक्षा जास्त प्रभावी ठरत आहे. त्यामुळे ही लढत चुरशीची होत आहे.

खेळ चालू असतानाचे सोडून द्या, पण खेळ चालू नसताना फिशर कोणत्या विक्षिप्त चाली करेल याची कुणालाच कल्पना नसते. 'अनप्रेडीक्टेबल' या विशेषणानेच तो ओळखला जातो. सदैव आपल्या हॉटेलातच बसून रहातो. टेलीव्हीजनवर मुलाखत वगैरे देत नाही. दुसऱ्या डावासंबंधी त्याने केलेल्या तक्रार अर्जात अत्यंत कडवट भाषा वापरली होती. त्या अर्जाची प्रत घेऊन तो स्पास्कीच्या हॉटेलमध्ये गेला. दार बंद होते. स्पास्की आत न्याहारी करीत होता. फिशर काही वेळ बाहेरच थांबला, आणि नंतर स्पास्कीला न बोलावताच दाराच्या फटीतून अर्जाची प्रत आत फेकली व निघून गेला. स्पास्कीने अर्ज वाचल्यावर एका वाक्यात प्रतिक्रिया व्यक्त केली, यात सर्व काही आहे, नाही आहे फक्त 'बुद्धि'!

पस्तीस वर्षाच्या, मध्यम उंचीच्या, भुऱ्या केसाच्या व मांजरासारखे डोळे असलेल्या बोरेस स्पास्कीने आतापर्यंत तोल ढळू दिला नाही. फिशरच्या मनस्ताप देणाऱ्या प्रत्येक चालीवर त्याची प्रतिचाल होती 'संशयाची'! सध्या दोघे बरोबरीत आहेत. पण जसजशी सामन्यातील चुरस वाढत जाईल तसतशी स्पास्कीला

आपली मन:शांती ढळू न देणे कठीण जाईल. कारण स्पर्धेच्या बदललेल्या जागेबद्दल नापसंती दर्शवून स्पास्कीने पूर्वीच्या जागेचीच मागणी केली, पण ती मान्य करण्यात आली नाही. आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या अवास्तव मागण्या मान्य व्हाव्यात, पण आपली न्याय्य मागणी मात्र मान्य होऊ शकत नाही म्हणून तो थोडा नर्व्हस झाला.

असो. ही लढत मात्र रोमांचकारी ठरत आहे. 'शतकातील महान सामना' या शब्दात या लढतीचे सर्वत्र वर्णन केले जात आहे ते सर्व दृष्टीने योग्य आहे!

# सलामी वर्गणीदारांसाठी....

सलामी योजनेतील दुसऱ्या गटातील तीन पुस्तके तयार आहेत. ज्या वर्गणीदारांनी पुस्तके समक्ष नेणार असल्याचे कळविले आहे त्यांनी, ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात रविवार व्यतिरिक्त सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळात 'माणूस' कार्यालयातून पुस्तके नेण्याची व्यवस्था करावी, ही विनंती

व्यवस्थापक

## मध्यंतर

# दोन वेगळे कार्यक्रम

पुष्पा भावे

मुंबईतील ' रंगायन ' या ख्यातनाम प्रायोगिक नाट्यसंस्थेने मार्सेल मार्सो या फ्रेंच मूकनाट्यपटूच्या शिष्येचा–गिसेला टोलचा–माईमचा कार्यक्रम सादर केला. माईम–मूकनाट्य हा कोणत्याही अभिनयाचा मूलाधार असल्यामुळे रंगभूमीविषयी स्वारस्य बाळगणाऱ्या कोणालाही माईमविषयी औत्सुक्य असतेच. त्यातून मार्सेल मार्सो हा मूकनाट्यातील परवलीचा शब्द असल्यामुळे गिसेला टोल यांच्या कार्यक्रमाला भरपूर गर्दी झाली होती. अत्याधुनिक रंगभूमीशी संपर्क राखणाऱ्या काहींच्या मनात थोडे वेगळे औत्सुक्य होते. आज पाश्चात्य रंगभूमीवर ज्या अनेकविध आविष्कार–माध्यमांचा कलापूर्ण उपयोग केला जातो, त्यात माईमला फार महत्त्वाचे स्थान आहे. नाट्यांतर्गत मूकनाट्यामुळे केवळ मूकनाट्याचे जे कार्यक्रम केले जातात, त्यावर काही संस्कार झाले असावेत असा अंदाज होता. शिवाय मूकनाट्यातील हालचालींवर बॅलेचे असणारे संस्कार आज अधिक formalised (आकृतिनिष्ठ) झाले असतील अशीही अपेक्षा होती. ' रंगायन 'सारखी संस्था मार्सोशिष्येच्या माईमचा कार्यक्रम सादर करते त्यावेळी तो विशेष असावा अशी अपेक्षा साहजिक होती.

प्रत्यक्षात मात्र, ' रंगायन 'ची परंपरा मोडून उशीरा सुरू झालेल्या या कार्यक्रमात विशेष काहीच नव्हते. मदाम टोल यांच्या मूकाभिनयातील शिकाऊपणा स्पष्टपणे दिसत होता; मूकनटांच्या अभिनयातील स्नायूंच्या हालचालीवरील हुकमत जाणवत नव्हती; आणि उत्स्फूर्तता कुठेच व्यक्त होत नव्हती. हालचालींना अपेक्षित असलेला बॅलेचा सहजडौल नव्हता की एखादा अनुभव, वातावरणासह व्यक्त करण्याचे सामर्थ्य नव्हते. ' स्मृती ' या कार्यक्रमाचा अपवाद वजा करता त्यातील एकही कार्यक्रम अर्थपूर्ण वाटला नाही. बायकांचे मेकप करणे, जागच्या जागी उभे राहून चालण्याचा अभिनय करणे, उत्सवप्रसंगी अनेकांशी हस्तांदोलन

करणे इत्यादी हालचालींची प्रतिकृती निर्माण करण्याचा हेतु काय? केवळ परदेशस्थ प्रेक्षक असले म्हणून त्यांच्या जाणीवांचा इतका अपमान करण्याची गरज नव्हती (अर्थात मादाम टोल हे वाचू शकणार नाहीत). आज नव्या नाटयशैलीमध्ये बॅले व माईम ज्या परिणामकारक रीतीने योजले जात आहेत त्याचा विचार करता (केवळ छायाचित्रांच्या आधारे हा विचार करूनही) हा कार्यक्रम फार शाळकरी वाटला.

गंमत अशी की आतिथ्यभावनेने आमचे प्रेक्षक वारंवार टाळ्या वाजवत होते. ही आतिथ्यभावना की गोऱ्या कातडीविषयीचा आदर? श्री. सदानंद जोशी 'मी अत्रे बोलतोय' या एकपात्री कार्यक्रमात एका जागी उभे राहून जिना चढण्याचा मूकाभिनय करतात. तो चांगला असला तरी अप्रस्तुत म्हणून आपण त्यावर टीका करतो; 'रंगायन'तर्फे झालेल्या श्री. दंडवतेकृत 'प्लॅटफॉर्म'सारख्या मूकनाटयातील लक्षणीय प्रयोगाकडे पाठ फिरवतो; आणि या कोणा फ्रेंच नटीने सादर केलेल्या मामुली शिकाऊ प्रयोगाला मनसोक्त दाद देतो, हे विलक्षण नाही काय? आहे. ◻

•

नव्या कार्यक्रमाच्या शोधात असणाऱ्या प्रेक्षकाला काही विलक्षण पाहायला मिळण्याची जशी शक्यता असते तशीच कंटाळवाण्या कार्यक्रमाला सामोरे जाण्याची मनाची तयारी ठेवावी लागते. काही वेळेला विशिष्ट कार्यक्रम रुचला नाही तरी त्यामागील प्रयत्नांचे नवेपण, आकांक्षी यत्नही लक्षात घ्यावा लागतो.

श्री. अरुण होर्णेकर या 'अमृत नाटय भारती'च्या माजी विद्यार्थ्याला महाराष्ट्रातील औरंगाबाद येथील एकपात्री स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाल्याचे वृत्त वाचले, 'युगे युगे मी वाट पाहिली' हे त्याचे शीर्षक वाचले, त्यावेळी मनात औत्सुक्य निर्माण झाले. मागे 'वेटिंग फॉर गोदो' या नाटकातील प्रमुख भूमिका व 'मुद्राराक्षसा'तील अहितुंडिकाची छोटीशी भूमिका श्री. होर्णेकर यांनी ज्या समजुतीने सादर केली होती, त्यामुळे ही बातमी विशेष औत्सुक्याने ऐकली. त्यानंतर झालेल्या प्रत्यक्ष भेटीत श्री. होर्णेकर यांनी लिखितस्वरूपापेक्षा Improvisationवर (आयत्या वेळच्या निर्मितीवर) अधिक भर दिल्याचे सांगितले. सहज बोलता बोलता ते म्हणाले, की या स्पर्धेला जाण्यापूर्वी मी एकही एकपात्री कार्यक्रम पाहिला नव्हता. अगदी 'पु. ल.'चा देखील! मला जे नाटक करावेसे वाटले ते मी केले; शब्दांपेक्षा अभिनयावर भर दिला. श्री. होर्णेकर यांच्या शब्दोच्चारणात शारीर दोष आहे; तो ते अनेकदा नाटयपूर्णतेने योजू शकत असले तरी त्यामुळे त्यांच्या भूमिकांना एक मर्यादा निर्माण होते. हे माहीत असूनही एक तरुण नट वेगळ्या पद्धतीने एकपात्री कार्यक्रम कसा सादर करीत असेल हे पाहण्याची इच्छा होती. गेल्या आठवडयात सरकारी नाटयशिबिरात हा कार्यक्रम पाहण्याचा योग आला.

प्रारंभी या एकपात्री कार्यक्रमाची भूमिका सांगण्यात आली. प्रति-वाङ्मयीन रंगभूमीची कल्पना सांगून या कार्यक्रमासाठी पडदा बाजूला झाला त्यावेळी एक कलंदर वृद्ध एका नग्न स्त्रीचे चित्र रंगवीत होता. मागे दोरीचा एक फास लटकत होता. कोणा प्रेयसीची वाट पाहणारा हा वृद्ध प्रेक्षकांशी कधी हितगुज करीत होता, कधी त्यांच्यावर खेकसत होता, कधी त्यांना रांडांच्या हकिगती सांगत होता. हे सारे संभाषण श्री. होर्णेकर यांनी स्वतःच लिहिले होते. त्यावर बेकेटच्या गोदोची दाट छाया होती. ज्या ठिकाणी त्यांनी वेगळे काही सांगण्याचा प्रयत्न केला त्या त्या ठिकाणी ते कार्यक्रमाच्या मूळस्वरूपापासून दूर जात होते. हे 'अनर्थनाटच' आहे असे सांगणारे श्री. होर्णेकर नग्न स्त्रीचे चित्र प्रतिकृतीवादी काढत होते; वेश्यांच्या त्यांच्या हकीगती श्री. अरविंद गोखल्यांच्या तसल्या कथांसारख्या स्वप्नाळू होत्या; संवादात सुसंगत सूत्र होते. त्यांच्या मनात असलेली शब्दापलीकडील निव्वळ नाट्याची कल्पना प्रत्यक्षात उतरत नव्हती. उपस्थित प्रेक्षकांमध्ये चुळबूळ सुरू झाली. इतक्यात तो वृद्ध प्रेक्षकांना उद्देशून म्हणाला : "तुम्हाला कंटाळा आला ना ? आता मी तुम्हाला नाच करून दाखवतो" असे म्हणून श्री. होर्णेकर यांनी जे नृत्य सादर केले, त्यामागील संकल्पना आणि रंगमंचावरील त्याची प्रत्यक्षता प्रेक्षकाला सुखद धक्का देणारी होती. त्या काही मिनिटांसाठी बाकीच्या कार्यक्रमाचे गबाळे स्वरूप सुसह्य मानावे असा त्या नृत्याचा जोश होता.

येणाऱ्या काळात, तरुण नटांनी शब्दापलीकडे स्वतःची नाट्यनिर्माणक्षमता कसाला लावायला हवी असे आपण सतत मानतो. रूढ नाटकाविषयी असमाधानी असल्यामुळे रंगमंचावर येऊन पहिली दहा मिनिटे चित्र काढणारा, मोकळेपणे नुसता नाचणारा हा धीट नट मला मराठी रंगमंचावरील तरुण पिढीच्या चैतन्याची खूण वाटतो. औरंगाबाद येथील स्पर्धेत दोन तासांचे बंधन असल्यामुळे या कार्यक्रमाचे स्वरूप अस्ताव्यस्त झाले आहे, श्री. होर्णेकर यांना लेखन जमलेले नाही, हा कार्यक्रम प्रत्यक्ष कंटाळवाणा झाला हे सारे खरे असले; या कार्यक्रमाविषयीची निष्ठुर टीका श्री. होर्णेकर यांनी लगेच ऐकलेली असली, तरीही मला असे वाटते की श्री. होर्णेकरांचा हा प्रयत्न कदाचित भविष्यातील तरुण रंगमंचाचे स्वरूप सुचविणारा असेल. त्यांच्या कार्यक्रमातील श्रेयस्कर शक्यतांना काही निश्चित आकार, लक्षणीय उद्रेक लाभण्यासाठी संवेदनाक्षम मनाची, गाढ अस्वास्थ्याची गरज आहे. तरी मनोरंजनात्मक एकपात्री कार्यक्रमाच्या लाटेत वाहून न जाता एका स्पर्धेसाठी असा कार्यक्रम करण्याचे मनात आणणाऱ्या श्री. होर्णेकरांचे व त्यांच्या प्रयत्नातील अपयशाचेही लक्षणीयत्व जाणून त्यांना पारितोषिक देणाऱ्या परीक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन !

□ □ □

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

**नेताजी सुभाषचंद्र बोस**
तुम्हाला माहितच नाहीत.
त्यांची तुम्हाला
काहीएक ओळख नाही.
तुम्हाला माहित आहेत ते
देशगौरव सुभाषचंद्र बोस.
पण ते ' नेताजी ' बनले
भारताच्या बाहेर असताना.
अन् नंतर त्यांना
परत मायदेशी येताच आलं नाही.
त्यांचं ' नेताजी 'पण
हे ते भारताच्या बाहेर असतानाचं.
त्यामुळं नेताजी सुभाषचंद्र बोस
हे तुम्हाला
अनोळखीच राहिले आहेत.



# मी नेताजींना बघितलंय्

प्रत्यक्ष साक्षीदारांच्या जबान्या

नारायण सान्याल

अनुवाद
अशोक शहाणे

' माणूस ' १५ ऑगस्ट विशेषांकापासून